मराठी अस्मितेचा आवाज बुलंद करण्याचे कार्य गेली २७ वर्षे करणारे 'दैनिक वृत्तमानस' आता घरोघरी पोचवण्याचे काम आम्ही करणार आहोत. वाचकांना आमच्या लोकप्रिय दैनिकाची प्रत उपलब्ध होत नसेल तर या दूरध्वनींवर संपर्क साधावा.
**दातार अँड सन्स न्युज पेपर डिस्ट्रिब्युटर्स**
भ्रमणध्वनी - ८६५५१९४४५२, ८५९१६६२६१६, ९८६७३०८०६३

मराठी अस्मितेचा बुलंद आवाज.
https://epapervrittamanas. in/

# वृत्तमानस

Email : vrittamanas1@gmail. com
मुंबई/ पालघर | मुंबई, रविवार, २२ सप्टेंबर २०२४ | वर्ष- २९ | अंक - ९२ | पाने- ८
आर. एन. आय क्र. - ६५६०९/९६
किंमत : ३ रुपये



भाजप माझ्या नावाने खोटं पसरवत आहे
पान 8

## पंतप्रधान मोदी अमेरिकेत बायडेन यांची घेणार भेट

### युक्रेन-चीनवर चर्चा होणार

**वॉशिंग्टन**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आज आपल्या 10 वर्षांच्या कार्यकाळात 9व्यांदा अमेरिकेला पोहोचले आहेत. ते राष्ट्राध्यक्ष बायडेन यांची त्यांच्या होमस्टेट डेलावेअरमध्ये भेट घेणार आहेत.



खरे तर अमेरिकेने भारतावर आपले नागरिक गुरपतवंत सिंग पन्नू यांच्या हत्येचा कट रचल्याचा आरोप केला होता. नुकतेच अमेरिकन कोर्टानेही या प्रकरणी भारत सरकारला समन्स पाठवले आहेत. भारताने हे आरोप फेटाळून लावले आहेत. भारताने पन्नूला 2020 मध्ये UAPA अंतर्गत दहशतवादी घोषित केले होते.

पंतप्रधान मोदी, बायडेन यांची भेट घेतल्यानंतर ते 3 देशांच्या नेत्यांसह अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षांच्या हायस्कूलमध्ये होणाऱ्या क्वाड समिटमध्ये सहभागी होतील. या वर्षी भारतात क्वाड समिट होणार होती, मात्र अमेरिकेच्या विनंतीवरून बायडेन यांना ते होस्ट करण्याची संधी देण्यात आली. क्वाड संघटनेत भारत, अमेरिका, जपान आणि ऑस्ट्रेलिया यांचा समावेश आहे. चार देशांचे नेते चीनचा मुकाबला करण्यासाठी आणि इंडो-पॅसिफिक सुरक्षित करण्यासाठी क्वाडमध्ये चर्चा करतील.

# महाराष्ट्र देशाचे तर 'एमएमआर' महाराष्ट्राच्या प्रगतीचे इंजिन - मुख्यमंत्री

**प्रतिनिधी**
**ठाणे**

महाराष्ट्र हे देशाचे पॉवर हाऊस होऊ शकेल इतकी ताकद महाराष्ट्रामध्ये आहे. महाराष्ट्र हे देशाच्या प्रगतीचे इंजिन (Growth Engine) आहे. तर आपलं ठाणं विकासाचं खणखणीत नाणं, असे उद्गार मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज येथे काढले. डॉ.काशिनाथ घाणेकर नाट्यगृह येथे "मुंबई महानगर प्रदेश अंतर्गत" "ठाणे विकास परिषद-2024" चे आयोजन करण्यात आले होते, त्यावेळी ते बोलत होते.

व्यासपीठावर यावेळी ठाणे जिल्ह्याचे पालकमंत्री शंभूराज देसाई, नियोजन मंडळाचे उपाध्यक्ष राजेश क्षीरसागर, खासदार नरेश म्हस्के, आमदार प्रताप सरनाईक, "मित्रा" चे प्रवीणसिंह परदेशी, म्हाडाचे मुख्य कार्यकारी अधिकारी संजीव जयस्वाल, जिल्हाधिकारी अशोक शिनगारे, महापालिकेचे आयुक्त सौरभ राव, नवी मुंबई महानगरपालिका



आयुक्त डॉ. कैलास शिंदे, कल्याण डोंबिवली महानगरपालिका आयुक्त इंदूराणी जाखड, सिडकोचे सहव्यवस्थापकीय संचालक शंतनु गोयल, मीरा भाईंदर महानगरपालिकेचे आयुक्त संजय काटकर, भिवंडी-निजामपूर महानगरपालिकेचे आयुक्त अजय वैद्य, वसई-विरार महानगरपालिका आयुक्त अनिल पवार, आदी मान्यवरांची उपस्थित होते.

मुख्यमंत्री शिंदे म्हणाले की, आपण मुंबई महानगर प्रदेशात पाच सेक्टर्समध्ये जर धोरणात्मक काम केले तर आपली अर्थव्यवस्था 1.5 ट्रिलियन डॉलरपर्यंत पोहोचण्याची क्षमता या मुंबई महानगर प्रदेशात आहे. यामुळे सर्वांना उद्योग, सर्वांना रोजगार, सर्वांना घरे, हरित ठाणे अशा सर्व गोष्टी साध्य करु शकतो. ठाण्यामध्ये काही गोष्टी सुरु होतात, मग नंतर त्या इतर सर्व ठिकाणी सुरु होतात, असा हा ठाण्याचा इतिहास आहे. महाराष्ट्र हे देशाचे पॉवर हाऊस होईल, इतकी ताकद महाराष्ट्रामध्ये आहे. ते म्हणाले, शेतीनंतर रिअल इस्टेट जास्त रोजगार देणारे क्षेत्र आहे. महाराष्ट्र आता जीडीपी मध्ये, परदेशी गुंतवणूकीत, पायाभूत सुविधांचे जाळे निर्माण करण्यात अशा विविध क्षेत्रात पहिल्या क्रमांकावर आहे. देशाची जी एकूण गुंतवणूक आहे,त्यापैकी 52 टक्के ही एकट्या महाराष्ट्राची आहे. अटल सेतू हा मार्ग एक गेम चेंजर प्रकल्प ठरला आहे. लवकरच ठाणे ते बोरिवली प्रवास आपण 20 मिनिटात करू शकणार आहोत. पान 3 वर

***ठाण्याचा जीडीपी 20 टक्क्यांवर आणणार!***

*ठाणे जिल्हयाची 48 बिलियन डॉलर अर्थव्यवस्था आहे, सन 2030 पर्यंत ती 150 बिलियन डॉलर होणे हे आपले उद्दिष्ट आहे. ठाण्याचा जीडीपी 7.5 टक्के आहे, हा जीडीपी 20 टक्क्यांवर आणण्याचा प्रयत्न करायचा आहे. ठाण्यामध्ये विविध लोकोपयोगी प्रकल्प राबविण्यात येत आहे. यातूनच खड्डेमुक्त रस्ते, सेंट्रल पार्क, ब्लू सी, एसटीपी प्लँट, प्रदूषणमुक्त पाणी यासारखे विविध उपक्रम सुरु आहेत, असे सांगून ते म्हणाले की, विकास आणि कल्याणकारी योजना राबविणारे तसेच राज्याच्या प्रगतीसाठी आधुनिक तंत्रज्ञानाच्या सहाय्याने अहोरात्र काम करणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य आहे, असे मुख्यमंत्री शिंदे म्हणाले.*

## पुण्यातील मराठा आंदोलक मुंबईत

### मंत्रालय व 'वर्षा'ला घेराव घालणार

**प्रतिनिधी**
**मुंबई**

पुण्यातून निघालेले मराठा आंदोलक आता मुंबईत दाखल झाले असून या आदोलकांच्या अवतीभोवती चेंबूर पोलिसांचा मोठा फौजफाटा दिसून येत आहे. पुण्यातील मराठा आंदोलकांनी मंत्रालयाला घेराव घालण्याचा इशारा दिला होता. त्यासाठी आज ते आरक्षणाची मागणी मान्य करावी, असे म्हणत मुंबईत दाखल झाले आहेत.

मराठा आरक्षण मुख्यमंत्री स्मरण यात्रा असं या आंदोलनाला नाव देण्यात आलं आहे. रात्री 9 वाजता चेंबूरमधील शिवरायांच्या पुतळ्यासमोर आंदोलकांनी घोषणाबाजी करत राज्य सरकारचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला. सकल मराठा समाज पुण्याच्या वतीने स्मरण यात्रा काढून मंत्रालयाला घेराव घालण्यासाठी आणि मुख्यमंत्र्यांची भेट घेण्यासाठी पुण्यातील कार्यकर्ते मंत्रालयाकडे निघाले आहेत.

आज सकाळी हे कार्यकर्ते पुण्यातल्या खंडोबा चौकातून मंत्रालयाच्या दिशेने मार्गस्थ झाले. मुख्यमंत्र्यांनी आमची तत्काळ भेट घ्यावी, अशी मागणी या मराठ्यांची आहे.

## भाजप जिंकले तर ईद आणि मोहरमला दोन सिलेंडर फ्री

**श्रीनगर**

भाजप जिंकले तर ईद आणि मोहरमला दोन सिलेंडर फ्री देण्याची मोठी घोषणा आज केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी केली आहे. निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर जम्मू-काश्मीरमध्ये मेंढर येथे शनिवारी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या सभेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी सभेला संबोधित करताना अमित शाह यांनी ही घोषणा केली.



जम्मू-काश्मीरमध्ये अब्दुल्ला, मुफ्ती आणि नेहरू-गांधी परिवाराने 90 च्या दशकापासून आतापर्यंत दहशतवाद पसरवला आहे. मात्र नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील भाजप सरकारने जम्मू-काश्मीरमधून दहशतवाद संपवला आहे. येथील तरुणांना दगडांऐवजी लॅपटॉप दिला आहे. या निवडणुकांमुळे अब्दुल्ला कुटुंब, मुफ्ती कुटुंब आणि नेहरू-गांधी घराणे यांची राजवट संपुष्टात येणार आहे, असेही अमित शहा आपल्या भाषणात म्हणाले.

2014 मध्ये मोदीजींचे सरकार आले नसते तर पंचायत, ब्लॉक आणि जिल्ह्याच्या निवडणुका झाल्या नसत्या. मोदी सरकारमध्ये ओबीसी, मागासवर्गीय, गुर्जर बकरवाल, डोंगरे यांना आरक्षण मिळाले. काँग्रेस आणि नॅशनल कॉन्फरन्स म्हणतात की आम्ही आरक्षण संपवू, पण भाजप म्हणत आहे की आम्ही गुर्जर बकरवाल आणि पहाडींनाही बढतीत आरक्षण देऊ, असे आश्वासनही अमित शहा यांनी सभेत बोलताना दिले. महिलांच्या खात्यात 18 हजार रुपये येणार आहेत. तर ईदला 2 सिलिंडर दिले जाणार आहेत. याशिवाय आम्ही 500 युनिट्स मोफत देऊ, असेही अमित शहा यांनी पुढे नमूद केले.

## आतिशी यांनी नवी दिल्लीच्या मुख्यमंत्रिपदाची घेतली शपथ पाचजणांनी घेतली मंत्रिपदाची शपथ

**प्रतिनिधी**
**नवी दिल्ली**

आम आदमी पक्षाच्या नेत्या आतिशी यांनी शनिवारी दिल्लीच्या मुख्यमंत्री म्हणून शपथ घेतली. आता त्या दिल्लीच्या तिसऱ्या महिला मुख्यमंत्री ठरल्या आहेत. त्यांच्या पूर्वी सुषमा स्वराज आणि शीला दीक्षित यांनी मुख्यमंत्री म्हणून काम पाहिले आहे. दक्षिण दिल्लीतील कालकाजी विधानसभा मतदार संघातून आतिशी निवडून आल्या आहेत.



जामिनावर बाहेर आलेले दिल्लीचे माजी मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांनी 15 सप्टेंबरला कार्यकर्ता मेळाव्यात आपण मुख्यमंत्री पदाचा राजीनामा देणार असल्याचे जाहीर केले होते. केजरीवालांनी राजीनामा दिल्यानंतर अपेक्षेप्रमाणे आतिशी यांचेच नाव पुढील मुख्यमंत्री म्हणून जाहीर केले. विधिमंडळ पक्षाच्या बैठकीत आतिशी यांची मुख्यमंत्री म्हणून निवड करण्यात आली.

***दिल्लीच्या तिसऱ्या महिला मुख्यमंत्री***

*आतिशी या दिल्लीच्या तिसऱ्या महिला मुख्यमंत्री ठरल्या. त्यांच्या आधी भाजपच्या सुषमा स्वराज आणि काँग्रेसच्या शीला दीक्षित दिल्लीच्या मुख्यमंत्री होत्या. काँग्रेसच्या शीला दीक्षित 1998 मध्ये दिल्लीच्या मुख्यमंत्री झाल्या. जवळपास 15 वर्षे 25 दिवस त्या मुख्यमंत्री होत्या. तर भाजपच्या फायरब्रँड नेत्या सुषमा स्वराज 1998 मध्ये केवळ 52 दिवसांसाठी दिल्लीच्या मुख्यमंत्री होत्या.*

***आतिशी यांच्यासह आणखी 5 कॅबिनेट मंत्री***

*आतिशी यांच्यासोबत आपचे आमदार गोपाल राय, सौरभ भारद्वाज, कैलाश गेहलोत, इम्रान हुसेन आणि मुकेश अहलावत यांनी देखील मंत्रीपदाची शपथ घेतली आहे. दरम्यान, सुलतानपूर माजरा येथील आमदार मुकेश अहलावत पहिल्यांदाच दिल्ली सरकारमध्ये मंत्री झाले आहेत. गोपाल राय, सौरभ भारद्वाज, कैलाश गेहलोत, इम्रान हुसैन हे अरविंद केजरीवाल यांच्या नेतृत्वाखालील सरकारमध्ये कॅबिनेट मंत्री होते.*

## सत्ताधाऱ्यांनी सगळंच गहाण ठेवलंय

**प्रतिनिधी**
**मुंबई**

मी जम्मू आणि काश्मीरचा राज्यपाल असताना माझ्याकडे भारतातील बडे उद्योगपती अंबानी यांची एक फाईल सहीसाठी आली होती. पण मी त्यांचे काम केलं नाही, असं जम्मू आणि काश्मीरचे माजी राज्यपाल सत्यपाल मलिक यांनी आज सांगितले. मुंबईतील यशवंतराव चव्हाण सेंटर इथं निर्धार महाराष्ट्राचा आणि भारत जोडो अभियान आयोजित जनसभा पार पडली. सत्ताधाऱ्यांनी सगळंच गहाण ठेवलंय, अशी कठोर टीका यावेळी मलिक यांनी मोदी सरकारवर केली.

या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून जम्मू आणि काश्मीर, गोवा आणि मेघालयचे माजी राज्यपाल सत्यपाल मलिक उपस्थित होते. यावेळी खासदार संजय राऊत आणि अरविंद सावंत यांनी देखील उपस्थिती लावली.



मलिक म्हणाले, या लोकांनी ठरवलं आहे की शेती संपवायची, सैन्य संपवायचं. सध्या देशात सरकारी एजन्सीजचा गैरवापर सुरू आहे. मी राज्यपाल म्हणून नियुक्ती झालो त्यावेळी दोन फाईल माझ्यासमोर आल्या. यामध्ये एक फाईल ही अंबानी यांची होती. त्यात काही चुकीचं नव्हतं म्हणून मी त्यावर कारवाई करण्यास नकार दिला. त्यावर मला अधिकाऱ्याने सांगितलं की दीडशे कोटी मिळणार आहेत. मी सांगितलं मला काही नकोय. मी असेपर्यंत असं काहीच होणार नाही. मी दिल्लीत सांगितलं की मला असं काही जमणार नाही. मात्र त्या दिवसापासून माझ्यासोबत त्या अधिकाऱ्यांची वागणूकच बदलली. माझ्या गावच्या घरी सीबीआयची टीम चौकशीसाठी पाठवली गेली, असा किस्सा यावेळी सत्यपाल मलिक यांनी सांगितला. दरम्यान, महाराष्ट्रात आगामी काळात विधानसभा निवडणुका पार पडणार आहेत. यापार्श्वभूमीवर मलिक म्हणाले, देशात जबरदस्त लढाई सुरू आहे आणि आता तुम्ही जिंकण्याच्या जवळ आला आहात. जर तुम्ही पराभूत होणार असता तर हरयाणासोबत महाराष्ट्राची निवडणूक लागली असती. हरयाणात मोदी जर विनासुरक्षा गावात गेले तर काही खरं नाही. या लोकांनी काही उद्योगपतींकडे सगळंच गहाण ठेवलंय, अशा शब्दांत सत्यपाल मलिक यांनी पुन्हा एकदा मोदी सरकारवर हल्लाबोल केला.

## केंद्रीय निवडणूक आयोग येणार महाराष्ट्र दौऱ्यावर

**प्रतिनिधी**
**नवी दिल्ली**

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीचा कार्यक्रम जवळपास निश्चित झाला असून या महिन्या अखेरीस त्याची घोषणा होईल, अशी शक्यता आहे. 27 आणि 28 सप्टेंबर रोजी केंद्रीय निवडणूक आयोगाची टीम महाराष्ट्र दौरा करणार आहे. महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीचे पडघम वाजण्यास सुरुवात झाली असून सगळे राजकीय पक्ष त्यादृष्टीने तयारीला देखील लागले आहेत. दिवाळी नंतर किंवा नोव्हेंबर अखेरीस निवडणुका होतील, असा अंदाज असला तरी त्याच्या अधिकृत तारखा मात्र अद्याप जाहीर झालेल्या नाहीत.

दरम्यान, या महिन्याअखेरीस महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुकीचा कार्यक्रम कळण्याची शक्यता आहे. कारण, येत्या 27 आणि 28 सप्टेंबर रोजी केंद्रीय निवडणूक आयोगाची टीम महाराष्ट्र दौरा करणार आहे. त्यामुळेच महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीचा कार्यक्रम जवळपास निश्चित झाल्याचे मानले जात आहे. या दौऱ्याबाबत एक पत्रच मुख्य निवडणूक आयोगाने राज्य मुख्य निवडणूक अधिकाऱ्याला पाठवले आहे.

## सत्ताधारी-विरोधक राजकारणात व्यस्त, जनतेचं लक्ष वेगळीकडे वळवण्याचं काम सुरू

**प्रतिनिधी**
**मुंबई**

सत्ताधारी-विरोधक राजकारणात व्यस्त आहेत.त्यांचं जनतेचं लक्ष वेगळीकडे वळवण्याचं काम सुरू आहे, असं आज राज ठाकरे वरळीत म्हणाले. तुम्ही महाराष्ट्राचे मालक आहात, तुम्ही कसले रडताय? इतर राज्यातील लोक येतात. झोपडपट्टी बांधतात आणि नवीन घर मिळवतात. कारण तुम्ही योग्य वेळी काही करत नाही. बाहेरच्या राज्यातील लोकांची टगेगिरी सुरू झाली की त्यांना हवं



ते मिळतं. 2 कुटुंबाला एक पार्किंग हा अजब प्रकार इथे दिसला, असं मनसे पक्षप्रमुख राज ठाकरे म्हणाले आहेत.

आज आमदार आदित्य ठाकरेंच्या वरळी मतदारसंघात मनसेकडून व्हिजन वरळी या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी मनसे पक्षप्रमुख राज ठाकरे या कार्यक्रमाला उपस्थित होते. राज ठाकरे यांच्या हस्ते व्हिजन वरळी या कार्यक्रमाचे उद्घाटन झाले. यानंतर राज ठाकरे यांनी उपस्थितांसोबत संवाद साधला आहे. यावेळी त्यांनी महाराष्ट्रातील राजकारण, मालवण घटना, तसेच मुंबईत परप्रांतीयांचे राहणे या प्रश्नांवर भाष्य केले आहे. तसेच राज्य सरकारची कान उघडणीही केल्याचे दिसून आले आहे.

# राहुल गांधींना धमक्या देणारे सत्ताधारी अजून मोकाट

### काँग्रेस नेत्यांनी घेतली राज्यपालांची भेट, कडक कारवाई करण्याचे मिळाले आश्वासन

**प्रतिनिधी**
**मुंबई**

राज्यातील कायदा व सुव्यवस्था पूर्णपणे ढासळली असून राज्यात राजकीय व सामाजिक अस्थिरता निर्माण झाली आहे. विदर्भ आणि मराठवाड्यातील अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना अद्याप मदत मिळाली नाही. यामुळे जनतेमध्ये, शेतकरी वर्गात प्रचंड प्रमाणात अस्वस्थता आहे. या सर्व प्रश्नांवर काँग्रेस पक्षाच्या शिष्टमंडळाने आज राज्यपालांची भेट घेऊन निवेदन दिले.

काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांच्या नेतृत्वाखालील या शिष्टमंडळात विधिमंडळ पक्षाचे नेते बाळासाहेब थोरात, विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार, माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण, प्रदेश कार्याध्यक्ष नसीम खान, चंद्रकांत हंडोरे, मुंबई काँग्रेस अध्यक्ष खा. वर्षा गायकवाड, चरणसिंह सप्रा, सचिन सावंत उपस्थित होते.



मालवण येथे महाराष्ट्राचे अराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराजांचा फक्त पुतळा कोसळला नाही तर महाराष्ट्राचा स्वाभिमान कोसळला. या पुतळ्याच्या कामात भ्रष्टाचार करणा-यांवर अद्याप कारवाई केली नाही. सत्ताधारी पक्षाच्या नेत्यांकडून सातत्याने महाराष्ट्राच्या समृद्ध राजकीय परंपरेला काळीला फासला जात आहे. आमदार संजय गायकवाड यांनी राहुल गांधी यांची जीभ कापणाऱ्यास बक्षीस देण्याची तर खासदार अनिल बोंडे यांनी राहुल गांधी यांच्या जिभेला चटके देण्याची विधाने केली आहेत. लोकशाहीत विरोधकांवर टीका करण्याचा अधिकार प्रत्येकाला आहे, पण विरोध करताना जीवाला धोका निर्माण करणे, हिंसेला प्रवृत्त करण्याची भाषा लोकप्रतिनिधींनी वापरणे हे कायद्याला धरून नाही. या प्रकरणात मुख्यमंत्री, गृहमंत्र्यांनी आणि पोलिसांनी खेदाने बघ्याची भूमिका घेतली. गुन्हा दाखल करण्यासाठी देखील काँग्रेस नेत्यांना आंदोलन करावी लागली त्यानंतर गुन्हे दाखल झाले, पण आमदार संजय गायकवाड आणि खासदार अनिल बोंडे यांना अजूनही अटक करण्यात आलेली नाही. प्रक्षोभक विधाने करून धार्मिक तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न करणा-या आमदारांवर पोलिस कारवाई करत नाही याचा अर्थ राज्यात दंगली घडवण्याचा सत्ताधारी पक्षांचा कट आहे का?

मराठवाड्यात अतिवृष्टी झाली, शेतकऱ्याचे सहा लाख हेक्टर वरील पिकांचे नुकसान झाले. अजूनही याचे पंचनामे झालेले नाहीत. केंद्रीय कृषी मंत्री यांनी आंध्र प्रदेश आणि तेलंगणा राज्याचा दौरे करून मदत जाहीर केली पण महाराष्ट्रात मात्र अजूनही केंद्रीय कृषी मंत्री किंवा केंद्रीय पथक पाहणी करण्यास आले नाही. महाराष्ट्रातील शेतकऱ्यांबाबत इतका दूजाभाव का ? या राज्यातील शेतकऱ्यांच्या व्यथा दिसत नाही का त्यांना मदत करण्याची पान 3 वर

## म ह त्त्वा चे

### देशाच्या जडणघडणीत 'जितो'चे योगदान

**मुंबई :** जैन इंटरनॅशनल ट्रेड ऑर्गनायझेशनने आपला व्यवसाय वृद्धींगत करताना सामाजिक बांधिलकी जपून सर्वांसमोर एक आदर्श ठेवला आहे. आपण केलेले कार्य हे फक्त स्वत:पुरते मर्यादित नसून देशाच्या आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक जडणघडणीत त्याचे मोलाचे योगदान असल्याचे गौरवोद्गार राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांनी काढले. जैन इंटरनॅशनल ट्रेड ऑर्गनायझेशन (जिटो) च्या आभार प्रदर्शन कार्यक्रमाचे आयोजन जिओ सेंटर येथे करण्यात आले. या कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून राज्यपाल सी.पी.राधाकृष्णन बोलत होते. या कार्यक्रमास जिटोचे वरिष्ठ पदाधिकारी उपस्थित होते. राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांनी जैन इंटरनॅशनल ट्रेड ऑर्गनायझेशन च्या उल्लेखनीय कामगिरीत योगदान देणाऱ्या सर्वांचे अभिनंदन केले.



### आधार कार्डचा नंबर वापरून गैरप्रकाराचे 30 गुन्हे दाखल

**मुंबई :** गेल्या काही महिन्यांपासून राज्यात मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेची जोरदार चर्चा सुरू आहे. लाभार्थी महिलांना राज्य सरकारकडून पैसेही देण्यात आहेत. मात्र दुसरीकडे सरकारकडून मिळणाऱ्या पैशाचा लाभ घेण्यासाठी गैरप्रकारही सुरू आहेत. काही दिवसांपूर्वी साताऱ्यातील एका महाभागाने पत्नीच्या नावे तब्बल 30 अर्ज भरून हजारो रुपये लाटल्याचा प्रकार समोर आला होता. यानंतर लाडकी बहीण योजनेसाठी 12 भावांनी अर्ज केल्याचेही समोर आले आहे. मात्र यानंतरही गैरप्रकार काही थांबताना दिसत नाहीत. राज्यभरातून हजारो तक्रारी दाखल झाल्या असून आतापर्यंत 30 गुन्हे दाखल करून संबंधितांना ताब्यात घेण्यात आले आहे. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेअंतर्गत राज्य सरकारकडून जुलै महिन्यापासून महिलांना दीड हजार रुपये देण्यात येत आहेत. या याजनेचा लाभ राज्य सरकारने महिलांना अर्ज भरण्यासाठी 30 सप्टेंबरपर्यंत मुदतवाढ दिली आहे. राज्यभरातून ऑफलाइन आणि ऑनलाइन अर्ज प्राप्त होत आहेत. मात्र काही लोक गैरप्रकार करून योजनेचा लाभ घेण्याचा प्रत्न करत आहेत.

### बंगळुरुमध्ये 'श्रद्धा वालकर' फ्रिजमध्ये आढळले 29 वर्षांच्या तरुणीचे 30 तुकडे

**बंगळुरु:** दिल्लीतील श्रद्धा वालकर प्रकरणाच्या आठवणी अद्यापही आपल्या स्मरणात असतील. यातच आता बेंगळुरूमधील मल्लेश्वरममधून एक अशीच घटना समोर आली आहे. येथे एका 29 वर्षीय तुरुणीच्या मृतदेहाचे 30 तुकडे करून ते फ्रीजरमध्ये ठेवल्याचे आढळून आले आहे. पोलिसांनी शनिवारी यासंदर्भात माहिती दिली. साधारणपणे दोन आठवड्यांपूर्वीच तुरणीची हत्या करण्यात आली आहे. तिची ओळख पटली असून तपासाच्या कारणास्तव अधिक माहिती शेअर करण्यात आलेली नाही. स्थानिक सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, ती तीन महिन्यांपूर्वीच या फ्लॅटमध्ये बाड्याने राहण्यासाठी आली होती. प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेत पोलिसांनी तातडीने तपास सुरू केला आहे. तरुणीच्या हत्येनंतर तिच्या मृतदेहाचे तुकडे करण्यात आल्याचे अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे. याप्रकरणीही संशयितांचा शोध सुरू आहे.

# साडेतीन लाखांचा ऑनलाइन गंडा

**मुंबई :** साडेतीन लाखांची ऑनलाइन फसवणूक झाल्याचा प्रकार कांदिवलीत दोन दिवसांपूर्वी उघडकीस आला आहे. याप्रकरणी कांदिवली पोलिसांनी अज्ञात व्यक्तीविरुद्ध फसवणुकीसह आयटी कलमांतर्गत गुन्हा नोंदवून तपास सुरू केला आहे. ४० वर्षांचे तक्रारदार कांदिवली परिसरात राहत असून याच परिसरात त्यांचा वडापाव विक्रीचा स्टॉल आहे. १५ सप्टेंबरला ते त्यांच्या स्टॉलवर काम करत होते. यावेळी त्यांना त्यांच्या मोबाईलवर एका ऑनलाइन व्यवहार झाल्याचे दिसून आले. त्यांनी ते मॅसेज पाहिले असता त्यांच्या बँक खात्यातून चार ऑनलाइन व्यवहार होऊन सुमारे साडेतीन लाख रुपये डेबिट झाले होते. त्यांनी कोणाशी व्यवहार किंवा पैसे पाठविले नव्हते. तरीही त्यांच्या बँक खात्यातून ऑनलाइन व्यवहारात पैसे डेबिट झाले होते. त्यामुळे त्यांनी सायबर हेल्पलाइन क्रमांकावर ऑनलाइन तक्रार केली होती. यावेळी त्यांना स्थानिक पोलिस ठाण्यात तक्रार करण्याचा सल्ला देण्यात आला होता. त्यामुळे ते बँकेत गेले होते. त्यांनी त्यांच्या व्यवहाराचा तपशील पाहिला असता त्यांच्या बँक खात्यातून इतर चार बँक खात्यांत ही रक्कम ट्रान्स्फर झाली होती. त्यानंतर त्यांनी संबंधित स्टेटमेंट घेऊन कांदिवली पोलिस ठाण्यात आले होते. तिथे त्यांनी अज्ञात व्यक्तीविरुद्ध तक्रार केली होती. त्यांच्या तक्रार अर्जानंतर पोलिसांनी अज्ञात व्यक्तीविरुद्ध फसवणुकीसह आयटी कलमांतर्गत



## थोडक्यात

### जव्हारमध्ये रुग्णांना ब्लँकेटचे वाटप

**जव्हार:** इस्लाम धर्माचे प्रेषित हजरत मुहम्मद पैगंबर यांच्या जन्मोत्सव (ईद-ए-मिलाद) निमित्त कुटीर रुग्णालयात २०० रुग्णांना रिझवी मोहल्ल्याचे हाजी अर्षद कोतवाल यांनी ब्लँकेटचे वाटप केले. यावेळी जव्हार पोलिस निरीक्षक किशोर मानभाव, पालघरचे जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. रामदास मराड, वैद्यकीय अधिकारी डॉ. भरतकुमार महाले, डॉ. संजय कावळे, मस्जिद मार्केट ट्रस्ट, अध्यक्ष अलताफ गुलाम हुसेन शेख, माजी नगरसेवक रहीम लुलानीय, माजी नगरसेवक जब्बार मेमन, अल्लारखा शेख, अजू कोतवाल आदी उपस्थित होते.

### अंधेरीत लाखो लिटर पाण्याची नासाडी

**मुंबई:** अंधेरी-कुर्ला रोडला जोडलेल्या औद्योगिक क्षेत्रातील महाकाली गुफा रोडच्या मुख्य जंक्शनवरील जलवाहिनीच्या मुख्य चेंबरला गळती लागल्याने पाण्याची नासाडी होत आहे. गेल्या दहा दिवसांपासून दुपारी चार वाजल्यापासून ते रात्री उशिरापर्यंत लाखो लिटर पाणी वाया जात आहे. पादचारी, वाहनचालकांना प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे. पालिकेने या जलवाहिनीची दुरुस्ती करावी, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते राजेश पंड्या यांनी केली आहे.

### पोलिसांना अल्पोपहार वाटप

**पालघर:** गणेश चतुर्दशीच्या दिवशी कुटुंबापासून दूर राहून, सण-उत्सवावर आणि मुला-बाळांच्या आनंदावर विरजण टाकून सर्वसामान्य जनतेला सण-उत्सव आनंदात साजरे करता यावेत, म्ह णून सुरक्षा पुरवणारे महाराष्ट्र पोलिस अहोरात्र कर्तव्यावर असतात. या सर्वांची कृतकृत्यता म्हणून युवासेनेचे पालघर जिल्हायुवाधिकारी रॉकी तांडेल यांनी विश्वास पाटेकर, आसनी किरण फाटक यांच्या मार्गदर्शनाखाली बोईसर, पालघर आणि डहाणू क्षेत्रात बंदोबस्तावर असणाऱ्या पोलिसांना फराळ, अल्पाहार आणि पिण्याचे पाणी याचे वाटप करण्यात आले. पालघर, केळवे, सातपाटी, सफाळे, मनोर, बोईसर, पाचमार्ग, डहाणू, तलासरी पोलिस ठाण्यातील अधिकारी, कर्मचारी यांना तांडेल आणि त्यांच्या टीमने प्रत्यक्ष भेटी देऊन अल्पाहार दिला. शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे, पक्षप्रमुख उद्धव ठाकरे, युवासेना प्रमुख आदित्य ठाकरे यांना अभिप्रेत असलेले ८० टक्के समाजकारण आणि २० टक्के राजकारण या तत्त्वाने पुढेही युवासेना आणि शिवसेना यांच्यामार्फत समजोपयोगी उपक्रमांचे आयोजन करत राहू, असे रॉकी तांडेल यांनी सांगितले.

**महत्त्वपूर्ण निवेदन**

वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीचा मजकूर स्वीकारण्यापूर्वी काळजी घेतली जात असली तरी त्याच्या आशयाची पडताळणी करणे शक्य होत नाही. तरी आपल्या वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील जाहिरातदार कंपन्या, सहयोगी संस्था अथवा व्यक्तीबरोबर व्यवहार केल्यामुळे कोणत्याही स्वरूपाचे नुकसान व हानी झाल्यास त्यासाठी अथवा संबंधित जाहिरातीतील आशयासाठी मरिक मीडिया अँड कम्युनिकेशन्स प्रा. लि.ला जबाबदार ठरविता येणार नाही. त्यामुळे जाहिरातदारांना कोणतीही रक्कम प्रेषित करण्यापूर्वी अथवा त्याच्याबरोबर कोणत्याही स्वरूपाचे संमतिपत्र कार्यसिद्ध करण्यापूर्वी अथवा एखाद्या जाहिरातीवर आधारित कोणतीही कृती करण्यापूर्वी वाचकांनी आवश्यकती चौकशी करण्याची खबरदारी घ्यावी.

# सागरी किनारी प्रदूषणमुक्तीची हाक

प्रतिनिधी
■ वसई

समुद्राला प्रदूषणाचा विळखा वाढत आहे. त्यामुळे सागरी जैवविविधता धोक्यात आली आहे. समुद्र किनाऱ्याच्या आजूबाजूच्या गावाला आरोग्याचा धोका निर्माण होण्याची शक्यता आहे, याची व्यापक स्वरुपात जनजागृती करण्यात येत आहे. किनारे स्वच्छ, नीटनेटके राहावेत, यासाठी वसईविरार महापालिका आणि गो शून्य या संस्थेने किनारा स्वच्छता मोहीम हाती घेतली आहे. पर्यावरण संवर्धनाच लक्ष्य असलेल्या या मोहिमेला चांगला प्रतिसाद मिळाल्याचे दिसून आले.

स्वच्छ सागर, प्रदूषणमुक्त सागर अशी हाक देत वसई तालुक्यातील सागरी किनारा स्वच्छता मोहिमेला आज (ता. २१) प्रारंभ करण्यात आला. या वेळी १३ हजारांहून अधिक विद्यार्थी व विविध सामाजिक संस्थांच्या कार्यकर्त्यांनी सहभाग घेतला होता. प्रदूषण रोखण्यासाठी हजारो विद्यार्थी,



नागरिकांचे समुद्रकिनारी उधाण आले होते. राजोडी ते कळंब या अडीच किलोमीटरच्या पट्ट्यात स्वच्छता मोहीम आयोजित केली होती. या मोहिमेसाठी वसई-विरार पालिकेचे माजी महापौर राजीव पाटील हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. प्रमुख पाहुण्यांनी समुद्रकिनाऱ्यावरील कचरा उचलून स्वच्छता मोहिमेला आरंभ केला. या मोहिमेत शाळांसह महाविद्यालयांचे विद्यार्थी, तीन सेवाभावी संस्थांच्या स्वयंसेवकांसह नागरिक सहभागी होऊन सफाई केली. एवढ्या मोठ्या संख्येने नागरिकांनी एकत्र येऊन समुद्रकिनारा स्वच्छ करण्याची मोहीम राबविल्याने विक्रम प्रस्थापित झाला आहे. या विक्रमाची नोंद वर्ल्ड बुक ऑफ रेकॉर्ड्‌समध्ये नोंद होण्यासाठी प्रयत्न करण्यात येत आहे.

**१३ हजार जणांचा सहभाग, तर ५१ टन कचरा संकलित**

*या मोहिमेत ४७ शाळांसह १९ महाविद्यालयांचे विद्यार्थी, तीन सेवाभावी संस्थांचे स्वयंसेवक आणि नागरिक मिळून सामाजिक संस्थांचे कार्यकर्ते, अग्निशमन जवान, स्वंयसेवक, बचत गटाच्या महिला, पर्यावरणप्रेमी मिळून १३ हजारांहून अधिक जण सहभागी झाले होते. या वेळी ५१ टन कचरा संकलित करण्यात आला आहे. या मोहिमेची जागतिक विक्रमात नोंद करण्यात येत आहे.*

**प्लॅस्टिकजा पुनर्वापर**

*गो शून्य या संस्थेमार्फत प्लॅस्टिक पुनर्वापराचे प्रात्यक्षिक दाखविण्यात आले. संकलित झालेल्या ५१ टन कचऱ्यापैकी ६५० किलो टाकाऊ प्लॅस्टिकपासून चुरा तयार करण्यात आला. विविध साच्यांचा वापर करून कुंडी, किचेन, कानातील दागिने, ग्लास, कप आदी वस्तू बनविण्यात आल्या.*

राजोडी ते कळंब या अडीच किमीच्या पट्ट्यात स्वच्छता मोहीम आयोजित केली होती. महापालिकेचे आयुक्त अनिलकुमार पवार यांच्या मार्गदर्शनाखाली पालिका अधिकारी, कर्मचारी यांनी केलेल्या नियोजनामुळे ही मोहीम यशस्वी झाली. परिवहनच्या बसची सुविधा केली होती. या वेळी अतिरिक्त आयुक्त रमेश मनाळे, संजय हेरवाडे, तसेच उपायुक्त, सहाय्यक आयुक्त, अभियंते, वैद्यकीय अधिकारी आणि महापालिकेचे कर्मचारी उपस्थित होते.

# मुरबाड मतदारसंघात राष्ट्रवादीची घोंगडी बैठक

प्रतिनिधी
■ मुरबाड

राष्ट्रवादी शरद पवार गटातर्फे मुरबाड विधानसभा मतदारसंघात आमदारकीची निवडणूक लढवणार आहे, अशी माहिती राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते शैलेश वडनेरे यांनी मुरबाड येथे दिली. सध्या मुरबाड तालुक्यात राष्ट्रवादीर्फे आठ जिल्हा परिषद गटात घोंगडी बैठका घेतल्या जात आहेत.

प्रमुख वक्ते शिवाजी विसपुते मुरबाड तालुका पिंजून काढत आहेत. त्या बैठकांची माहिती देण्यासाठी मुरबाड येथे गुरुवारी (ता. १९) पत्रकार परिषद आयोजित केली होती. त्यावेळी वडनेरे यांनी आपल्या उमेदवारीची घोषणा केली. मुरबाड तालुक्याचा विकास अजूनही झालेला नाही. शेतकऱ्यांना रांगा लावून खते विकत घ्यावी लागतात. घरकुल निधी उपलब्ध होत नाही. चांगल्या प्रकारच्या आरोग्य सुविधा नाहीत. तरुणांचे प्रश्न, लॉजिस्टिक पार्क, इन्फॉर्मेशन हब उभारणे गरजेचे असल्याचे वडनेरे यांनी सांगितले. मुरबाड तालुक्यात विकास झाल्याचे चित्र दाखवले जात आहे; परंतु पाणी, वीज, बेरोजगारी, आरोग्य या प्रश्नांबाबत आमदार कथोरे यांची झुंज अपयशी ठरली आहे, अशी टीकाही त्यांनी केली. या पत्रकार परिषदेसाठी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे ठाणे जिल्हा अध्यक्ष मुकेश पाटील, ओबीसी सेलचे प्रदेश उपाध्यक्ष मधुकर विसपुते, ठाणे जिल्हा उपाध्यक्ष मेहेर आजबे, मुरबाड तालुका अध्यक्ष शिवाजी धनके, मुरबाड तालुका कार्याध्यक्ष विलास भावार्थे आदी उपस्थित होते..

# राष्ट्रीय महामार्गावर पादचारी पुलांची कामे अंतिम टप्प्यात

## रस्ते ओलांडून होणारे अपघात रोखणार

प्रतिनिधी
■ वसई

मुंबई अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गावर रस्ते ओलांडून प्रवास करताना अपघाताच्या घटना घडतात. अशा घटना रोखण्यासाठी दहा ठिकाणी पादचारी पूल तयार करण्याचे काम सुरू आहे. आतापर्यंत सात ठिकाणच्या पुलाचे काम पूर्णत्वाच्या मार्गावर आहे.

मुंबई, ठाणे, वसई विरार, मीरा भाईंदर, पालघर यासह गुजरातला जोडणारा मुंबई अहमदाबाद राष्ट्रीय महामार्ग गेला आहे. या महामार्गालगतच अनेक छोटे मोठे गाव पाडे आहेत. या भागातील नागरिकांना दळणवळणासाठी महामार्ग हा एकमेव मार्ग आहे. त्यामुळे गाव पाड्यात राहणाऱ्या नागरिकांना महामार्ग ओलांडून



धोकादायकरित्या प्रवास करावा लागतो. आता महामार्गावर दिवसेंदिवस वाहनांची वर्दळ ही बेसुमार वाढली आहे. त्यामुळे महामार्गालगत राहणाऱ्या नागरिकांना रस्ते ओलांडून प्रवास करणे अधिकच जिकरीचे बनले आहे. विशेषतः शाळकरी विद्यार्थ्यांना रस्ते ओलांडून जाताना अडचणी येत असतात.

यापूर्वीसुद्धा रस्ते ओलांडून प्रवास करताना अनेक घटना घडल्या आहेत. काही जणांचा मृत्यू झाला आहे. यासाठी ज्या ठिकाणी गाव पाडे आहेत त्यांना दोन्ही बाजूने ये जा करण्यासाठी पादचारी उड्डाणपूल तयार करण्यात यावी अशी मागणी करण्यात येत होती. त्यानुसार राष्ट्रीय महामार्गावर महामार्ग प्राधिकरणातर्फे वर्सोवा पुलापासून ते पालघरच्या अच्छाडपर्यंत दहा ठिकाणी पादचारी पूल तयार करण्याचे काम हाती घेण्यात आले आहे. विरार बावखळ टोकरेपाडा, वंगणपाडा नालासोपारा, शिवेचापाडा, कोल्ही चिंचोटी, ससूपाडा अच्छाड, जव्हार फाटा, दुर्वेस व अन्य दोन ठिकाणे यांचा समावेश आहे. यासाठी सुमारे ६९ कोटी रुपये इतका निधी खर्च केला जाणार आहे. ३५० ते ५०० मीटर लांबीचे हे पादचारी पूल आहेत. यापैकी सात पादचारी पुलांचे मुख्य मार्ग व दोन्ही बाजूंच्या उतार मार्गाचे स्ट्रक्चर पूर्णपणे तयार झाले आहे आहे. त्यातील जी काही अत्यावश्यक कामे आहेत ती अवघ्या एका महिन्यात पूर्ण केली जातील असे राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचे व्यवस्थापक सुहास चिटणीस यांनी

# तिकीट निरीक्षकाला प्रवाशाकडून हॉकीस्टिकने मारहाण

## नालासोपारा स्थानकातील घटना

प्रतिनिधी
■ वसई

नालासोपारा स्थानकात तिकीट निरीक्षकाला प्रवाशाकडून हॉकी स्टिकने मारहाण केल्याची घटना घडली आहे. विजयकुमार पंडित असे तिकीट निरीक्षकाचे नाव असून या मारहाणीत गंभीर जखमी झाला आहे

गुरुवारी सकाळी नऊच्या सुमारास विजयकुमार पंडित नालासोपारा रेल्वे स्थानकात प्रवाशांच्या तिकीट तपासणीचे काम करीत होते. याच दरम्यान पश्चिम रेल्वेच्या उपनगरीय लोकल मध्ये एक प्रवासी द्वितीय श्रेणीचे तिकीट घेऊन प्रथम श्रेणीच्या डब्ब्यातून प्रवास करताना आढळून आला.

त्या प्रवाशाला तिकीट अडविल्या नंतर त्याला ३४५ रुपये इतका दंड ठोठावला होता.




त्याच्याकडे फक्त २१० रुपये असल्याचा दावा प्रवाशाने केला होता. त्यामुळे त्याला १५० रुपये इतका दंड आकारला होता. मात्र दंडाची पावती फाडल्यानंतर त्यांच्या बाचाबाची होऊन प्रवाशाने मागून हॉकीस्टिकने तिकीट निरीक्षकाला मारहाण केली. यात एक प्रहार त्यांच्या कानाजवळ झाल्याने पंडित हे जखमी झाले आहेत. त्यांना जवळच्या रुग्णालयात उपचारासाठी नेण्यात ओले. तर मारहाणीनंतर हल्लेखोर प्रवासी फरार झाला आहे.

याप्रकरणी वसई रेल्वे पोलीस ठाण्यात मारहाण करणाऱ्या प्रवाशाच्या विरोधात गुन्हा दाखल केला आहे. त्याचा शोध सुरू असल्याची माहिती वसई रेल्वे पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक भगवान डांगे यांनी सांगितले

# ओम श्री सिद्धिविनायक मित्र मंडळातील कागदी गणेश मूर्तीचे १६ व्या दिवशी उत्साहात विसर्जन

प्रतिनिधी
■ मुंबई

साकीनाका परेरावाडी येथील ओम श्री सिद्धिविनायक मित्र मंडळातील कागदी गणेश मूर्तीचे १६ व्या दिवशी वाजत गाजत, गुलाल उधळत, मोठ्या उत्साहात विसर्जन करण्यात आले. ओम श्री सिद्धिविनायक मित्र मंडळाने सालाबादप्रमाणे याही वर्षी कागदी गणेश मूर्ती ची स्थापना करण्यात आली होती.

चांदिवली विधानसभेतील ओम श्री सिद्धिविनायक मित्र मंडळ गेली 32 वे वर्ष पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करत असून कागदी गणेश मूर्ती चे मुख्य आकर्षण असते. मुंबईचा महाराजाधिराज म्हणून ओम श्री सिद्धिविनायक मित्र



मंडळ ओळखले जात आहे. येथील भव्य 18 फूट कागदी गणेश मूर्ती चे दर्शन घेण्यासाठी विभागातील भाविक भक्त येत होते. विसर्जन 16 व्या दिवशी 21 सप्टेंबर रोजी वाजत गाजत,भव्य मिरवणूक काढून करण्यात आली. मंडळाचे अध्यक्ष सिद्धेश खानविलकर, सेक्रेटरी सौरभ मुळीक, खजिनदार विनीत सुवर्णा, मूर्तिकार राजेश दिगंबर मयेकर, आदिसह मंडळाचे सक्रिय सदस्य व कार्यकर्ते हा गणेशोत्सव यशस्वी करण्यासाठी मेहनत घेत असल्याची माहिती हास्य क्लब चे संचालक दिनेश गोसावी यांनी दिली. मंडळाच्या पर्यावरणपूरक सजावट व गणेश मूर्तीला अनेक पुरस्कार मिळाले आहेत.

# परेरावाडी गणेशोत्सव मंडळात मुंबई पोलीस सुरक्षा शाखेतर्फे जागरूक मुंबईकर अभियान संपन्न

प्रतिनिधी
■ मुंबई

साकीनाका येथील परेरावाडी मोहीली सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाच्या आवरत मुंबई पोलीस सुरक्षा शाखेच्या वतीने जनतेस सुरक्षेचे मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी मंडळाचे पदाधिकारी विश्वस्त प्रकाश सावंत, अध्यक्ष शैलेश खेतले, सरचिटणीस रियाज शेख, खजिनदार राजा भोसले, कार्याध्यक्ष निलेश पाटील, महिला सभासद ज्योत्स्ना कोकणे, आदिसह अन्य पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते. परेरावाडी मोहिली सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाच्या सहयोगाने उत्सव परिसरात मुंबई पोलीस सुरक्षा शाखेच्या वतीने जागरूक मुंबईकर अभियान राबविण्यात आले. या अभियानात हवालदार विष्णू महाले व सौ पद्मावती मेथीस या मार्गदर्शक वक्त्यांनी अतिशय सुंदर असे सायबर क्राईम वर होणारे गुन्हे तसेच



महिलांवरील अत्याचार या सर्व विषयांवर आलेल्या भाविकांना मार्गदर्शन केले तसेच पोलिसांतर्फे जागरूक नागरिकांसाठी माहिती पुरवण्यात आली. यामध्ये महिला सुरक्षा, ज्येष्ठ नागरिक अत्याचार, महिलांवरील अत्याचार, लहान मुलांवरील अत्याचार, असे अनेक गुन्ह्यांवरती योग्य माहितीपूर्ण मार्गदर्शन केले. यावेळी पोलिसांमार्फत लोकांना मदतीसाठी उपयुक्त दूरध्वनी क्रमांक आणि मोबाईल क्रमांक जनतेला पुरवण्यात आले. परेरावाडी मोहिली सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ गेली ५५ वर्ष सामाजिक संदेश देणारे देखावे आणि समाज प्रबोधन करणारे उपक्रम राबवित असते ह्याला विभागातील नागरिक चांगला प्रतिसाद देते तसेच मंडळाला आर्थिक सहकार्य ही करत असल्याचे मंडळाचे माजी पदाधिकारी अर्जुन मस्के यांनी सांगितले.

# महाराष्ट्रातही मंदिरांमधील प्रसादाचा दर्जा तपासण्याची आत्मसन्मान मंचची मागणी

प्रतिनिधी
■ मुंबई

देशातील सर्वाधिक प्रसिद्ध असलेल्या आणि श्रीमंत देवस्थान असलेल्या तिरुमला तिरुपती बालाजी मंदिरातील प्रसादात भेसळ असल्याचा मुद्दा चांगलाच चर्चेत आला आहे. या मंदिरातील प्रसादात प्राण्याच्या चरबीचा वापर होत असल्याचा आरोप केला गेल्याने या मुद्द्याला चांगलेच तोंड फुटले आहे तसेच या मुद्द्यावरून राजकारण देखील तापले आहे. तिरुपती बालाजी मंदिरातील लाडू प्रसादाचा मुद्दा पुढे आल्यानंतर आता महाराष्ट्रातील शिर्डी साईबाबा मंदिर, पंढरपूरचे विठ्ठल मंदिर, कोल्हापुरातील महालक्ष्मी मंदिर, सिद्धिविनायक मंदिर, त्र्यंबकेश्वर मंदिर, तुळजापूर मधील भवानी मंदिर आणि प्रमुख मंदिरांतील

*मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना निवेदनातून केली विनंती*



प्रसादाच्या गुणवत्तेची चौकशी करण्याची मागणी आता पुढे आली आहे. मुंबईतील आत्मसन्मान मंच या संस्थेकडून ही मागणी करण्यात आली आहे. राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे याना पत्र लिहून ही मागणी केल्याचे आत्मसन्मान मंचचे अध्यक्ष नित्यानंद शर्मा यांनी सांगितले.

## महाराष्ट्र राज्य लॉटरीमध्ये सुमित एजन्सीचा महाविक्रम

# ५० लाखाची गणेशोत्सव बंपर लॉटरी अंधेरीच्या विकास लॉटरीने जिंकली

प्रतिनिधी
■ मुंबई

महाराष्ट्र राज्य लॉटरीची गणपती भव्यतम सोडतीचा निकाल जाहीर झाला असून मुंबईच्या सुमित एजन्सीला (प्रिन्स एजन्सी मार्फत) ५० लाख रूपयांचे पहिले बक्षीस मिळाले आहे. महाराष्ट्रातील नामांकित सुमित एजन्सीने पुन्हा एकदा बक्षिसांचा हा महाविक्रम केला आहे. महाराष्ट्र राज्य लॉटरीला एक परंपरा असून यंदाचे ५५ वे वर्ष आहे गणेशोत्सवातील लॉटरीला ग्राहकांच्या मनात श्रद्धेचे व विश्वासाचे स्थान असून सुमित एजन्सीने आजवर शासनाच्या या अधिकृत लॉटरीचा पुरस्कार केला आहे. सुमित एजन्सी






तर्फे वितरक प्रिन्स एजन्सी, अंधेरी येथील विक्रेते विकास लॉटरी सेंटर, आणि विजेत्या ग्राहकाचे मनःपूर्वक अभिनंदन केले आहे. शुक्रवारी नवी मुंबई येथील लॉटरी सोडत सभागृहात सोडत काढण्यात आली असून ग्राहक, विक्रेते, ठेकेदार यांच्यात निकालाबद्दल कुतूहल होते निकाल जाहीर झाल्यानंतर गणपती बाप्पा मोरया च्या उत्स्फूर्त घोषणा देण्यात आल्या. ५० लाखाचे पहिले बक्षीस सुमित एजन्सी सह दुसरी १ लाखाची ५ बक्षिसे असून सर्वस्वी दादर येथील गणेश एजन्सी, हरी श्री लॉटरी सेंटर नालासोपारा, कोल्हापूर येथील महावीर लॉटरी सेंटर, आणि बोरीवली येथील वैशाली लॉटरी सेंटर यांना मिळाले अन्य लाखो रुपयांची बक्षिसे सोडतीतुन जाहीर करण्यात आली.

# अटल सेतूवर आयटीएमएसची करडी नजर

प्रतिनिधी
■ मुंबई

आता जर तुम्ही अटल सेतूवरून प्रवास करताना नियम मोडले तर तुम्हाला महागात पडणार आहे. कारण आता लवकरच अटल सेतू मार्गावर इंटेलिजंट ट्रॅफिक मॅनेजमेंट सिस्टीम तुमच्यावर करडी नजर ठेवणार आहे. पुढील आठवड्यात परिवहन विभागाद्वारे या यंत्रणेची चाचणी केली जाणार असल्याची माहिती परिवहन अधिकाऱ्यांनी दिली आहे.

आयटीएमएसची चाचणी पूर्ण झाल्यावर याद्वारे अटल सेतूवर वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर योग्य ती कारवाई करण्याची भूमिका घेतली जाणार आहे. अटल सेतूवरील ये जा करणाऱ्या वाहतुकीवर नजर ठेवण्यासाठी आता 347 सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले आहेत. तसेच या कॅमेऱ्यांमध्ये इन्सिडेंट डिटेक्शन नावाची प्रणाली आहे.

**CHANGE OF NAME**

I the undersigned **Meghashyam Kanoji Kocharekar**, mentioned that my previous name **Meghasham Kanoji Kocharekar**;

My new name is **Meghashyam Kanoji Kocharekar** will be known in future.

sd/-
**Meghashyam Kanoji Kocharekar**

**PUBLIC NOTICE**

Notice is hereby given to public at large that my client Mr. Khayyum Abdul Ali Sayyad Resident of B-5, Parizad Apartment, Dindayal Nagar, Vasai West, Taluka Vasai District Palghar - 401202 have wrongly mentioned his name as Khayyum Abdul Aziz Sayyad in Birth Certificate of his daughter Hurriya Fatima Khayyum Sayyad. The correct spelling and name of my client is Khayyum Abdul Ali Sayyad and same should be consider for all purpose.

**Dated: 22/09/2024**
**Place:- Vasai**

**Sd/-**
**Adv. Ramzanali Malik**
**Having office at;**
**Sanrkuti Apartment Shop No.15, Court road, Near G. G. College, Vasai West, Tal. Vasai, Dist. Palghar Pin No. 4041201.**
**Mobile No.8369183620**

Printed and Published by **Bhushan B.Mhatre** for Owner **Marik Media And Communication Pvt .Ltd.** at S.R.Publicatiinns ,Mohan Arjun Compound ,Godown No. 8,9 And 10 , Near Ghartan Pada ,Vaishali Nagar ,Last Bus Stop ,Dahisar (E ) ,Mumbai -400068 and Published From Marik Media And Communication Pvt .Ltd.,102, Shyam Sunder Sadan ,Sitaram Jadhav Marg, Lower Parel ,Mumbai 400013. Editor - **Deepak B. Mhatre**, E-mail vruttmanas1@ gmail.com ,telephone 2498546,24985609. Resident Editor - **Sham Deulkar**

**As per PRB Act Editorial Responsibilities On Deepak B. Mhatre Nespaper Related Desputes Lies Under Jurisdiction of Mumbai Courts**

**Year - Twenty Nine**
**Issu - 92**
**R.N.I. Registration No. - 65609/96**

मुद्रक आणि प्रकाशक **भूषण भा. म्हात्रे** यांनी मालक **मरिक मीडिया अँड कम्युनिकेशन्स प्रा. लि.** साठी, एस. आर. पब्लिकेशन, मोहन अर्जुन कंपाऊंड, गोडाऊन नं. ८,९ आणि १०, घारटन पाडाजवळ, वैशालीनगर लास्ट बस स्टॉप, दहिसर (पूर्व), मुंबई - ४०० ०६८ येथे छापून मरिक मीडिया अँड कम्युनिकेशन्स प्रा. लि., १०२, श्याम सुंदर सदन, सीताराम जाधव मार्ग, लोअर परळ (पश्चिम), मुंबई - ४०० ०१३ येथून प्रकाशित केले. संपादक - **दीपक भा. म्हात्रे,** E-mail: vrittamanas1@gmail.com दूरध्वनी क्रमांक - २४९८५४६, २४९८५६०९ निवासी संपादक - **शाम देऊलकर**

**पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी दीपक भा. म्हात्रे यांच्यावर राहील. सदर वृत्तपत्रासंबंधीच्या विवादित बाबी मुंबई न्यायालय क्षेत्रात येतील.**

**वर्ष- एकोणतीसावे**
**अंक - ९२**
**आर.एन.आय. रजिस्ट्रेशन क्र.- ६५६०९/९६**

## कोस्टल रोड विकेंडलाही सुरु राहणार

**मुंबई :** कोस्टल रोडच्या उत्तरेकडे जाणाऱ्या कॅरेजवेवरील प्रवासाचे तास एका तासाने वाढवले गेले आहेत, तसंच हा मार्ग आठवड्याच्या शेवटी देखील प्रवासासाठी खुला असणार आहे, असं बीएमसीने शुक्रवारी जाहीर केलंय. त्यामुळे आता नवीन वेळेसह वाहनचालकांना मरीन ड्राइव्हवरून कोस्टल रोडवर आठवड्याचे सातही दिवस प्रवास करता येणार आहे. दिवसात १७ तास प्रवास करता येणार असल्याची माहिती मिळतेय. कोस्टल रोडचा दक्षिणेकडील भाग वांद्रे-वरळी सी-लिंकला जोडल्यानंतर आता आठवड्यातील सर्व दिवस नागरिकांना या मार्गाचा वापर करता येणार आहे. बीएमसी कोस्टल रोड विभागाच्या अधिकाऱ्याने दिलेल्या माहितीनुसार, ही सुविधा चालकांसाठी २१ सप्टेंबरपासून उपलब्ध होणार आहे. आता सकाळी ७ ते मध्यरात्री १२ पर्यंत कोस्टल रोडचा वापर करता येणार आहे. पूर्वी हा मार्ग सकाळी ७ ते रात्री ११ या वेळेतच वाहनांसाठी खुला होता. आतापर्यंत शनिवार आणि रविवारी वाहनांना प्रवास करण्यास बंदी होती.



# आंतरराष्ट्रीय सागरी किनारा स्वच्छता दिनानिमित्त जुहू किनाऱ्यावर स्वच्छता अभियान

- स्वच्छता ही सवय बनावी - राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन
- समुद्र किनारे स्वच्छ ठेवण्याची जबाबदारी प्रत्येकाची - मुख्यमंत्री

**प्रतिनिधी**
■ मुंबई

प्रत्येक मोठ्या कार्याची सुरुवात लहान लहान बाबींनी होत असते. सागरी किनारा स्वच्छतेसाठी आज जनजागृतीचा दिवस असून किनारा स्वच्छतेची ही सुरुवात मोठे रूप धारण करून 'स्वच्छ भारत, महान भारत' संकल्पनेला आकार देईल, असे प्रतिपादन राज्यपाल सीपी राधाकृष्णन यांनी केले. तर, समुद्रकिनारे स्वच्छ ठेवण्याची जबाबदारी प्रत्येकाची असल्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले.

सागरी किनारा स्वच्छतेबाबत जनजागृतीसाठी सप्टेंबर महिन्याच्या तिसऱ्या शनिवारी आंतरराष्ट्रीय सागरी किनारा स्वच्छता दिनाचे आयोजन केले जाते. या अनुषंगाने पर्यावरण, वन आणि हवामान बदल मंत्रालय व श्रम व रोजगार मंत्रालय, महाराष्ट्र शासन, बृहन्मुंबई महानगरपालिका, प्रदूषण नियंत्रण मंडळ यांच्या सहकार्याने जुहू समुद्रकिनारा येथे समुद्रकिनारा स्वच्छता कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

केंद्रीय वन आणि पर्यावरण मंत्री भूपेंद्र यादव, मुंबई शहर जिल्ह्याचे पालकमंत्री दीपक केसरकर, मुंबई उपनगर जिल्ह्याचे पालकमंत्री मंगलप्रभात लोढा, खासदार रवींद्र वायकर, आमदार अमित साटम, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे अध्यक्ष सिद्धेश कदम, केंद्रीय वन आणि पर्यावरण विभागाचे विशेष सचिव तन्मय कुमार, बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अतिरिक्त आयुक्त डॉ. अश्विनी जोशी, पर्यावरण आणि हवामान बदल विभागाचे प्रधान सचिव प्रविण दराडे, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे सदस्य सचिव डॉ. अविनाश ढाकणे आदी यावेळी उपस्थित होते.

स्वच्छता अभियानासाठी विद्यार्थ्यांची लक्षणीय उपस्थिती असल्याबद्दल समाधान व्यक्त करून



राज्यपाल म्हणाले, तरुणांमध्ये स्वच्छतेबाबत होत असलेली जागृती ही सकारात्मक बाब आहे. सांडपाणी स्वच्छ आणि प्रक्रिया करूनच सागरात गेले पाहिजे तसेच सागर किनारे प्लास्टिक आणि कचऱ्यापासून मुक्त करणे हे आमचे उद्दिष्ट आहे. निसर्गाने आपल्याला दिलेली प्रत्येक गोष्ट स्वच्छ स्वरूपातच निसर्गाला परत दिली पाहिजे, असे सांगून सिंगल युज प्लास्टिकचा वापर बंद करण्याच्या केंद्र सरकारच्या अभियानात राज्याचे पूर्ण सहकार्य असेल, असेही राज्यपालांनी यावेळी सांगितले.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशभरात स्वच्छ भारत अभियान सुरू केले आहे. राज्यातही 'स्वच्छता ही सेवा' पंधरवड्याचा नुकताच शुभारंभ झाला असून राज्यात ४५०० ठिकाणी हे अभियान राबविण्यात येत आहे. राज्याला ७२० किलोमीटर लांबीमध्ये नैसर्गिक सौंदर्य लाभलेले अनेक समुद्रकिनारे लाभले आहेत. जगभरातील पर्यटक देखील स्वच्छ किनाऱ्यांना पसंती देतात. हे किनारे स्वच्छ ठेवण्याची जबाबदारी आपली प्रत्येकाची आहे. मुंबईत सखोल स्वच्छता अभियान राबविण्यात येत आहे, पावसाळ्यानंतर ते नियमित सुरू राहणार असल्याचे सांगून यामुळे प्रदूषणात मोठी घट झाल्याचे त्यांनी नमूद केले. मुंबई हे आंतरराष्ट्रीय दर्जाचे शहर आहे, शासनाच्या सर्व यंत्रणा, सामाजिक संस्था आणि नागरिकांच्या एकत्रित सहभागातून हे शहर आणि समुद्र किनारे स्वच्छ ठेवूया, असे आवाहन त्यांनी या निमित्ताने केले. यावेळी मुख्यमंत्र्यांनी उपस्थितांना स्वच्छतेची शपथ दिली.

केंद्रीय मंत्री भूपेंद्र यादव म्हणाले, समुद्रकिनाऱ्यांच्या स्वच्छतेसाठी जगभर जागृती अभियान राबविले जात आहे. देशात स्वच्छता पंधरवडा राबविण्यात येत असून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या मिशन लाईफ या संकल्पनेतील स्वच्छ भारत बनविण्यासाठी सर्वांनी मिळून प्रयत्न करूया, असे आवाहन त्यांनी केले. पंतप्रधानांच्या 'एक पेड मॉं के नाम' या उपक्रमात सहभागी होऊन सर्वांनी किमान एक झाड लावावे, असे त्यांनी सांगितले. पाण्याच्या पुनर्प्रक्रिया करणाऱ्या स्टार्टअपसाठी केंद्र सरकार मार्फत मदत दिली जाणार असल्याचे त्यांनी यावेळी जाहीर केले.प्रधान सचिव श्री. दराडे यांनी समुद्र किनारा स्वच्छतेबाबत माहिती देऊन मुंबईतील सर्व चौपाट्या बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत आधुनिक यंत्रसामग्रीच्या माध्यमातून स्वच्छ केल्या जात असल्याचे सांगितले. तर तन्मय कुमार यांनी केंद्र सरकार मार्फत केल्या जात असलेल्या उपाययोजनांबाबत माहिती दिली. मान्यवरांच्या हस्ते यावेळी किनारा स्वच्छतेबाबत केंद्र सरकारच्या मार्गदर्शक तत्वांच्या पुस्तिकेचे प्रकाशन करण्यात आले.

## संजय राऊत यांनी महाविकास आघाडीत बिघाडी होणार नाही याची काळजी करावी

### भाजप गटनेते आ. प्रविण दरेकरांची टीका

**प्रतिनिधी**
■ मुंबई

तिसऱ्या आघाडीचा विचार करण्यापेक्षा संजय राऊत यांनी आपल्या महाविकास आघाडीत बिघाडी होणार नाही याची काळजी करावी. मुख्यमंत्री आता काँग्रेसचा होईल अशी भुमिका बाळासाहेब थोरात आणि नाना पटोलेंनी घेतलीय. शरद पवार आणि काँग्रेस हे उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेला गणतीतही मोजत नाही. त्यांनी सर्व्हेच्या माध्यमातून ठाकरेंचे निवडणुकीत काय चित्र असेल हे जाणीवपूर्वक लोकांसमोर आणलेय. राऊत आणि त्यांचा पक्ष हतबल झाला आहे. तुमच्यात जे धूमसतेय ते पहिले निस्तरा, मग तिसऱ्या आघाडीची काळजी करा, अशी टीका भाजपा गटनेते आ. प्रविण दरेकर यांनी केली आहे.

पत्रकारांशी संवाद साधताना दरेकर यांनी विविध राजकीय घडामोडींवर भाष्य केले. जागा वाटपावर बोलताना दरेकर म्हणाले कि, अशा प्रकारच्या चर्चा तर चालू असतात. निवडणूक जवळ येत असल्यामुळे जागा वाटपाची गती निश्चितच वाढणार आहे. मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्री याबाबत चर्चा करून बऱ्याच अंशी जागा वाटपाचा निर्णय मार्गी लावतील.

मराठा संघटनेने आयोजित केलेल्या परिषदेवर बोलताना दरेकर म्हणाले कि, मराठा समाजाला आक्रमकतेची किंवा आंदोलनाची पार्श्वभूमी आहे. त्यामुळे मराठा समाजाचे आंदोलन आज सुरू नाही. अण्णासाहेब पाटील यांच्यापासून जावळे, मेटे यांसह अनेकांनी मराठा समाजासाठी लढे उभारले, आंदोलने केली, परिषदा घेतल्या आणि समाजाच्या हिताचा विचार केला. म्हणून तशाच प्रकारे मराठा समाजात वेगवेगळ्या प्रकारच्या संघटना कार्यरत आहेत. त्यांनी आज वाय. बी. चव्हाण येथे परिषद घेतली असेल तर ती मराठा समाजाच्या हितासाठीच असेल. मराठा समाजाचे हित कुणी एकट्यानेच केले पाहिजे असा काही अलिखित करार नाही. मराठा समाजाच्या हितासाठी ज्या संघटना पुढे येतील त्याचे मराठा समाज स्वागतच करेल.विधानसभा निवडणुकीत राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष मुस्लीम समाजाला सर्वाधिक जागा देणार असल्याच्या चर्चेवर दरेकर म्हणाले कि, अजित पवारांच्या वाट्याला ज्या जागा येथील तिथे कोण उमेदवार उभा करायचा हा अजित पवारांचा निर्णय आणि त्यांच्या पक्षाचा अधिकार आहे. त्यांनी कुणाला उभे करावे हा आमच्या पक्षाचा, महायुतीचा विषय नाही.

महामंडळाच्या चर्चेवर दरेकर म्हणाले कि, तिन्ही पक्षाचे नेते एकत्रित बसून निर्णय घेतात. शिंदेंच्या कोट्यात जी काही महामंडळे जातात त्याचा निर्णय पक्षप्रमुख म्हणून ते घेत असतात. भाजपा आणि राष्ट्रवादीचा निर्णय देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार लवकरच घेतील. शंभूराज देसाई यांनी बोलावलेल्या बैठकीवर दरेकर म्हणाले कि, मराठा, धनगर, मातंग असो प्रत्येक समाजाच्या हिताचा विचार करणे, त्या समाजाला मदत करणे, दिलासा देणे हे सरकारचे काम असते. म्हणून सरकारच्या वतीने शंभूराजे देसाई अशा प्रकारची बैठक घेत असतील तर ती समाज हिताचीच असेल. अशा बैठकीचे स्वागत करून त्यातून काही निष्पन्न व्हावे ही अपेक्षा.

### संजय राऊतांच्या दृष्टीलाच कावीळ झालीय

*राऊत यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदींवर केलेल्या विधानावर बोलताना दरेकर म्हणाले कि, संजय राऊत यांनी आपले नामकरण करून संजय टिकोजीराव असे करावे. उठले कि टीका, जिभेला कुठल्याच प्रकारचा लगाम नाही. पंतप्रधान मोदींचे व्यक्तिमत्व, त्यांचे व्हिजन संपूर्ण जगाला माहित आहे. ते कार्यक्रमाला येण्याआधी त्या कार्यक्रमाची इत्यंभूत माहिती असणारे पंतप्रधान नरेंद्र मोदी आहेत. राऊतांच्या दृष्टीलाच कावीळ झालीय म्हणून त्यांना संपूर्ण जग पिवळे दिसणार.*

## मुंबई विद्यापीठाची विनंती हायकोर्टाकडून मान्य

### तांत्रिक अडचणीमुळे सिनेट निवडणूक 24 सप्टेंबरला पार पडणार

**प्रतिनिधी**
■ मुंबई

राज्य सरकारला दणका देत मुंबई विद्यापीठाच्या सिनेटवरील 10 नोंदणीकृत पदवीधरांच्या जागांकरिता होणाऱ्या निवडणुकीला दिलेली तात्पुरती स्थगिती शनिवारी हायकोर्टानं उठवली. तसेच ठरल्याप्रमाणेच ही निवडणूक घेण्याचे निर्देश जारी केले. या निर्णयामुळे मुंबई विद्यापीठाला आता निवडणुक घेणं क्रमप्राप्त असणार आहे. परंतु, तांत्रिक अडचणींमुळे रविवारी होणारं मतदान 24 फेब्रुवारी (मंगळवारी) रोजी होणार असून मतमोजणी 27 सप्टेंबरला (शुक्रवारी) घेता येईल अशी कबुली विद्यापीठ प्रशासनाने दिली. जी मान्य करत हायकोर्टानम याचिकाकर्त्यांच्या सहमतीनं त्यांना मंजूरी दिली आहे.



राज्य सरकारच्या स्थगितीनंतर निवडणुकीसाठी हजर असलेल्या सर्व कर्मचाऱ्यांना परत पाठविण्यात आलंय. तसेच निवडणुकीसाठी आणलेली यंत्र सामुग्रीही वेगळी करण्यात आली आहे. ही सर्व व्यवस्था पुन्हा सुरळीत करण्यासाठी दोन दिवसांची मुदत देण्याची विनंती कुलगुरूंच्यावतीनं करण्यात आली, जी कोर्टानं मान्य केली.

रविवारी होणाऱ्या सुनियोजित पदवीधर मतदार संघाच्या सिनेट निवडणुकांवर राज्य सरकारच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागाने 19 सप्टेंबरच्या रात्री अचानक परीपत्रक काढत स्थगिती दिली. ज्याला ठाकरे गटाच्या युवासेनेनं आव्हान देत हायकोर्टात धाव घेतली. यावर न्यायमूर्ती अनिल चांदूरकर आणि न्यायमूर्ती राजेश पाटील यांच्या खंडपीठानं शनिवारी विशेष सुनावणी झाली. या निवडणुकीसाठी पात्र पदवीधर मतदारांची अंतिम मतदार यादी 31 जुलै रोजी प्रसिद्ध झाल्यानंतर निवडणूक प्रक्रिया 6 ऑगस्ट रोजी सुरू झाली. त्यानंतर अंतिम लढतीची यादी आणि उमेदवारही जाहीर झाले.

## राहुल गांधींना धमक्या देणारे सत्ताधारी अजून मोकाट

पान १ वरुन...

केंद्र आणि राज्य सरकारची भूमिका नाही.राज्यातील कायदा व सुव्यवस्था पूर्णपणे बिघडली आहे. विधानसभा निवडणूक निर्भय वातावरणात होईल याबाबत शंका आहे. राज्यात महिलांवरील अत्याचारात मोठयाप्रमाणात वाढ झाली असून अल्पवयीन, शाळकरी मुलींवरील अत्याचाराच्या बदलापूर व नागपूर येथे घडलेल्या गुन्ह्यात आरोपींना पाठीशी घालण्याचे काम सरकारकडून केले जात आहे. स्पर्धा परीक्षा रखडल्या आहेत. उमेदवारांना सरकारकडून नियुक्त्या देण्यात आलेल्या नाहीत. युवा पिढी बेरोजगारीमुळे नैराश्याच्या गर्तेत जात आहे. ही परिस्थिती सुधारण्यासाठी आपण सरकारला निर्देश द्यावेत, अशी राज्यातील जनतेची आपणाकडून अपेक्षा आहे, असे काँग्रेस पक्षाच्या शिष्टमंडळाने राज्यपालांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे. राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी या संपूर्ण प्रकरणात लक्ष घालणार असल्याचे आश्वासन काँग्रेस शिष्टमंडळाला दिले आहे. त्याचबरोबर वादग्रस्त विधानबाबत गृह खात्याकडून माहिती घेऊन कडक कारवाई करण्याचे आश्वासनही राज्यपाल यांनी दिले.

## 'लालबाग राजा'च्या हुंडीत आलेल्या दागिन्यांचा लिलाव सुरु

**प्रतिनिधी**
■ मुंबई

लाखो भाविकांचे श्रद्धास्थान बनलेल्या 'लालबागचा राजा'च्या हुंडीत अर्पण करण्यात आलेल्या सोन्या-चांदीच्या दागिन्यांच्या मोजणी पूर्ण झाली आहे. आज लालबाग राजाच्या दरबारात भक्तांच्या उपस्थितीत 'राजा'ला अर्पण करण्यात आलेल्या दागिन्यांचा लिलाव करण्यात येत आहे. यंदा लहान मोठे दागिने गणेश भक्तांकडून लालबागचा राजाच्या चरणी अर्पण करण्यात आले आहेत.

ज्या भक्तांचे नवस पूर्ण झाले अशा भक्तांकडून लालबागच्या राजाच्या दरबारात गणेश उत्सव काळात सोन्या चांदीच्या वस्तू लालबाग राजाच्या चरणी अर्पण केल्या जातात. यावर्षी तब्बल चार



किलो होऊन अधिक सोन्याच्या वस्तू लालबाग राजाच्या चरणी अर्पण करण्यात आल्या आहेत. या वस्तूंचा आज गणेश भक्तांच्या उपस्थितीत लिलाव सुरू करण्यात आला आहे. ज्या भक्तांचे नवस पूर्ण झाले आहेत असे भक्त गणेश उत्सवाच्या काळात येथे सोन्या-चांदीचे दागिने अर्पण करतात. आज दहा वाजेपर्यंत लिलाव आलेला चालणार आहे, यानंतर उरलेले दागिने मंडळाकडून विक्री केले जातील, अशी माहिती मंडळाचे अध्यक्ष सुधीर साळवी यांनी दिली आहे.

## वाढवण बंदराविरुद्ध एकजुटीने लढा उभारला पाहिजे - पाटील

**प्रतिनिधी**
■ मुंबई

केंद्र सरकारच्या धोरणामुळे शेतकरी व कष्टकरी कामगारांचे खूप नुकसान झाले आहे. वाढवण बंदरामुळे अनेक गावे प्रस्थापित होणारा असून मच्छीमार समाजाचे खूप नुकसान होणार आहे, त्यामुळे वाढवण बंदर रद्द करण्याच्या विरोधात सर्वांनी एकजुटीने लढा दिला पाहिजे. असे स्पष्ट उद्गार शेतकऱ्यांचे नेते रघुनाथ दादा पाटील यांनी जाहीर सभेत काढले.

भारतीय जीवन व पृथ्वी रक्षक चळवळीचे निमंत्रक ॲड. गिरीश राऊत यांनी १९ सप्टेंबर २०२४ रोजी दादर येथील धुरु हॉलमध्ये वाढवण बंदर रद्द करा या व इतर मागण्यांसाठी देशातील मान्यवरांची एक संयुक्त सभा आयोजित केली होती. पर्यावरण अभ्यासक ॲड. गिरीश राऊत यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की, वाढवण बंदर, जैतापूर अणुऊर्जा प्रकल्प, बारसू रिफायनरी अशा महाकाय प्रकल्पामुळे पृथ्वीच्या पर्यावरणात दुरुस्त न होणारा हस्तक्षेप होणार आहे. विकासासाठी राजकीय क्षेत्राने औद्योगिकीकरणाच्या रूढ चौकटीत विचार केल्याने परिस्थितीचे गांभीर्य लक्षात येत नाही. विकासाचे मॉडेल म्हणून देशापुढे ठेवलेले गुजरात बुडाले व बडोदा जाम नगरातील उच्चभ्रू वस्त्यांसह इतरही शहरात मगरीचा संचार सुरू झाला ही गोष्ट बोलकी आहे. महाराष्ट्र मच्छीमार कृती समितीचे उपाध्यक्ष रामकृष्ण तांडेल यांनी वाढवण येथे खोल समुद्र असल्यामुळे चांगल्या प्रकारची मच्छी मिळते. वाढवण बंदर झाल्यास मच्छीमारांचे खूप नुकसान होणार आहे. त्यामुळे मच्छीमार समाज या वाढवणं बंदराला शेवटपर्यंत विरोध करणार आहे. सागरी जीवशास्त्रज्ञ डॉ. शशिकुमार मेनन यांनी सांगितले की, आम्ही नरीमन पॉइंट ते पालघर या समुद्रकिनाऱ्याचा संपूर्ण अभ्यास केला असून पालघर येथे होणारे वाढवण पोर्ट करू नये असा अभ्यासकांचा व शास्त्रज्ञांचा अहवाल असतानाही वाढवण बंदराचे भूमिपूजन झाले आहे. या ठिकाणी समुद्रात ३० मीटर पाण्याची खोली असल्यामुळे मोठ्या बोटी लागू शकतात, त्यामुळे केंद्र सरकारने वाढवणे येथे पोर्ट बनविण्याचा विचार केला आहे. मात्र या पोर्टमुळे मच्छीमार समाज व स्थानिक लोकांचे खूप नुकसान होणार आहे. तर महाराष्ट्र हिंद मजदूर सभेचे माजी सरचिटणीस सूर्यकांत बागल यांनी , समुद्रात भर घालून या बंदरासाठी पाच हजार एकर जागा सरकारने ताब्यात घेतली असून, या ठिकाणी वाढवण बंदर झाल्यास आवश्यक असणारी रस्ते वाहतूक व इतर सुखसोयी जमिनीवरच होणार आहेत, त्यामुळे अनेक गावे प्रस्थापित होतील. असे सांगितले.

**पश्चिम रेल्वे**
**बांधकाम कार्य**
उप मुख्य अभियंता (बांधकाम), पश्चिम रेल्वे, सूरत – ३९५००६ निविदा क्र: डिव्हायसीईसीएसटी-एसटी-यूडीएन-एसडी-०१ दि. १३.०९.२०२४ (एक लिफाफा पद्धती) मागवित आहेत: कामाचे नाव: पश्चिम रेल्वेच्या मुंबई विभागामधील उधना येथील उधना स्थानकाच्या पुनर्विकासाच्या संदर्भात पश्चिम बाजू आणि पूर्व बाजू प्रवेश/ निकास येथे प्रवासी शेड, पूर्व बाजूकडील प्रवासी थांबण्याचे क्षेत्र आणि जोडणाऱ्या पाथवेचे बांधकाम. निमासू मूल्य: रु. २,९८,३३,४७६.०६/- इसारा रक्कम ठेव: रु. २,९९,२००/- ई-बोली समाप्ती दिनांक: ०८.१०.२०२४ रोजी १५.०० वा. पर्यंत. ई-बोली उघडण्याचा दिनांक: ०८.१०.२०२४ रोजी १५.३० वा. अधिक तपशिलासाठी कृपया आमच्या www.ireps.gov.in संकेतस्थळाला भेट द्या. ०५६२
आम्हाला लाईक करा : facebook.com/WesternRly

## महाराष्ट्र देशाचे तर 'एमएमआर' महाराष्ट्राच्या प्रगतीचे इंजिन - मुख्यमंत्री

पान १ वरुन...

ईस्टर्न फ्री वेचा विस्तार करण्यात येत आहे. विरार-अलिबाग कॉरिडोरचे काम सुरु होत आहे. असे विविध प्रकल्प साकारताना, विकासकामे करताना जास्तीत जास्त प्रमाणात आधुनिक तंत्रज्ञान वापरले जात आहे. नवी मुंबई विमानतळाचे काम लवकर पूर्ण होणार आहे. पालघरला तिसरे विमानतळ तयार करीत आहोत. आपल्याकडे उद्योगासाठी लागणाऱ्या सर्व गोष्टी असल्यामुळे उद्योग आपल्या राज्यात येत आहेत. दाओसला जावून 1 लाख 37 कोटींच्या करारांवर स्वाक्षरी केली आहे. त्यातील बहुतांश उद्योगांचे कामही सुरु झाले आहे. 3 लाख 50 हजार कोटींच्या सामंजस्य करारांवर स्वाक्षरी करण्यात आल्या आहेत. नुकताच इलेक्ट्रॉनिक्स सेमिकंडक्टर चीप बनविण्याचाही प्रकल्प सुरु करण्यात आला आहे. लवकरच इलेक्ट्रॉनिक्स सेमिकंडक्टर चीप बनविण्याच्या प्रकल्पासाठी 84 हजार कोटींचा करार होतोय. महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणावर पॉवर, स्टील, औषध निर्माण अशा विविध क्षेत्रातील उद्योग येत आहेत. मी सर्व अधिकाऱ्यांना सक्त सूचना दिल्या आहेत की, उद्योग क्षेत्रातील कोणतीही तक्रार येता कामा नये. माझ्याकडे तक्रार आलीच तर मी त्या तक्रारीचे तात्काळ निराकरण करतो. राज्यात जास्तीत जास्त उद्योग आले तर राज्याची प्रगतीही जास्तीत जास्त होईल, यावर माझा ठाम विश्वास आहे. महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य आहे की, ज्याने मुख्यमंत्री युवा प्रशिक्षण योजनेच्या माध्यमातून प्रशिक्षण घेणाऱ्या प्रशिक्षणार्थीला विद्यावेतन देण्याचा निर्णय घेतला आहे. काही देश हे पर्यटन व्यवसायावर चालतात. आपल्या राज्याला तर 720 किलोमीटरचा समुद्रकिनारा लाभला आहे. आपण विकासाची वर्गवारी केली आहे. त्यामुळे आपल्या राज्याचा विकास जलद होणार आहे. हे शासन विकासाला चालना देणारे आहे. ठाणेमधील धोकादायक इमारतींचे सर्वेक्षण करून त्या इमारतींमधील सर्वांना क्लस्टर डेव्हलपमेंटच्या माध्यमातून हक्काचे घर देण्याचे काम सुरु केले आहे. सिडको आणि ठाणे महानगरपालिका हे काम करीत आहे. पहिल्या टप्प्यातील 17 हजार घरे बांधण्याचे काम वेगाने सुरु आहे, असेही ते म्हणाले.

## विसर्जनावेळी ड्रोन उडविणे पडले महागात

### गिरगाव चौपाटी येथे पाच जणांवर गुन्हा



**प्रतिनिधी**
■ मुंबई

गणेशमूर्तींच्या विसर्जन सोहळ्याप्रसंगी गिरगाव चौपाटी येथे विनापरवानगी ड्रोन उडविणे पाच जणांना महागात पडले आहे. याप्रकरणी डी. बी. मार्ग पोलिसांनी त्यांच्याविरोधात गुन्हे नोंदविले असून, तीन ड्रोन जप्त केले आहेत.

गणेशोत्सव काळात मुंबईत परवानगीशिवाय ड्रोन उडविण्यास बंदी होती. त्याबाबतचे आदेशही पोलिसांनी जारी केले होते. मात्र, विसर्जन सोहळ्याप्रसंगी काही जणांनी नियमांचे उल्लंघन करत गिरगाव चौपाटीवर विनापरवानगी ड्रोनद्वारे चित्रीकरण करणाऱ्यांविरूद्ध पोलिसांनी कारवाई केली. त्यात तीन ड्रोन जप्त करण्यात आले. तसेच ड्रोन उडविणाऱ्या पाच व्यक्तींविरोधात पोलिसांनी भारतीय न्याय संहिता कलम २२३ व ३(५) अंतर्गत गुन्हे दाखल केले आहेत.

**यशस्वी शोधमोहीम-**

१) त्यापाठोपाठ गिरगाव परिसरात हरवलेल्या ५८ व्यक्तींचा शोध घेऊन त्याची कुटुंबीयांशी भेट घालून दिली.

२) त्यात २ ते १७ वर्ष वयोगटातील ३९ लहान मुले, ज्येष्ठांसह १२ व्यक्तींचाही समावेश आहे.

**केनरा बैंक Canara Bank** भारत सरकार का उपक्रम A Govt. of India Undertaking
सिंडिकेट Syndicate
**माहीम – II शाखा:** दुकान क्र. ८ आणि १०, श्रीजी व्हिला, टी. एच. कटारिया मार्ग, माहीम, मुंबई ४०००१६, महाराष्ट्र

**मागणी सूचना [कलम १३(२)]**

१.श्रीमती बबिता गुप्ता, आर/ ओ सदनिका क्र. डी २०५, २ रा मजला, वर्सटाईल व्हॅली निळजे, डोंबिवली (पूर्व), ठाणे ४२१२०४.
२.श्रीमती बबिता गुप्ता, आर/ ओ सदनिका क्र. १०५, १ ला मजला, वर्सटाईल व्हॅली निळजे, डोंबिवली (पूर्व), ठाणे ४२१२०४.

**प्रिय महोदय**
**विषय:** सिक्युरिटायझेशन अँड रिकंस्ट्रक्शन ऑफ फायनॅन्शियल ॲसेटस अँड एनफोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ च्या कलम १३ (२) अंतर्गत मागणी सूचना
असे की श्रीमती बबिता गुप्ता ह्यांनी वेळोवेळी माहीम II शाखेकडून खालील कर्ज/ क्रेडीट सुविधा घेतल्या आहेत.

| क्र. | कर्ज क्र. | कर्जाचे स्वरूप/ मर्यादा | कर्ज रक्कम | ०८.०८.२०२४ अनुसार दायित्व | व्याजाचा दर |
|---|---|---|---|---|---|
| १ | १६४००१३६५२४४ | गृह कर्ज | रु. ५६,००,०००/- | रु. ५२,४७,५२०.८६ | १०.३५% २.०० % दंड व्याज |

वर सांगितलेल्या कर्ज/क्रेडिट सुविधा या खालील शेड्यूलमध्ये अधिक विशिष्टपणे वर्णन केलेल्या मालमत्तेचे गहाण ठेवून, तुम्ही आमच्या बाजूने कार्यान्वित केलेल्या संबंधित दस्तऐवजांच्या आधारे योग्यरित्या सुरक्षित केल्या आहेत. निर्धारित केलेल्या अटी व शर्तीनुसार तुम्ही तुमच्या दायित्वांचे निर्वाह करण्यात अयशस्वी ठरल्यामुळे, बँकेने ०६.०८.२०२४ रोजी कर्जाचे एनपीए म्हणून वर्गीकरण केले आहे. म्हणून, आम्ही तुम्हाला याद्वारे विषय अधिनियमाच्या कलम १३ (२) अंतर्गत ही नोटीस जारी करत तुम्हाला रु. ५२,४७,५२०.८६ (रु. बावन्न लाख सत्तेचाळीस हजार पाचशे सत्तावीस आणि छप्पन पैसे फक्त) ०८/०८/२०२४ रोजी जमा झालेले आणि अद्ययावत व्याज आणि इतर खर्चासह, नोटीसच्या तारखेपासून साठ दिवसांच्या आत, असे न केल्यास आम्ही विषय अधिनियमाच्या कलम १३(४) अंतर्गत सर्व किंवा कोणत्याही अधिकारांचा वापर करू.चे संपूर्ण दायित्व सोडवण्याचे आवाहन करतो.
पुढे, आमच्या पूर्व संमतीशिवाय, शेड्यूलमध्ये नमूद केलेल्या कोणत्याही सुरक्षित मालमत्तेशी कोणत्याही प्रकारे व्यवहार करण्यापासून तुम्हाला याद्वारे प्रतिबंधित केले आहे. हे विषय कायदा आणि/किंवा अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्यांतर्गत आमच्यासाठी उपलब्ध असलेल्या इतर कोणत्याही अधिकारांवर पूर्वग्रह न ठेवता आहे.
सुरक्षित मालमत्तेची पूर्तता करण्यासाठी उपलब्ध वेळेनुसार, सरफेसी कायद्याच्या कलम १३ च्या उप-कलम (८) च्या तरतुदींकडे तुमचे लक्ष वेधण्यात आले आहे. २३.०८.२०२४ रोजी नोंदणीकृत पोस्ट ॲक द्वारे तुम्हाला शाखा रेकॉर्डमध्ये उपलब्ध असलेल्या तुमच्या शेवटच्या ज्ञात पत्त्यावर मागणी नोटीस देखील जारी करण्यात आली होती.

**परिशिष्ट:**
**गहाण/ तारण-गहाण मालमत्तेचा ठराविक तपशिल खालील प्रमाणे आहे**

गाव निळजे, तालुका कल्याण, आणि जिल्हा ठाणे येथे वसलेल्या जमिनीचा धारण केलेला जूना सर्वे / हिस्सा क्र. १११/९, १३/- १४/- १५/- १६ / १ ए आणि १ बी नवीन सर्वे/ हिस्सा क्र. १२/९, १४/- १५/- १६/- १७/- १७/१ ए आणि १ बी वर बांधण्यात आलेल्या व्हर्सटाईल व्हॅली म्हणून ज्ञात असलेल्या प्रकल्पाच्या डी विंगच्या १ ल्या मजल्यावरील ५५.७६ चौ. फू. चटई क्षेत्फळ असलेल्या निवासी सदनिका क्र. १०५ चा सर्व खंड आणि भूखंड शीर्षक धारकाचे नाव: श्रीमती बबिता गुप्ता. सेरसाई सिक्युरिटी इंटरेस्ट आयडी: ४०००५६७१३०८३

**दिनांक: २०.०९.२०२४** सही/-
**ठिकाण: मुंबई** प्राधिकृत अधिकारी

**यूनियन बैंक ऑफ इंडिया Union Bank of India** भारत सरकार का उपक्रम A Government of India Undertaking
**सानपाडा शाखा**
१४-१५ अखुरथ सीएचएस, प्लॉट क्र. ११, सेक्टर १४, सानपाडा, ऑफ पाल्म बीच रोड, सानपाडा, नवी मुंबई – ४००७०५, संपर्क क्र. ९१३७५६२९७०, ई-मेल: ubin0562971@unionbankofindia.bank
**APPENDIX IV**
**ताबा सूचना [नियम-८(१)] (स्थावर मालमत्तेसाठी)**

ज्याअर्थी, निम्नस्वाक्षरीकार युनियन बँक ऑफ इंडियाच्या सानपाडा शाखा चे सिक्युरिटायझेशन अँड रिकंस्ट्रक्शन ऑफ फायनॅन्शियल ॲसेटस अँड एनफोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ अंतर्गत प्राधिकृत अधिकारी आहेत आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) नियमावली २००२ च्या नियम ३ सह वाचल्या जाणाऱ्या कायद्याच्या कलम १३ (१२) अंतर्गत कर्जदार श्री. विशाल सतीश डिकवलकर ह्यांना नोटीस मधील एकूण देणी रु. १०,०४,३१०.२४/- (रुपये दहा लक्ष चार हजार तीनशे दहा आणि चोवीस पैसे मात्र) अधिक त्यावरील व्याजाचा भरणा नमूद सूचना प्राप्त झाल्यापासून ६० दिवसांच्या आत करण्यासाठी मागणी सूचना दिनांकित ०२.०७.२०२४ रोजी जारी करण्यात आली होती.
कर्जदारांना रकमेचा भरणा करता आला नसल्यामुळे विशेषत: कर्जदार आणि सामान्य जनतेला ह्याद्वारे देण्यात येत आहे की येथे खालील परिशिष्टामध्ये वर्णन करण्यात आलेल्या मालमत्तेचा नमूद नियमावलीच्या नियम ८ सह वाचल्या जाणाऱ्या नमूद कायद्याच्या कलम १३ (४) मध्ये देण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून प्रत्यक्ष ताबा २० सप्टेंबर २०२४ रोजी प्रत्यक्ष ताबा घेतला आहे.
विशेषत: कर्जदार आणि सामान्य जनतेला ह्याद्वारे सावध करण्यात येत आहे की मालमत्तेशी कोणताही व्यवहार करू नये आणि मालमत्तेशी जर व्यवहार झाला असल्यास २९.०६.२०२४ अनुसार रु. १०,०४,३१०.२४/- (रुपये दहा लक्ष चार हजार तीनशे दहा आणि चोवीस पैसे मात्र) अधिक त्यावरील व्याजाचा भरणा युनियन बँक ऑफ इंडिया, सानपाडा शाखा ह्यांच्याकडे करण्यासाठी बाध्य असतील.
सुरक्षित मत्ता सोडविण्यासाठी उपलब्ध असलेल्या वेळेच्या संदर्भात कायद्याच्या कलम १३ (८) मधील तरतूदीकडे कर्जदाराचे लक्ष वेधून घेण्यात येत आहे.

**स्थावर मालमत्तेचे वर्णन**
निवासी सदनिका क्र. ००२, तळ मजला, बी विंग, पद्मान नगर सीएचएसएल, पद्मन नगर, पुरा पाडा, आगाशी रोड, विरार (पूर्व), तालुका वसई, आणि जिल्हा ठाणे अंतर्गत असलेला सर्व खंड आणि भूखंड. श्री. विशाल सतीश डिकवलकर ह्यांच्या नावे असलेले.

**दिनांक: २०.०९.२०२४** सही/-
**ठिकाण: मुंबई** प्राधिकृत अधिकारी, युनियन बँक ऑफ इंडिया

**केनरा बैंक Canara Bank** भारत सरकार का उपक्रम A Govt. of India Undertaking
सिंडिकेट Syndicate
**लोअर परेल शाखा :** युनिट क्र. १ तळ मजला, कमला मिल्स कंपाउंड, टाईम्स टॉवर, एस. बी. रोड, लोवर परेल (पश्चिम), मुंबई – ४०००१३. ई-मेल
**ताबा सूचना [कलम १३(४)] (स्थावर मालमत्तेसाठी)**

ज्याअर्थी: निम्नस्वाक्षरीकार सिक्युरीटायझेशन अँड रिकंस्ट्रक्शन ऑफ फायनॅन्शियल ॲसेटस अँड एनफोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट (कायदा) २००२ (कायदा ५४/ २००२) अंतर्गत कॅनरा बँक, लोवर परेल शाखेचे प्राधिकृत अधिकारी आहेत आणि सिक्युरिटी इंटरेस्ट कायदा, २००२ च्या नियम ३ सह वाचल्या जाणाऱ्या कलम १३ (१२) अंतर्गत देण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून श्रीमती खातीजा मुश्ताक ए. बघदादी आर/ ओ सदनिका क्र. ३०४, ३ रा मजला, ए विंग, विवियाना ब्लॉक म्हणून ज्ञात असलेली इमारत, गाव धामोटे, तालुका कर्जत, जिल्हा रायगड, महाराष्ट्र ४१०२०६ आणि येथे देखील आर/ओ इस्टर्न चेम्बर्स समोर, घर क्र. १२१, अन्दलाल जैन रोड, एफसीआय गोडाऊन क्र. ८, डोंगरी मुंबई, महाराष्ट्र ४००००९ ह्यांना सूचनेमध्ये नमूद करण्यात आलेली १३.०५.२०२४ अनुसार रक्कम रु. २१,७५,१२६.७२ (रुपये एकवीस लक्ष पंच्याहत्तर हजार एकशे सव्हीस आणि बहात्तर पैसे मात्र) अधिक त्यावरील देय व्याज आणि इतर शुल्काचा भरणा नमूद सूचना प्राप्त झाल्यापासून ६० दिवसांच्या आत करण्यासाठी मागणी सूचना दिनांकित १४.०५.२०२४ रोजी जारी करण्यात आली होती आणि २८.०६.२०२४ रोजी दोन वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध करण्यात आले होते.
कर्जदार / हमीदार रकमेचा भरणा करू न शकल्यामुळे सूचना ह्याद्वारे कर्जदार आणि सामान्य जनतेला देण्यात येत आहे की निम्नस्वाक्षरीकारांनी त्याना नमूद नियमांच्या नियम ८ आणि ९ सह वाचल्या जाणाऱ्या नमूद कायद्याच्या कलम १३ (४) अंतर्गत त्याला/ तिला देण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून येथे खाली नमूद करण्यात आलेल्या मालमत्तेचा १९ सप्टेंबर २०२४ रोजी ताबा घेतला आहे.
विशेषत: कर्जदार आणि सामान्य जनतेला ह्याद्वारे सावध करण्यात येत आहे की मालमत्तेशी कोणताही व्यवहार करू नये आणि मालमत्तेशी असा व्यवहार झाला असल्यास कॅनरा बँक लोअर परेल शाखा ह्यांच्या कडे १३.०५.२०२४ अनुसार रक्कम रु. २१,७५,१२६.७२ (रुपये एकवीस लक्ष पंच्याहत्तर हजार एकशे सव्हीस आणि बहात्तर पैसे मात्र) चा भरणा करण्यास बाध्य असतील. सुरक्षित मालमत्ता सोडविण्यासाठी उपलब्ध असलेल्या वेळेच्या संदर्भात नमूद कायद्याच्या कलम १३ च्या पोटकलम (४) मध्ये असलेल्या त्रतूदिकडे कर्जदाराचे लक्ष वेधून घेण्यात येत आहे.

**स्थावर मालमत्तेचे वर्णन**
धारण केलेल्या मालमत्तेच्या खंड आणि भूखंडाचा तपशिल: गाव धामोटे, ता. कर्जत जिल्हा रायगड महाराष्ट्र ४१०२०६ येथे वसलेल्या जमिनीचा धारण केलेला सर्वे क्र. ८७/४३, ८७/४४, ८७/४५, ८७/४६ वर बांधण्यात आलेल्या विवियाना ब्लॉक म्हणून ज्ञात असलेल्या इमारतीच्या ए विंगच्या ऱ्या मजल्यावरील ३३७.९९ चौ. फू. चटई क्षेत्रफळ असलेल्या निवासी सदनिकेचा धारण केलेला सदनिका क्र. ३०४. सीमा पुढील प्रमाणे: उत्तर: खुली जागा, दक्षिण: खुली जागा, पूर्व: रोड, पश्चिम: खुली जागा. शीर्षक धरकाचे नाव: श्रीमती खतीजा मुश्ताक ए. बघदादी

**दिनांक: १९.०९.२०२४** सही/-
**ठिकाण: मुंबई** प्राधिकृत अधिकारी, कॅनरा बँक

रिकामं पाकीट कधीच यशाच्या आड येत नाही तर रिकामं डोकं यशाच्या मार्गात नेहमीच अडसर बनतं.



- नॉर्मन विन्सेंट पील
अमेरिकन लेखक

वृत्तमानस
मुंबई, रविवार, २२ सप्टेंबर २०२४




**२३-०९-२०२४ ते २९-०९-२०२४ (रविवार ते शनिवार)**

**मेष - समाधानी वृत्ती राहु शकेल.**
ग्रहबळ पहाता सप्ताहाचा पूर्वार्ध लाभदायक जाऊ शकेल.नियोजित कामे करतांना लाभात वाढ होऊ शकेल.या दिवसांत जे काही बदल होणार आहे ते अनपेक्षित बरे असु शकतील.त्यामुळे बदल स्वीकारून पुढे जा.म्हणजे नुकसान होणार नाही.इतरांकडे बघण्याचा दृष्टिकोन समंसपनाचा असु शकेल.असे हे सर्व दिवस असेचआहेत. हा तात्पुरत्या वलयाचा असु शकेल.हे तुम्हाला माहीत झालेले आहे.तरीसुद्धा गैरसमज करून घेणे बरे नसेल. २३चा कन्येतुन होनारा बुधबदल बरा राहु शकेल. व्यवसायात प्रगती होऊ शकेल.नोकरदार वर्गाला कामामध्ये समाधानी वृत्ती राहु शकेल.मनमानी टाळलेली बरी.
**महिला -** आर्थिकदृष्ट्या व्यवहार जपून करावेत.घरगुती वातावरण चांगले राहील. मित्र-मैत्रिणींशी मात्र जेवढ्यास तेवढे राहाने पोषक असेल. दुरावा येणार नाही.
**विद्यार्थी -** योग साधनेला महत्त्व द्या
**शुभदिनांक२३-२४-२५.**

**वृषभ - भाग्योदय होऊ शकेल.**
ग्रहबळ पहाता संपूरण सप्ताह लाभदायक जाऊ शकेल.नियजितकामे करतांना भरभरुन यश मिळेल.या सर्व दिवसांचा कालावधी उत्तम राहु शकेल.हे दिवस तुमच्यासाठी प्रसिद्धीचे आहेत.असे समजायला हरकत नाही.आतापर्यंत तुम्ही ज्या गोष्टींसाठी प्रयत्न करत होता तो प्रयत्न यशस्वी होतनव्हता.विलंब लागत होता.सध्या तो लागणार नाही.सहज मार्गी कामे होत राहतील.कौटुंबिकस्तरावर वावरतांना आनंदात चांगली वाढ होऊ श केल.बुधबदल सर्वस्तरावर चांगली प्रतिष्ठा वाढवु शकेल. सुरु असलेल्या व्यवसायात भरभराट होऊ शकेल. नोकरदार वर्गाला नवीन कामाची जबाबदारी मिळेल.
**महिला -** आर्थिक बाबतीत समाधानी राहाल.राजकीय क्षेत्रात ऊत्तम यश मिळेल.मित्रमैत्रिणींचे नाते अतूट होईल.धार्मिक कार्यासाठी खर्च कराल.सहकार्य मिळेल.
**विद्यार्थी -** आरोग्य ठणठणीत राहील.
**शुभदिनांक-२४-२५-२६.**

**मिथुन - जरा धीर धरणे बरे राहील.**
ग्रहबळ पहाता सप्ताहाचा उत्तरार्ध चांगला जाऊ शकेल. नियोजितकामे करतांना सकारात्मक स्थिती असु शकेल. या सर्व दिवसांत स्वत:ला झेपेल अशाच गोष्टी कराव्या लागतील.ज्या गोष्टी तुम्हाला जमणार नाहीत अशा गोष्टींची जबाबदारी घेऊच नका.अन्यथा नुकसान होऊ शकते. त्यामुळे कदाचित तुमची चिडचिड होऊन इतरांबरोबर वादविवादही होऊ शकतात.प्रत्येक गोष्टीत आपलेच खरे करणे सध्यातरी योग्य राहणार नाही.सध्या इतरांचे मत ऐकून घ्यावेच लागणार.बुधबदल लाभात वाढ करु शकेल.  व्यवसायात मागील काही दिवसांपेक्षा सध्याचे दिवस चांगले आहेत.नोकरदार वर्गाला संवादाची गरज भासेल.
**महिला -** आर्थिक बाबतीत बचत करणे योग्य राहु शकेल. समाजसेवेची आवड राहील.कुटुंबाची जबाबदारी पार पाडावी लागेल.आध्यात्मिक गोष्टीत मन रमवावे लागेल.
**विद्यार्थी -** आरोग्य बरे असेल.
**शुभदिनांक-२६-२७-२८.**

**कर्क - विश्रांतीची गरज असेल.**
ग्रहबळ पहाता प्रतिकुल सप्ताह जाऊ शकेल.नियोजित कामे करतांना दगदग करुन चालनार नाही.ज्यावेळी सप्ताहात असे भ्रमण असते. त्यावेळी एक गोष्ट लक्षात ठेवावे लागते.ते असे आपण सावधानतेने पाऊल टाकणे गरजेचे राहील.तुमची बाजू सत्य असली तरी ती समोरच्याला पटणार नाही.तेव्हा कोणाला सांगायला किंवा सल्ला द्यायला जाऊ नका."आपले काम भले नि आपण भले" कोणतेही महत्त्वाचे निर्णय सध्या तरी घेऊ नका. सर्व दिवस जपून पाऊल टाका. बुधबदल बरा राहील. व्यवसायात जे चालले आहे. ते योग्य असे समजून पुढे चला.नोकरदार वर्गाने कामात वेळिच लक्ष द्यावे लागेल.
**महिला -** आर्थिक बाजू भक्कम करण्याचा प्रयत्न वेळिच करावा लागेल.जोडीदाराच्या सल्ल्याने सर्व निर्णय घ्यावेलागतील. मानसिकदृष्ट्या शांतता राखावी लागेल.
**विद्यार्थी -** प्रकृतीची काळजी घ्यावी.
**शुभदिनांक-२७-२८-२९.**

**सिंह - मध्यस्थी करु नका.**
ग्रहसंकेत पहाता पूर्वार्ध सप्ताहाचा चांगला जाऊ शकेल.नियोजित कामे करतांना विचार करुन करत चला.कारण या दिवसांत जे काही निर्णय घेणार त्या निर्णयांना तित केसे यश मिळणार नाही.असे असतानासुद्धा तुम्ही निर्णय घेतले तर ते कदाचित चुकीचे ठरू शकतात.तेव्हा थोडेसे शांत राहून विचार करून मगच निर्णय घ्यावेत.ज्यावेळी दिवस चांगले असतात त्या दिवसांत निर्णय घेणे म्हणजे यशाच्या पायरीपर्यंत पोहोचण्यासारखे असते.कोणतीही घाई करू नका.बुधबदल गुंतवनुकीस चांगला.व्यवसायात नवीन गुंतवणूक अविचाराने करू नका.नोकरदार वर्गाने कामाव्यतिरिक्त इतर गोष्टीत लक्ष घालू नका.
**महिला -** आर्थिक नियोजन पक्के करावे लागेल.कुटुंबाशी जुने असलेले वादविवाद टाळावे लागतील.समाजसेवा करतांना विनाकारण चिडचिड करु नका.
**विद्यार्थी -** प्रकृतीत निष्काळजीपणा टाळा.
**शुभदिनांक-२३-२४-२५.**

**कन्या - उत्तम आठवडा जाईल.**
ग्रहसंकेतपहाता संपूर्ण सप्ताह लाभदाक जाऊ शकेल.नियोजित कामे करतांना संवाद साधत चला.चांगले यशमिळवु शकाल.या सर्व दिवसांत कोणतीही देवाण-घेवाण करताना व्यावहारिकपणे करणे अधिक पोषक राहील.भावनिकपणे कोणतेही केलेले व्यवहार कदाचित नुकसानीचे ठरू शकतात.इतरांच्या सांगण्या बोलण्यावर लक्ष देऊ नका.उगाच चांगली वेळ वाया जाऊ शकेल.जेडोळयांनी प्रत्यक्षात दिसते त्यावर विश्वास ठेवा. दिवस चांगले असतील.होणारा बुधबदल लाभात उत्तम वाढ करु शकेल. व्यवसायात फायद्याचे प्रमाण उत्तम राहु शकेल.नोकरदार वर्गाला वरिष्ठांचे सदैव सहकार्य मिळु शकेल.
**महिला -** समाधानकारक लाभ होऊ शकतील.वायफळ खर्च कमी करावे लागतील.समाजसेवेतून आनंद मिळेल. मैत्रीचे नाते दृढ होईल. घरगुती वातावरण चांगले राहील.
**विद्यार्थी -** साधनेला महत्त्व द्या.
**शुभदिनांक-२४-२५-२६.**

**तूळ - परिपक्वता वाढेल.**
ग्रहसंकेतपहाता उत्तरार्ध चांगला जाऊ शकेल.नियोजितकामे करतांना सफलता मिळवु शकाल.या सर्व दिवसांचा कालावधी अधिक चांगला कसा जाईल ते पाहिलेले बरे राहील.कारण या दिवसांत कदाचित नको त्या गोष्टी मागे लागू शकतात.अशावेळी घाईगडबडीने कोणतीही गोष्ट करणे कदाचित त्रासाचे राहील.या दिवसांत कोणत्याही अफवांना बळी जाऊ नका.अनोळखी व्यक्तीवर विश्वास ठेवू नका.स्वत:चे व्यवहार इतरांच्या हातात देऊ नका.स्वत:च निर्णय घ्यावे लागतील.बुधबदल चांगला राहु शकेल.  व्यवसायात परिळमाने चांगली परिपक्वता येऊ शकेल. नोकरदार कामात जबाबदारी पडत होती ती कमी होईल.
**महिला -** आर्थिकदृष्ट्या चांगली सफलता मिळु शकेल.राजकीय क्षेत्रात वरिष्ठांचे सहकार्य मिळु शकेल.घरगुती कार्यक्रमाचे नियोजन यशस्वी होऊ शकेल.धावपळ होईल.
**विद्यार्थी -** आरोग्य काळजी घ्या.
**शुभदिनांक-२६-२७-२८.**

**वृश्चिक - स्वतहावर नियंत्रण ठेवा.**
ग्रहसंकेतपहाता प्रतिकुल सप्ताह जाऊ शकेल.नियोजित कामे करतांना संयम वाढवावा लागेल.कौटुंबिकस्तरावर वावरतांना उगाचच पोकळ आठवणी जागवतील.त्यातुन वेळिच बाहेर पडने बरे राहील.संवाद वाढवावे लागती
ल.सप्ताहात सर्वच दिवस प्रतिकूल आहेत."हमकरे सो कायदा"याचा धोका वेळिचओळखने बरे राहील.असेच म्हणायला हरकत नाही.कारण असा कोणताच दिवस नाही की त्यात मनस्ताप संताप चिडचिड होनार नाही.
बुधबदल बरा असेल.नियोजित उपासना सोडु नका.व्यावसायिकदृष्ट्या गुंतवणूक विचारपूर्वक वाढवावी. नोकरदार  वर्ग कामात पूर्णपणे व्यस्त राहावे लागेल.
**महिला -** आर्थिक ताणतणाव कमी होईल असे दिसत नाही.हाती घेतलेले आहे त्या कामाला विलंब होईल. जे आहे त्यातच समाधान मानत मानने बरे.राग नको.
**विद्यार्थी -** मित्र दूर होतील.
**शुभदिनांक-२७-२८-२९.**

**धनू - परंपरा जपु शकाल.**
ग्रहप्रभावपहाता सप्ताहाचा पूर्वार्ध चांगला जाऊ शकेल.नियोजित कामे करतांना प्रतिसाद मिळु शकेल.सध्या या आठवड्यात असा कोणताच दिवस नाही की जो विशेष काळजी वाढवणारा आहे.मग अशी परिस्थिती असेल त्यावेळी मात्र तुम्ही शांतपणे दिवस पुढे ढकलता.महत्त्वाचे कोणतेही काम करत नाही.तेव्हा सध्या दिवस बर्यापैकी बरे आहेत हे विसरू नका.नियोजित कामाला कदाचित गती येईल.तयारी करून कामाला लागावे लागेल.इतरांची मदतही मिळेल.बुध रागावर नियंत्रण सुचवतो.व्यवसायात फायद्याचे प्रमाण बर्यापैकी बरे राहु शकेल.नोकरदार वर्ग कामात संदर्भात वरिष्ठांशी चर्चा करावी.
**महिला -** आर्थिक लाभ बरे होऊ शकल.समाजसेवा करण्याची आवड नसली तरी तुम्हाला ती करावी लागेल. धार्मिक कार्यात सहभाग नसला तरी सहकार्य कराल.
**विद्यार्थी -** आरोग्य बरे राहील.
**शुभदिनांक-२३-२४-२५.**

**मकर - उत्तम आघाडी मिळवाल.**
ग्रहप्रभावपहाता संपूर्ण सप्ताह लाभदायक जाऊ शकेल.नियोजित कामे करतांना उत्तम यश मिळवु शकाल.सर्व दिवसांचा कालावधी अत्यंतचांगला राहु शकेल.सध्या तुम्ही जे ध्येय ठरवलेले आहे ते ध्येय सहज पूर्ण होणारे आहे.त्यासाठी कोणाची मदत घ्यावी लागणार नाही. स्वत:चे काम स्वत:कराल.तुम्ही घेतलेले निर्णय योग्य असु शकतील. धावपळीचा मार्ग कमी होऊ शकेल.उत्साह वाढेल.अनपेक्षित असे प्रस्ताव तुमच्यापुढे येतील.ते तुमच्यासाठी खूप चांगले असतील. बुधबदल लाभ वाढवील. व्यावसायिकदृष्ट्या उत्तमआघाडी मिळवु शकाल.नोकरदार वरिष्ठांचे मत घेऊनच नियमावली तयार करावी.
**महिला -** आर्थिकआवक वाढेल.सध्या सार्वजनिक ठिकाणी वेळ देणे शक्य होणार नाही.जोडीदाराचे सहकार्य उत्तम मिळु शकेल.आध्यात्मिक गोष्टींची आवड राहील.
**विद्यार्थी -** प्रकृतीत चांगली सुधारणा.
शुभ**दिनांक-२४-२५-२६.**

**कुंभ - नियंत्रण ठेवत चला.**
ग्रहप्रभावपहाता सप्ताहाचा उत्तरार्ध चांगला जाऊशकेल.नियोजित कामे करतांना यश मिळवु शकाल.कौटुंबिकस्तरावर वावरतांनाहे दिवस एक घाव दोन तुकडे असे करून चालणार नाही.त्यामुळे कदाचित नुकसान होऊ शकते.त्यापेक्षा शांततेच्या मार्गाने गोष्टी चांगल्या होतील. स्वत:वर नियंत्रण ठेवने अधिक पोषक राहु शकेल.वाद विवाद या गोष्टींपासून लांब राहा.आपले मत इतरांवर लादण्याचा प्रयत्न करू नका.समोरच्याला काही गोष्टी नाही पटल्या तर सोडूनद्या.बुधबदल नियंत्रण सुचवतोय. व्यवसायात भागीदारी व्यवसाय करताना व्यवहाराला महत्त्व द्यावे. नोकरदार वर्गाला सामूहिकरीत्या काम करावे.
**महिला -** वेळेचे महत्व वेळिच ओळखुन वेळेवर कामे करा.लाभ होतील.आर्थिक बाबतीत बचत करावी लागेल कुटुंबात स्वस्थ राहा. आहाराचे पथ्य पाणी सांभाळा.
**विद्यार्थी -** यश मिळवाल.
**शुभदिनांक-२६-२७-२८.**

**मीन - आळस बाजूला करावा.**
ग्रहप्रभाव पहाता प्रतिकुल सप्ताह जाऊ शकेल.नियोजित कामे करतांना उगाचच चिडचिड करुन नुकसानओढवुन घेऊ नये.या दिवसांत आळस बाजूला सारून काम करावे लागेल.कौटुंबिकस्तरावर वावरतांना जबाबदारिने बोलने बरे राहील.समाजात कामे करतांना कोणावर अवलंबून राहून काम करायचे ठरवल्यास ते होणार नाही.तेव्हा कोणाची अपेक्षा ठेवू नका.कोनत्याही गोष्टीचा शुभारंभ या दोन दिवसात करू नका.येणारे प्रस्ताव स्वीकारू नका. नियमबाह्य गोष्टी टाळाव्यात. बुधबदल बरा राहील. व्यावसायिकदृष्ट्या पावले जपुन टाकावे लागतील. नोकरदार वर्गाला सध्या आहे त्यात समाधान मानावे लागेल.
**महिला -** वायफळ खर्चाची बाजू कमी करावी लागेल ते सांभाळा.मित्र-मैत्रिणींशी उगाचच सलोखा वाढवु नका. घरगुती वातावरण साधारण बरेराहील.शांत रहाणे बरे.
**विद्यार्थी -** उगाचच चिडचिड नको.
**शुभदिनांक-२७-२८-२९.**

# ‘वन नेशन वन इलेक्शन’चं थोतांड...

**प्रविण पुरो**

**देशाच्या** भल्याच्या नावाखाली घेतल्या जाणाऱ्या निर्णयांनी देश कसा पांगळा बनतो याची असंख्य उदाहरणं मोदी सरकारने गेल्या दोन टर्मच्या सत्तेमधून  दिली आहेत. मनमानेल तसे निर्णय घेतले की घर चालवणंही अवघड बनून जातं. सत्तेच्या दहा वर्षात मोदींनी घेतलेले निर्णय देश नावाचं घर चालवण्यासाठी किती कटकटीचे आणि बिनडोक होते, हे आज दिसू लागलं आहे. मग तो नोटबंदीचा विषय असो वा जीएसटी लागू करण्याचा. भारतीय नागरिकत्व कायदा असो वा कृषी कायदे असोत. असे अनेक निर्णय जे देशाच्या कल्याणाआड आले आहेत. मात्र याचं सरकारला काहीच सोयरसुतक नाहीसं दिसतं. आपण घेतलेल्या निर्णयांमुळे देशाचं नुकसान झाल्याचं शल्य ना मोदींनी व्यक्त केलं ना त्यांच्या मंत्रिमंडळातल्या कोण्या मंत्र्यांनी. यामुळे घेतला निर्णय मुकाट पाळण्याशिवाय पर्याय राहिला नाही. अशाच निर्णयात एक देश एक निवडणूक अर्थात वन नेशन वन इलेक्शनची भर पडणार आहे. मोदी सरकारने जेजे निर्णय घेतले त्यात देशाच्या कल्याणापेक्षा आप कल्याणच होतं. नोटबंदीने जसा काळा पैसा बाहेर आलाच नाही. तिथे भाजप नेत्यांचे खिसे भरले. तसं जीएसटीने कर संकलनातल्या कटकटी अधिकच वाढवल्या. होतं ते बरं होतं, असं म्हणण्याची वेळ करदात्यांवर ओढावली. अशीच नवी योजना म्हणजे एक निवडणूक होय. ही घोषणा केवळ फसवीच नाही तर घटनेची पायमल्ली करणारी आहे. घटना मोडित काढण्याची ही पहिली पायरी होय. 2014मध्ये केंद्रात भाजपची सत्ता आल्यानंतर मोदींनी एक देश एक निवडणूक ही संकल्पना जाहीर केली होती. मोदींच्या घोषणेबरहुकूम देशातील निवडणुका या कशा महाग आणि आर्थिकदृष्टया परवडणाऱ्या नाहीत, हे सांगणारे अनेकजण उभे राहिले. प्रसार माध्यमातून त्यावर चर्चा घडवण्यात आल्या. या चर्चांमध्ये अधिकतर हे एक निवडणुकीचे समर्थक होते. सध्या देशात मोदी भक्तांची कमी नाही. त्यात भक्त पत्रकारांची तर मांदियाळीच आहे. प्रचलित निवडणूक पध्दतीवर टिकास्त्र सोडणारी आणि एक निवडणुकीच्या योजनेचं उघड समर्थन करणारी चर्चा ही भक्त मंडळी करत होती. एखादी योजना जाहीर करण्यासाठी खोट्याचं खरं करावं लागतं तसंच एक निवडणुकीचा बागुलबुवा पुढे केला जात आहे. नोटबंदीचा निर्णय लागू करताना भक्तांनी खोटी कारणं लोकांच्या डोक्यात घातली. प्रत्यक्ष त्यातील एकही मुद्दा नोटबंदीत खरा ठरला नाही. ना महागाई थांबली, ना दहशतवाद कमी झाला. ना काळाबाजार थांबला ना भ्रष्टाचार. उलट नोटबंदीनंतर या सगळ्याच गोष्टी वाढल्या. तसंच एक निवडणुकीचं सुरू आहे. एकतर्फी घेतलेले निर्णय लोकांच्या गळी उतरवण्याचे उद्योग गेल्या अनेक वर्षांपासून सुरू होते. देशातील निवडणुका म्हणजे प्रचंड खर्च, वेळखाऊ प्रक्रिया असल्याचं जाणीवपूर्वक दाखवलं जात होतं. इतका पैसा जातो म्हटल्यावर जो तो या निर्णयाचं स्वागत करणार नाही, असं नाही. तरीही एक निवडणुकीत खर्च अर्ध्यावर येईल, असं कोणाला वाटत असेल तर त्यांची वेड्यात गणती करावी लागेल. मुळात एक निवडणूक संकल्पना ही लोकसभा आणि विधानसभेच्या निवडणुका एकाचवेळी घेण्याची होती. त्यात मोदी भक्तांनी ग्रामपंचायतींनाही सामील करण्याचा अतिपणा केला आहे. भक्त मुख्यमंत्र्यांनीही त्याची री ओढली. यामागल्या अडचणींचा त्यांनी विचारच केला नाही. घटनेप्रमाणे



कायदेमंडळाची मुदत ही पाच वर्षांची असते. ही मुदत कमी केल्याविना एक निवडणूक ही संकल्पना प्रत्यक्ष कृतीत उतरू शकत नाही. मुदत कमी करणं म्हणजे घटनेने दिलेला अधिकार काढून घेणं असाच अर्थ निघतो. काही अपवाद वगळता 1067च्या सार्वत्रिक निवडणुकीनंतर दोन्ही निवडणुका या चौथ्या सार्वत्रिक निवडणुकीपर्यंत सारख्याच पार पडल्या. घटनेत या निवडणुका एकाचवेळी व्हाव्यात अशी तरतूद नाही. 1967पर्यंत त्या योगायोगाने एकत्रितच पार पडलेल्या दिसून येतात. या निवडणुकांमध्ये काँग्रेस पक्ष केंद्रात निवडून आला. मात्र अनेक राज्य त्या पक्षाच्या हातून निसटली. आघाड्यांच्या सरकारांचा उदय झाला आणि केंद्राच्या हट्टाने राज्यातील सरकारं दोलायमान आणि अस्थित बनू लागली. भाजपच्या केंद्रातल्या सत्तेच्या काळात प्रादेशिक पक्षांची सरकारं अस्थिर करण्याच्या घटना वारंवार सुरू झाल्या. 1972मध्ये घ्यायची निवडणूक इंदिरा गांधींच्या सरकारने एक वर्ष आधीच घेऊन टाकली. तरीही केंद्र आणि राज्यातील सत्ता एक पक्षीय राहिली नाही. 1990नंतर तर लोकसभेचा कालावधी कोणत्याच सरकारला पूर्ण करता आलेला नाही. यामुळे मुदतपूर्व निवडणुका घेण्यावाचून पर्याय राहिला नाही. देशातील सरासरी तीन ते चार राज्यांच्या निवडणुका या लोकसभा निवडणुकीबरोबर घ्याव्या लागतात. मात्र इतर राज्यांच्या निवडणुका या मुदत संपल्यावर घेतल्या गेल्या. वर्षभरात सुमारे एक याप्रमाणात राज्याच्या विधानसभा निवडणुका पार पडल्याचं दिसतं. तरीही संविधानाने घालून दिलेल्या तत्वानुसार निवडणुकीचं वेळापत्रक अंमलात आणलं गेलं. यामुळे सरकार कोणतं आणायचं आणि कोणतं ठेवायचं याचा जनतेला घटनेने दिलेला सार्वभौम अधिकार अबाधित राहिला. हा अधिकार नव्या तरतुदींमुळे धुळीस मिळेल, हे उघड आहे. मुळ घटनेला घातलेला तो हात होय, असं म्हटलं तर ते गैर नाही. एखाद्या राज्याचा मुख्यमंत्री हा सार्वभौम जनतेच्या पसंतीतून



उतरला तर राज्यात मुदतपूर्व निवडणुका घेणं हे संविधानाने निश्चित केलं आहे. सहा महिन्यात त्यासंबंधिचा निर्णय घेणं अगत्याचं असतं. नव्या तरतुदीनुसार सरकार बरखास्त झालं तर एक निवडणूक तत्व अंमलात कसं आणणार? ते आणणं शक्य नाही. मग लोकसभा निवडणूक येईपर्यंत त्या राज्यावर राष्ट्रपती राजवट लादण्याशिवाय पर्याय नाही. घटनेची ही पायमल्ली नाही तर काय? मागल्या दाराने घटनेवरील हे अतिक्रमणच होय. खर्च नको म्हणून निवडणुका नकोत, असं म्हणणं हा पळतीचा मार्ग होय. निवडणुकीत केलेला अव्वाच्या सवा खर्च जाहीर करायची लाज वाटणारा सत्ताधारी भाजप आज खर्चाचा हिशोब सांगतो म्हणजे नवलच म्हटलं पाहिजे. देशाच्या पैशाची इतकी काळजी आहे तर पार्टी फंड म्हणून जमा केलेल्या इलेक्ट्रोल बाँडचा आणि कोरोना काळात निर्माण केलेल्या पीएम केअर फंडाचा हिशोब भाजपने दिला पाहिजे. 2014मध्ये पार पडलेल्या निवडणुकीत झालेला खर्च हा 3426 कोटींच्या घरात होता. म्हणजे प्रत्यक्षात एक मतदारामागे तो 41.65 पैसे इतका गणला गेला. या निवडणुकीसाठी केलेल्या खर्चाची तरतूद लक्षात घेतली तर हा खर्च त्या तरतुदीच्या पाच टक्के इतकाही नव्हता, हे स्पष्ट झालंय. यामुळे खर्चाच्या नावाने केला जाणारा प्रचार हा केवळ गैरलागू आहे. एकाचवेळी दोन्ही निवडणुका पार पडल्या तरी यंत्रणेला स्वतंत्रपणेच राबावं लागेल. मतदान ते मतमोजणी या प्रक्रिया स्वतंत्ररित्या पार पाडाव्या लागतील. यासाठी वापरले जाणारे कर्मचारी काही आयात करावे लागत नाहीत. ते आपल्याच शासनाचे कर्मचारी असतात. निवडणुकीच्या निमित्ताने आचारसंहितेत विकास कामं अडतात, हे आणखी एक निमित्त पुढे केलं जातं. वास्तवात हा तर आदर्श आचारसंहितेचाच भाग असल्याने असा रोख आल्याविना आचारसंहितेचं महत्व अधोरेखित होणार नाही. दुसरं म्हणजे एखाद्या मुख्यमंत्र्याविरोधात अविश्वास प्रस्ताव आणण्याचा विरोधकांचा अधिकार गोठवण्याचा प्रयत्न एक निवडणूक संकल्पनेतून पुढे येणार, हे ही उघड आहे. नवनियुक्त सरकार नेमण्याचा जनतेचा अधिकार काढून घेण्याचा हा घातक पायंडा या संकल्पनेत स्पष्ट दिसतो आहे. एक निवडणुकीमुळे निवडणुका पारदर्शक होतील, या म्हणण्याला आता अर्थ राहिलेला नाही. कारण 2014नंतर पार पडलेल्या निवडणुकांची अवस्था देशातील जनतेने नजरेखालून घातलेलीच आहे. पारदर्शकतेची झालेली ऐशी की तैशी कोणीही विसरू शकत नाही. केंद्रातील सत्ता नजरेसमोर ठेवून मतदारांकडून राज्यातील निवडणुकीत मतदानाचा अंदाज घेतला जाईल. यामुळे प्रादेशिक पक्ष ही संकल्पनाही मोडित निघेल ही भीती गैर नाही. या संकल्पनेत एकाच पक्षाचं हीत गृहित धरलं जात असल्याचं स्पष्ट दिसतं. एकूणच लोकशाहीवरचं आजवरचं मोदींचं प्रेम लक्षात घेता अभिप्रेत नसलेल्या एक निवडणूक पध्दतीचा वापर रेटणं हा भाजपच्या घटना बदलाच्या मनसुब्यांचाच एक भाग होय.

**(लेखक ज्येष्ठ पत्रकार - राजकिय विश्लेषक आहेत.)**

## मंत्री चव्हाणांच्या वाढदिवसाची टिंगल करणारे फलक लावणाऱ्यांविरुध्द गुन्हा

**डोंबिवली :** डोंबिवलीचे आमदार तथा सार्वजनिक बांधकाम मंत्री रवींद्र चव्हाण यांच्या शुक्रवारच्या वाढदिवसाचे औचित्य साधून त्यांच्या बदनामीचे आणि सामाजिक तेढ निर्माण करणारे फलक काही समाजकंटकांनी गुरूवारी मध्यरात्री डोंबिवली शहराच्या विविध भागात लावले होते. हा प्रकार गुरुवारी मध्यरात्री उघड होताच, वरिष्ठ पोलीस अधिकारी शहरात दाखल झाले. हे फलक छपाई करणाऱ्या उल्हासनगरच्या जॉली प्रिंटर्सच्या मालकाला ताब्यात घेऊन त्याच्या विरुध्द विष्णुनगर पोलीस ठाण्यात भाजपच्या एका कार्यकर्त्याच्या तक्रारीवरून पोलिसांनी गुन्हा दाखल केला. शुक्रवारी सार्वजनिक बांधकाम मंत्री रवींद्र चव्हाण यांचा वाढदिवस असल्याने भाजपसह सामाजिक कार्यकर्त्यांनी त्यांच्या शुभेच्छांचे फलक डोंबिवलीत लावले होते. रंगशाळा पब्लिसिटीचे संचालक आणि भाजप कार्यकर्ते विनय पालव यांनीही शहरातील मुख्य रस्ते, कमानी, चौक भागात शुभेच्छा फलक लावले होते.




**म ह त्त्वा चे**

### एकाच दिवशी घरफोडीच्या पाच घटनांची नोंद

**नवी मुंबई :** नवी मुंबईत एकाच दिवशी पाच घरफोडीची नोंद करण्यात आली असून यात दोन दुकाने तर अन्य घरे आहेत. यात एकूण १० लाख ३८ हजार ४१० रुपयांचा ऐवज चोरी झाला आहे. शिरवणे एमआयडीसी येथे असणाऱ्या टाटा आणि मारुती या कंपन्यांच्या वाहनांच्या दुकानांतून अज्ञात चोराने ३ लाख १६ हजार ९१० रुपयांची रोकड चोरी केली आहे. ही चोरी १७ सप्टेंबर रोजी अपरात्री करण्यात आली आहे. चोरट्यांनी दुकानांचे दरवाजाचे कुलूप तोडून आत प्रवेश केला होता. विशेष म्हणजे एकाच रात्री ही चोरी करण्यात आल्याने चोर एकच असण्याची शक्यता वर्तवली जात आहे. दोन्ही दुकानांची मिळून एकच तक्रार घेत अनोळखी व्यक्तीविरोधात गुन्हा नोंद करण्यात आला आहे. याबाबत तुर्भे एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा लागू करण्यात आला आहे.सेक्टर ४८ नेरुळ येथील शिवदर्शन सोसायटीमध्ये एका सदनिकेत चोरी झाली आहे. १५ ते १८ सप्टेंबरच्या दरम्यान ही चोरी झाली असून चोरट्याने उघड्या दरवाजातून आत प्रवेश करीत दोन लॅपटॉप आणि एक मोबाइल असा २० हजारांचा ऐवज चोरी केला आहे. याबाबत नेरुळ पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

### अत्याचारप्रकरणी तरुणावर पोक्सो कायद्यांतर्गत गुन्हा

**नवी मुंबई :** अल्पवयीन मुलीला जबरदस्तीने घरात ओढून नेण्याचा प्रयत्न करणाऱ्या युवकाच्या विरोधात पोक्सो कायद्यांतर्गत कारवाई करण्यात आली आहे. या घटनेत आरोपीने पीडितेच्या मनात लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य केल्याचा आरोप ठेवण्यात आला असल्याचे पोलिसांनी सांगितले. किशोर कोनाळे असे आरोपीचे नाव आहे. आरोपीने तिला बोलावले, पीडितेने आरडाओरडा केल्याने पीडितेचे नातेवाईक धावून आले व तिची सोडवणूक केली. जबरदस्तीने घरात घेऊन जात असताना आरोपीने तिच्या मनात लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य केले. त्यामुळे या प्रकरणी बाल लैंगिक अत्याचार प्रतिबंधक कायद्यांतर्गत विनयभंगाचा गुन्हा नोंद करण्यात आला आहे, अशी माहिती पोलिसांनी दिली.

### कल्याण-डोंबिवलीत दोन तरुणांच्या आत्महत्या

**कल्याण :** कल्याण, डोंबिवली शहरातील दोन वेगळ्या घटनांमध्ये दोन तरुणांनी शुक्रवारी आत्महत्या केल्या. डोंबिवलीतील एका प्रकरणात तरुणाला मैत्रिणीने भेटण्यास नकार दिला म्हणून नैराश्य आल्याने तरुणाने मैत्रिणीच्या राहत्या घराच्या चौथ्या माळ्यावरून उडी मारून आत्महत्या केली. तर, कल्याणमधील ११ वर्षाच्या तरुणाने आपले प्रेमप्रकरण उघड झाल्याने आलेल्या तणावातून आत्महत्या केली. डोंबिवलीतील मानपाडा, कोळसेवाडी पोलीस ठाण्यात या दोन्ही प्रकरणांच्या नोंदी आहेत. कोल्हापूर जिल्ह्यातील पन्हाळा तालुक्यातील एक तरुण स्वप्निल अनिल धुमाळ (२३) हा डोंबिवलीत आपल्या मैत्रिणीला भेटण्यासाठी आला होता. परंतु, मैत्रिणीने त्याला भेटण्यास नकार दिला. यामधून त्याला नैराश्य आले. या नैराश्यातून त्याने मैत्रिणीच्या राहत्या घराच्या चौथ्या माळ्यावरील गच्चीवर जाऊन जमिनीवर उडी मारून आत्महत्या केली.

# मीच चिमुरडीवर लैंगिक अत्याचार केला अक्षय शिंदेची डॉक्टरांसमोर कबुली


## आरोपपत्रात माहिती

**प्रतिनिधी**
■ **बदलापूर**

बदलापूर लैंगिक अत्याचार प्रकरणातील आरोपी अक्षय शिंदे याने वैद्यकीय तपासणी सुरु असताना डॉक्टरांसमोर आपला गुन्ह्यातील सहभाग कबूल केला होता, अशी माहिती एका वरिष्ठ अधिकाऱ्याने दिली आहे. याचा उल्लेख पोलिसांनी दाखल केलेल्या आरोपपत्रात आहे.

बदलापूरमधील एका शाळेत शिकणाऱ्या दोन चिमुरड्यांवर लैंगिक अत्याचार झाल्याचे प्रकरण ऑगस्ट महिन्याच्या मध्यात उघडकीस आले होते. या प्रकरणी स्थापन केलेल्या एसआयटीचा तपास पूर्ण झाला आहे.

डॉक्टर, शाळेचे कर्मचारी, फॉरेन्सिक टीमचे अधिकारी यांच्यासह २० जणांची साक्ष नोंदवण्यात आली आहे. पोलिसांनी विशेष न्यायालयात



आरोपपत्र दाखल केले आहे. तपास करताना आरोपीने डॉक्टरांसमोर आपण गुन्ह्यात सहभागी होतो, असा कबुलीजबाब दिल्याचं आरोपपत्रात नमूद करण्यात आलं आहे.

पोलिसांनी या प्रकरणी संबंधित डॉक्टर आणि आरोपी यांचा जबाब नोंदवला आहे. याशिवाय वैद्यकीय चाचणीचे अहवाल आणि २० जणांची साक्ष हे आरोपी अक्षय शिंदेवर असलेले आरोप सिद्ध करण्यास मदत करणारे ठरतील.

दरम्यान, अक्षयच्या पहिल्या पत्नीच्या जबाबानंतर आता दुसऱ्या पत्नीनेही त्याच्या विरोधात जबाब नोंदवला आहे. अक्षय हा अनैसर्गिक लैंगिक संबंध प्रस्थापित करण्याचा प्रयत्न करायचा, असा आरोप तिने केला आहे. अक्षयच्या या विकृतपणाला कंटाळूनच आपण माहेरी निघून गेल्याचंही तिने जबाबात म्हटलं आहे

याआधी अक्षय शिंदेच्या पहिल्या पत्नीनेही अक्षय हा शरीरसंबंध प्रस्थापित करताना हैवानासारखा वागत असल्याचे सांगितले होते. आता दुसऱ्या पत्नीने देखील त्याचा विकृतपणा उघड केल्यामुळे त्याच्या गळयाभोवती आवळलेला फास अधिक घट्ट झाला आहे.

आरोपींच्या कबुलीजबाबात दोन आरोपपत्रे तयार करण्यात आली आहेत. त्यांची एकत्रित पृष्ठसंख्या ५०० हून अधिक झाली आहे. पुरावा म्हणून घटनेच्या दिवशी शाळेच्या मुख्य गेटमधून आत प्रवेश करणाऱ्या आणि बाहेर पडणाऱ्या आरोपीचे सीसीटीव्ही फुटेजही जोडण्यात आले आहे. हे प्रकरण फास्ट ट्रॅक कोर्टात वर्ग करण्याची मागणी एसआयटीच्या टीमने राज्य सरकारकडे केली आहे. एसआयटीच्या प्रमुख असलेल्या आयपीएस अधिकारी आरती सिंग यांच्या नेतृत्वात बदलापुरातील अत्याचार प्रकरणाचा संपूर्ण तपास करण्यात आला.

# सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांच्या पदरात पडणार दिवाळीपूर्वी ग्रॅच्युइटीच्या थकबाकीचे पैसे

## आयुक्त विकास ढाकणे यांचे आश्वासन

**प्रतिनिधी**
■ **उल्हासनगर**

मृत्यूपूर्वी ग्रॅच्युइटी, रजा रोखिकरन आणि 7 व्या वेतन आयोगाच्या फरकाची एकत्रित रकम आमच्या पदरात पडणार काय?अशी हाक देण्यासाठी शेकडो सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांनी दोन दिवस आंदोलन केल्यावर उल्हासनगर महानगरपालिका आयुक्त विकास ढाकणे यांनी दिवाळीपूर्वी ग्रॅच्युइटीच्या थकीत रकमेपैकी दरमहा 50 हजार रुपये देण्याचे आश्वासन दिले आहे.. त्यामुळे सेवनिवृत्तांनी कायद्याने वागा लोकचळवळचे राज असरोंडकर, प्रहार जनशक्ती पक्षाचे जिल्हाध्यक्ष ॲड. स्वप्निल पाटील यांच्या नेतृत्वाखाली केलेले मृत्यूपूर्वीच्या आंदोलनाच्या लढ्याला यश आले आहे.



तसेच आयुक्त विकास ढाकणे यांनी सोमवारी 23 तारखेला 7व्या वेतन आयोगाच्या फरकाच्या रकमेबाबत बैठक बोलावली असून त्यात सकारात्मक निर्णय होण्याची शक्यता आहे.महानगरपालिकेतून सेवानिवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांना निवृत्तीच्या दिवशी मिळायला हवी असलेली ग्रॅच्युइटी, सातव्या वेतन आयोगाचा फरक आणि इतर लाभांची देणी पाच-दहा वर्षांपासून थकलेली होती. प्रशासनाकडून केवळ दरमहा दोन हजार रुपये देऊन या थकबाकीची तुटपुंजी भरपाई केली जात होती.. त्यामुळे आर्थिक अडचणींचा सामना करणारे सेवानिवृत्त कर्मचारी 'कायद्याने वागा' लोकचळवळीचे राज असरोंडकर, प्रहार जनशक्ती पक्षाचे जिल्हाध्यक्ष ॲड. स्वप्निल पाटील यांच्या नेतृत्वाखाली हक्क मिळवण्यासाठी रस्त्यावर उतरले होते.

## शिक्षण संस्थेमध्ये गुंतवणुकीच्या नावाखाली महिलेला 40 लाखांचा गंडा

**प्रतिनिधी**
■ **भाईंदर**

मिरा-भाईंदरमधील बड्या खासगी शिक्षण संस्थेमध्ये गुंतवणूक केल्यास चांगला नफा देण्याच्या नावाखाली एका महिला व्यापाऱ्याची 40 लाखांची फसवणूक करण्यात आली. संबंधित संस्थेच्या अध्यक्षाचा नातेवाईक असल्याचं सांगून ही फसवणूक करण्यात आली. या प्रकरणी काशिमिरा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आलाय.

मिरारोडच्या विजय पार्क परिसरात राहणाऱ्या शबाना हुसेन यांचा कपड्याचा व्यापार आहे. त्यांची काही वर्षांपूर्वी परदेशात व्यापार करत असताना जितेंद्र कुमार तिवारी नामक व्यक्तीशी ओळख झाली. यावेळी तिवारीनं तो 'राहुल कॉलेज शिक्षण संस्थे'चे अध्यक्ष लल्लन तिवारी यांचा नातेवाई असल्याचं सांगितलं. एके दिवशी लल्लन तिवारी यांच्या नातवाच्या लग्नातून व्हिडिओ कॉल हुसेन यांना विश्वास बसावा यासाठी केला होता. शिक्षण संस्थेत 40 लाख रुपये गुंतवणूक केल्यास आठवड्याभरात 5 लाख नफा अधिक मूळ रक्कम असे 45 लाख परत करू, असं जितेंद्र तिवारी यानं त्या महिलेला सांगितलं. त्यावर विश्वास ठेवून शबाना यांनी तिवारीला पैसे दिले. हे पैसे परत करण्यास मात्र टाळाटाळ केली जात होती.

## बुधवारी जिल्हा परिषद शाळा बंद शिक्षक संघटनांची सामूहिक रजा

### जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा

**प्रतिनिधी**
■ **ठाणे**

शासनाच्या प्राथमिक शिक्षण क्षेत्रातील चुकीच्या धोरणात विरोधात राज्यातील सर्व शिक्षक संघटनांनी शासनाविरोधात आंदोलनाचा निर्णय घेतला असून ठाणे जिल्ह्यातील जिल्हा परिषद शिक्षक येत्या बुधवार, २५ सप्टेंबरला सामूहिक रजा घेऊन जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढणार आहेत. त्यामुळे या दिवशी जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या शाळा बंद राहणार आहेत.

१५ मार्च रोजी शिक्षक संच मान्यता आणि ५ सप्टेंबरच्या कंत्राटीत शिक्षक भरती संदर्भातल्या शासन निर्णयामुळे २० पट असलेल्या शाळेमध्ये एक कायम तर एक कंत्राटी शिक्षक नेमला जाणार आहे. आधारवर संचमान्यता



होत असल्याने दुर्गम भागात विद्यार्थी अधिक आहे. मात्र आधार नोंदणी नसल्याने अनेक शिक्षकांची पदे कमी होणार आहे.

त्यामुळे शासनाचे हे धोरण डोंगरी दुर्गम भागातील तसेच वाडी- वस्तीवर शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांवर अन्याय करणारे आहेत. शासनाच्या या निर्णयाविरोधात विद्यार्थी, शिक्षक पालकांमध्ये असंतोष आहे. तसेच शिक्षकांच्या अनेक मागण्या देखील आहेत. या मागण्यांचा पाठपुरावा आणि शासकीय धोरणांचा विरोध करण्यासाठी सर्व शिक्षक संघटनांनी त्रिस्तरीय असहकार आंदोलन पुकारले आहे. त्याचाच एक भाग म्हणून येत्या बुधवारी ठाणे जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या शाळा बंद राहणार आहेत, अशी माहिती शिक्षक समन्वय समितीचे अध्यक्ष संजय घागस यांनी दिली आहे.

## दिव्यात सोनसाखळी खेचणारा चोरटा गजाआड

**प्रतिनिधी**
■ **दिवा**

दिवा-शिळ रोड परिसरात रामदास म्हात्रे यांची सोनसाखळी चोरून पोबारा करणाऱ्या आरोपी कलीम हारुन शेख (२०) या सोनसाखळी चोरट्याला सीसीटीव्हीमुळे अटक करण्यात यश मिळाले आहे. तसेच, गुन्ह्यातील मुद्देमाल पोलिसांनी हस्तगत केला आहे.रामदास म्हात्रे (५२) हे दिवा नाका येथील मैदानात जात होते. यावेळी दिवा-शिळ रोडवरील मयूर वाइन शॉपसमोर दुचाकीवरून आलेल्या दोघांनी म्हात्रे यांच्या गळयातील एक लाख २० हजारांची सोनसाखळी खेचून पोबारा केला होता. ही घटना ७ जुलै रोजी संध्याकाळी सहाच्या सुमारास घडली. याप्रकरणी अज्ञात सोनसाखळी चोरट्याच्या विरोधात मुंब्रा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला होता. या प्रकरणाचा तपास करताना सीसीटीव्हीमुळे मुंब्रा पोलिसांना एका सोनसाखळी चोरट्याला अटक करण्यात यश मिळाले आहे. मुंब्रा पोलिसांना कळव्यातील शांतीनगर येथील मफतलाल झोपडपट्टीत आरोपी राहत असल्याची माहिती मिळाली होती.

## बेकायदा फलकबाजीवर पालिकेची कारवाई; 2 हजार 516 फलक हटवले

**प्रतिनिधी**
■ **नवी मुंबई**

बेसुमार फलकबाजीने शहराचे विद्रूपीकरण केले जात आहे. गणेशोत्सव काळात शहरभर फलकबाजी पाहायला मिळत होती. अनंत चतुर्दशीच्या गणेश विसर्जनानंतरच पालिकेने कारवाईचा सपाटा लावला असूनदोन दिवसांत जवळजवळ २५०० पेक्षा अधिक फलक पालिकेने हटवले आहेत.

गणेशोत्सव काळात शहरातील चौकाचौकांत फलकबाजीला ऊत आल्याचे पाहायला मिळाले होते. त् परंतु पालिकेने गणेशोत्सवानंतर नवी मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रातील सर्व विभागांत अनंत चतुर्दशीनंतर कारवाई केली आहे. पालिकेने दोन दिवसांत केलेल्या कारवाईत १८९३




छोटे ६२३ मोठे असे एकूण दोन हजार ५१६ फलकांवर कारवाई केली आहे.

पालिका क्षेत्रातील जाहिरातीचे बॅनर छपाई करून देणाऱ्या एकूण २२ प्रिंटिंग करणाऱ्या व्यावसायिकांना विभाग कार्यालयामार्फत लेखी सूचना देण्यात आल्या. नवी मुंबई महापालिकेच्या विभाग कार्यालयाची परवानगी असल्याशिवाय कोणत्याही प्रकारचे जाहिरात/बॅनर्स/पोस्टर्स छापू नयेत व तसे केल्यास त्यांना महाराष्ट्र मालमत्तेच्या विरुपणास प्रतिबंध करण्याकरिता अधिनियम ११९५ चे कलम ३ नुसार छपाई करणाऱ्यांवर कारवाई करण्यात येईल अशाही सूचना देण्यात आल्या आहेत.

## नेरळमध्ये तीन कॉलेज तरुणांना कारने उडविले

### दोन गंभीर आणि एकाचा मृत्यू

**प्रतिनिधी**
■ **कर्जत**

कर्जत कल्याण राज्य मार्गावरील नेरळ येथे एका कारचालकाने तीन कॉलेज तरुणांना उडवले आहे. या अपघातात दोन तरुणांना गंभीर दुखापत झाली आहे तर तिसरा मयूर मोहन पारधी या तरुणाचा रुग्णालयात उपचार दरम्यान मृत्यू झाला.कारचालक लोचन धुरी याला नेरळ पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.मयूर मोहन पारधी,भगवान सखाराम पारधी आणि विशाल दरोडा हे तीन कॉलेज तरुण नेरळ विद्यामंदिर शाळेत नेहमी प्रमाणे चालत चालले होते,दरम्यान कर्जत दिशे कडून आलेली एर्टिगा कार ही अंबरनाथ येथे जात असताना नेरळ येथे चालकाचा वाहनावरील ताबा सुटला आणि कार कॉलेज तरुणांना जावून धडकली.



माथेरान या पायथ्या जवळ असणारे नेरळ जुमापट्टी जवळील धस वाडीतील राहणारे मयूर मोहन पारधी,भगवान सखाराम पारधी आणि विशाल दरोडा हे कॉलेज तरुण नेहमी प्रमाणे कॉलेज मध्ये जाण्यासाठी नेरळ येथे आले होते.नेरळ विद्यामंदिर येथे शिकत असलेले हे तीन तरुण पायी नेरळ कल्याण राज्य मार्गावरून चालत असताना.आज शनिवार 21 सप्टेंबर सकाळी साडेसात वाजण्याच्या सुमारास अंबरनाथमधील राहणारे लोचन धुरी हे कुटुंब सिंधुदुर्ग जिल्ह्यातील कुडाळ फिरून घरी परतत होते.दरम्यान कर्जत कल्याण या राज्य मार्गावरून अंबरनाथ दिशेने mh 05 cv 2834 क्रमांकाची एर्टिगा कार घेवून प्रवास करणारे धुरी यांच्या कार मधे त्यांची पत्नी व 9 वर्षीय मुलगा हे सोबत होते.कार ही नेरळ पोलीस ठाणे सोडून पुढे जात असताना मोहाचीवाडी येथील प्रवेशद्वाराच्या समोर कॉलेज तरुणांना मागून धडकली,चालकाचे नियंत्रण सुटल्याने कार रस्त्याचा कडेला चालत असलेल्या तरुणांना धकडकल्याने यामध्ये दोन तरुण गंभीर जखमी झाले होते तर मयूर मोहन पारधी याची प्रकृती चिंता जनक वाटत असल्याने,उपस्थित नागरिकांनी लागलीच तीनही तरुणांना रुग्णालयात दाखल करून अधिक उपचारासाठी बदलापूर येथे हलविले होते त्यातच मयूर याची प्रकृती खालवल्याने मयूर ला डोंबिवली एम्स हॉस्पिटल येथे उपचारासाठी नेले होते दरम्यान उपचारा आधीच मयूरचा मृत्यू झालाय.नेरळ येथील या घटनेने परिसर हादरला आहे.

## रस्त्यात अपघात झालेला पाहून आ. सरनाईक यांनी दिला मदतीचा हात

**प्रतिनिधी**
■ **भाईंदर**

आमदार प्रताप सरनाईक मतदारसंघात दैनंदिन कामानिमित्त जात असताना रस्त्यात अपघात झाल्याचे त्याच्या निदर्शनास आले. आमदार प्रताप सरनाईक यांनी क्षणाचाही विलंब न लावता ताफा थांबवून या अपघातात जखमी झालेल्या रुग्णाची आस्थेवाईकपणे विचारपूस केली.

पोलिसांची मदत घेऊन आमदार प्रताप सरनाईक यांनी जखमी रुग्णाला उपचारासाठी मिरा भाईंदर येथील स्व. इंदिराबाई बाबुराव सरनाईक कॅशलेस



रुग्णालयात दाखल केले. रुग्णालयात नेताच रुग्णावर डॉक्टरांकडून त्वरीत उपचार करण्यात आले. यावेळी स्वतः सरनाईक रुग्णा सोबत राहून त्यांना धीर दिला. तसेच जखमी रुग्णाच्या नातेवाईकांशी संपर्क करून त्यांना माहिती दिली.

## उल्हासनगरात रस्ते दुरस्तीला सुरवात, आमदार आयलानी यांच्या फोटोसेशनची चर्चा

**प्रतिनिधी**
■ **उल्हासनगर**

महापालिका बांधकाम विभागाने पावसाने विश्रांती घेताच गुरवार पासून रस्ते दुरस्तीला सुरवात केली. टर्निंग पॉईंट ते गोलमैदान रस्त्याच्या दुरुस्तीचे आमदार कुमार आयलानी यांनी पाहणी शुक्रवारी दुपारी करून फोटो सेक्शन करून घेतल्याची चर्चा शहरात रंगली आहे.

उल्हासनगर महापालिकेने पावसाळ्यापूर्वी रस्त्याची दुरुस्ती व खड्डे भरण्यासाठी ६ कोटीच्या निधीची तरतूद केली होती. शहर पूर्व व पश्चिम असे दोन ठेके रस्ता दुरुस्तीचे दिले. मात्र पावसाला सुरवात झाल्यावर रस्ता दुरुस्ती व खड्डे भरण्याच्या कामाला ब्रेक लागला. बाप्पाचे आगमन व विसर्जनही खड्ड्याच्या रस्त्यातून झाले. दरम्यान पावसाने विश्रांती घेतल्याने, महापालिका बांधकाम विभागाने रस्ता दुरुस्तीच्या कामाला सुरुवात केली. कॅम्प नं-३ परिसरातील पवई चौक, गोलमैदान, टर्निंग पॉईंट यासह अन्य रस्त्यातील खड्डे भरणे व डांबरीकरण करण्याचे काम सुरू केली. अशी माहिती बांधकाम विभागाचे उपकार्यकारी अभियंता संदीप जाधव यांनी दिली. शुक्रवारी दुपारी कॅम्प नं-२ येथील टर्निंग पॉईंट ते गोलमैदान रस्त्याच्या डांबरीकरण व खड्डे भरण्याच्या कामाला सुरुवात झाली. आमदार कुमार आयलानी यांनी गोलमैदानकडे जाणाऱ्या रस्त्याच्या दुरुस्ती कामाला शुक्रवारी दुपारी भेट दिली. तसेच दुरावस्था झालेल्या शहरातील रस्त्याची माहिती महापालिका बांधकाम विभागाच्या व अधिकाऱ्यांना देऊन रस्ता दुरुस्ती कामाची पाहणी केली.

## रायगड जिल्ह्यातील पाच हजार लोकवस्तीचे गाव स्वयंप्रकाशित होणार



**प्रतिनिधी**
■ **अलिबाग**

रायगड जिल्ह्यातील पाच हजार लोकसंख्येचे गाव लवकरच सौर उर्जेवर स्वयंप्रकाशित होणार आहे. केंद्र सरकारच्या सोलार व्हिलेज योजनेअंतर्गत हा उपक्रम राबविला जाणार आहे. या प्रकल्पासाठी केंद्र सरकारच्या वतीने १ कोटी रुपयांचे अर्थसहाय्य दिले जाणार आहे. यासाठी जिल्हा परिषदेच्या ग्रामपंचायत विभागाने यासाठी गावाची निश्चिती करावी असे निर्देश सामान्य प्रशासन विभागाचे उपजिल्हाधिकारी डॉ. रविंद्र शेळके यांनी दिले आहेत.

जिल्ह्यात ५ हजारपेक्षा अधिक लोकसंख्या असलेली ६० गावे आहेत. या गावांमधून एका गावाची निवड सोलार व्हिलेज प्रकल्पासाठी केली जाणार आहे. जिल्हा परिषदेच्या ग्रामपंचयात विभागाने महावितरणच्या मदतीने गावाची निवड करावी, स्थानिक ग्रामपंचायतींना विश्वासात घेऊन, त्यांच्याशी चर्चा करावी, सकरात्मक सहभाग देण्याची तयारी असलेल्या गावाची या योजनेसाठी निश्चिती करावी असे निर्देश त्यांनी दिले. ते प्रधानमंत्री सुर्यघर योजनेच्या जिल्हास्तरीय आढावा बैठकीत बोलत होते. यावेळी महावितरणचे अधीक्षक अभियंता राजाराम माने, अधीक्षक अभियंता संजय पाटील कार्यकारी अभियंता शैलेश कुमार, उपमुख्य कायकारी अधिकारी ग्रामपंचायत विभाग राजेंद्र भालेराव आदी उपस्थित होते.

२०३० पर्यत देशात अपारंपरिक उर्जा स्त्रोतामधून ५०० मेगावॅट वीज निर्मिती करण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. यातील पन्नास टक्के वीज निर्मिती सोलारच्या माध्यमातून व्हावी यासाठी प्रयत्न सुरू आहेत. ही बाब लक्षात घेऊन घरोघरी सौर उर्जेतून वीज निर्मिती करण्याचे ध्येय ठेवण्यात आले आहे. यासाठीच प्रधानमंत्री सुर्यघर योजनेची सुरूवात करण्यात आली आहे. या योजनेअंतर्गत रायगड विभागासाठी १ लाख १६ हजार १०० लाभार्थ्यांचे उद्दिष्ट देण्यात आले आहे. मात्र ऑगस्ट अखेरपर्यंत ३ हजार ७२३ जणांनी योजनेअंतर्गत अर्ज केले आहेत.

## 'स्वच्छता ही सेवा' मोहीमेत 1600 हून अधिक विद्यार्थी, नागरिकांनी केली खारफुटी परिसराची स्वच्छता

**प्रतिनिधी**
■ **नवी मुंबई**

स्वच्छता ही सेवा पंधरवड्यात स्वभाव स्वच्छता संस्कार स्वच्छता अभियानांतर्गत नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने 2 ऑक्टोबरपर्यंत दररोज विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आलेले आहे. यामध्ये आज 21 सप्टेंबर या जागतिक किनारपट्टी स्वच्छता दिनाचे औचित्य साधून महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली विविध विभागांमध्ये खारफुटी स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. यामध्ये 1600 हून अधिक एनसीसी व स्काऊटचे विद्यार्थी, स्वयंसेवी संस्थांचे सदस्य, नागरिक यांच्या एकत्रित सहयोगातून महापालिका अधिकारी, कर्मचारी



यांनी सर्वच ठिकाणी खाडीकिनायांवरील खारफुटी भागातील कचरा साफ केला.

बेलापूर विभागात डोलया समुद्रेश्वर मंदीर पाणथळ भाग, नेरूळ विभागात सारसोळे जेट्टी 1 व 2 भाग, वाशी येथील सागर विहार किनारा, कोपरखैरणे येथील धारण तलाव सेक्टर 19 परिसर, घणसोली येथे सेक्टर 12 पामबीच रोड नजिकचा खाडीकिनारा परिसर, ऐरोली सेक्टर 10 येथील जैवविविधता केंद्र कांदळवन परिसर . यामध्ये सहभागी विद्यार्थी, नागरिकांनी समुद्राच्या पाण्यातून वाहत आलेला प्लास्टिक, कापड, थर्माकोल, कागद यांचा कचरा संकलित केला. अतिरिक्त आयुक्त सुनिल पवार यांनी मोहीमेच्या विविध ठिकाणी भेट देत मोहीमेत सहभाग घेतला. त्यांच्यासमवेत त्या त्या ठिकाणी उपस्थित नागरिकांनी स्वच्छता व प्लास्टिकबंदीची सामुहिक शपथ ग्रहण केली. परिमंडळ 1 उपआयुक्त सोमनाथ पोटरे व परिमंडळ 2 उपआयुक्त डॉ.कैलास गायकवाड, घनकचरा व्यवस्थापन विभाग उपआयुक्त डॉ.अजय गडदे व डॉ.संतोष वारूळे यांनीही विविध ठिकाणी मोहीमेत सहभाग घेतला. यामध्ये वाशी येथे सागरविहार सेक्टर 8 परिसरात राबविण्यात आलेल्या खारफुटी व परिसर स्वच्छता मोहीमेत 450 हून अधिक विद्यार्थी व नागरिकांनी उत्साहाने सहभागी होत साधारणत: 2 मेट्रिक टन कचरा संकलित केला. याप्रसंगी माजी आमदार संदीप नाईक यांनी सहभागी होत नागरिक व विद्यार्थ्यांना प्रोत्साहित केले. वाशी विभागाचे सहा.आयुक्त सागर मोरे, मुख्य स्वच्छता अधिकारी सतीश सनदी, स्वच्छता अधिकारी सूर्यकांत म्हात्रे यांच्या नियंत्रणाखाली राबविण्यात आलेल्या या खारफुटी स्वच्छता मोहीमेत सागरी सीमा मंच, कर्मवीर ॲकेडमी, मॅनग्रुव्हज मार्शल या संस्थांच्या सदस्यांप्रमाणेच आयसीएल झुनझुनवाला कॉलेज सेक्टर 9, टिळक कॉलेज सेक्टर 28, वेस्टर्न कॉलेज सानपाडा, कर्मवीर भाऊराव पाटील मॉडर्न महाविद्यालय सेक्टर 15 येथील एनएसएसचे विद्यार्थी सहभागी होते.

## ध्वनीप्रदूषण, 'लेसर' वापर प्रकरणी 58 जणांवर कारवाई

**सातारा :** गणेशोत्सवात आणि मिरवणुकीत ध्वनी प्रदूषण आणि घातक प्रकाशझोतांच्या वापरावरील बंदी झुगारणारे तसेच तडीपार आदेश असतानाही शहरात दिसल्याप्रकरणी आतापर्यंत ५८ जणांवर कारवाई करण्यात आली आहे. गणेशोत्सव कालावधीमध्ये पर्यावरण संरक्षण कायद्यांतर्गत ध्वनी प्रदूषण यंत्रणेचा वापर करुन ध्वनी प्रदूषण कायद्यातील तरतुदींचा भंग केल्याचे समोर आले. त्यानुसार एकूण २० ध्वनी प्रदूषण करणाऱ्या वाहनचालकांना व धारकांविरुद्ध उपविभागीय अधिकारी सातारा प्रस्ताव पोलीस यांच्याकडे देवून ते पुढे न्यायालयाकडे खटले पाठण्यात आले आहेत. गणपती विसर्जन मिरवणुकीमध्ये ज्या मंडळांनी घातक प्रकाशझोतांचा वापर केला त्यांनाही कारवाईचा दणका देण्यात आला. एकूण ८ जणांविरुद्ध गुन्हे दाखल करुन साहित्य जप्तीची कारवाई करण्यात आली आहे. गणेशोत्सव कालावधीमध्ये कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसीलदार, सातारा यांनी सातारा शहर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील एकूण ९७ सराईत गुन्हेगारांना तडीपार केले होते.



# नवीन विमानतळाला जगद्गुरू संत तुकाराम महाराजांच्या नावासाठी प्रयत्न करणार- केंद्रीय मंत्री नितीन गडकरी

### वारकऱ्यांना आवश्यक सोई-सुविधा देण्याचा प्रयत्न- उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**प्रतिनिधी**
■ **पुणे**

पुण्यातील नवीन विमानतळाचे काम चांगले झाले असून या नवीन विमानतळाला जगद्गुरू संत तुकाराम महाराज यांचे नाव देण्याबाबतच्या प्रस्तावाला मंजुरीसाठी प्रयत्न करण्यात येतील, असे प्रतिपादन केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी केले.

भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्यावतीने महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्था, कमिन्स महाविद्यालय, कर्वेनगर येथे आयोजित जिल्ह्यातील विविध प्रकल्पांच्या भूमिपूजन प्रसंगी ते बोलत होते. यावेळी केंद्रीय सहकार आणि नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, राज्याचे



सहकार मंत्री दिलीप वळसे पाटील, उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत (दादा) पाटील, खासदार मेधा कुलकर्णी, सुप्रिया सुळे, आमदार उमा खापरे, योगेश टिळेकर, अमित गोरखे, माधुरी मिसाळ, भीमराव तापकीर, सिद्धार्थ शिरोळे, विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार, जिल्हाधिकारी डॉ. सुहास दिवसे, प्राधिकरणाचे मुख्य प्रबंधक अंशुमाली श्रीवास्तव, प्रकल्प संचालक संजय कदम आदी उपस्थित होते.

केंद्रीय मंत्री गडकरी म्हणाले की, महाराष्ट्र ही संतांची भूमी आहे. आपला इतिहास, संस्कृती आणि वारसा यादृष्टीने महाराष्ट्राचे एक वेगळेपण असून संत महापुरुषांच्या ग्रंथानी, ओव्यांनी आपले जीवन समृद्ध आणि संपन्न केले आहे. श्री संत ज्ञानेश्वर महाराज आणि संत तुकाराम महाराज पालखी महामार्ग हे भक्तीमार्ग असून या मार्गाने लाखो वारकरी पायी जातात. वारकऱ्यांच्या सुविधेच्या अनुषंगाने दोन्ही पालखी मार्गाकरीता सुमारे १२ हजार कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. या मार्गावर संत ज्ञानेश्वर महाराज, संत तुकाराम महाराज, श्री विठ्ठल यांच्या प्रतिकृती, विजेची व्यवस्था, वृक्षाची पुर्नलागवड तसेच सुमारे ४२ हजार नवीन झाडे लावण्यात आली आहेत. आगामी काळात स्वयंसेवी संस्था आणि वारकऱ्यांनी या मार्गावर वृक्षारोपण करुन येत्या काळात हरित महामार्ग करण्याकरीता सहकार्य करावे.

एनएचएआयमार्फत नाशिक फाटा ते खेड, हडपसर ते यवत, कात्रज बोगदा ते रावेत, तळेगाव-चाकण-शिक्रापूर, पुणे ते शिरुर, पुणे ते छत्रपती संभाजीनगर अशी विविध विकास कामे हाती घेण्यात आली आहेत. येत्या डिसेंबरपर्यंत पुणे शहर आणि जिल्ह्यात १ लाख ५० हजार कोटी रुपयांची कामे सुरू करण्यात येतील. याशिवाय पुणे ते सातारा महामार्गाचा नवीन विस्तृत प्रकल्प अहवाल तयार करुन कामे करण्यात येतील.

# केंद्र सरकारच्या चुकीच्या धोरणामुळे कारखान्यांना 10 हजार कोटींचा फटका

### शंकरराव गडाख यांचा आरोप

**प्रतिनिधी**
■ **अहमदनगर**

केंद्र सरकारच्या साखर निर्यात बंदीचा तोटा शेतकऱ्यांना बसला असून आयात निर्यातीच्या चुकीच्या धोरणामुळे साखर कारखान्यांना तब्बल दहा हजार कोटीचा फटका सहन करावा लागत असल्याचा आरोप शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे आमदार शंकरराव गडाख यांनी केला आहे. सोनई येथील मुळा सहकारी साखर कारखान्याच्या 54 व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत ते बोलत होते.

सोनई येथील मुळा सहकारी साखर कारखान्याच्या 54 व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे आयोजन करण्यात आले होते. सभेच्या अध्यक्षस्थानी साखर कारखान्याचे अध्यक्ष नानासाहेब तूवर होते. यावेळी



आमदार शंकरराव गडाख यांनी केंद्र व राज्य सरकारच्या शेतकरी विरोधी धोरणावर बोट ठेवले. “केंद्र सरकारने पाच वर्षात पाच वेळा एफ आर पी वाढवली. त्या तुलनेत साखरेचे किमान दर वाढवले नाहीत. साखर निर्यात बंदीमुळे सध्या साखर कारखान्याच्या गोदामध्ये मोठ्या प्रमाणात साखर पडून आहे. निर्यात बंदी तातडीने उठवून 25 ते 30 लाख टन साखर निर्यात करणे गरजेचे आहे. केंद्राने इथेनॉल प्रकल्पासाठी परवानगी दिल्या, मात्र जाचक अटींमुळे प्रकल्प अडचणीत आला आहे. असे शंकरराव गडाख म्हणाले. साखर कारखानदारी व शेतकऱ्यांना अडचणीतून बाहेर काढण्यासाठी, साखरेचे किमान दर 4 हजार 200 च्या पुढे आवश्यक आहे. सध्या सगळीकडे धरणे भरली असून ऊस उत्पादन मोठ्या प्रमाणात होणार आहे. साखरेची गोदामे मोठ्या प्रमाणात भरली जाणार आहेत. असे असताना केंद्राच्या चुकीच्या धोरणाचा फटका शेतकऱ्यांना बसला असून केंद्राने तातडीने निर्णय घ्यावा अन्यथा दहा हजार इतका अधिकचा तोटा भविष्यात पुन्हा साखर कारखानदारीला सहन करावा लागेल, असे गडाख यांनी सांगितले.

# मुख्यमंत्र्यांच्या बंगल्यावर आ. भोंडेकरांना आधी 'नो एन्ट्री' मग 'एन्ट्री'

**प्रतिनिधी**
■ **नागपूर**

शिवसेना शिंदे गटाचे समर्थक भंडाऱ्यातील अपक्ष आमदार नरेंद्र भोंडेकर यांना नागपुरात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या निवासस्थानी प्रवेश मिळाला नाही. त्यामुळे त्यांना परत जावे लागले. नागपुरातील 'रामगिरी' या मुख्यमंत्र्यांच्या शासकीय निवासस्थानाचे गेट न उघडल्याने त्यांना परत जावे लागले, आमदार नरेंद्र भोंडेकर यांनी स्पष्टीकरण दिले. त्या ठिकाणी काय घडले? ते त्यांनी सांगितले.

आमदार नरेंद्र भोंडेकर म्हणाले, मी रामगिरी बंगल्यावर गेलो होता. त्याच्या आधी माझी विमानतळावर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याशी भेट झाली. मी त्यांना सांगितले होते की, तुम्ही बंगल्यावर गेल्यावर मी भेटायला येतो. त्यानुसार मी बंगल्यावर गेलो. बंगल्याच्या गेटवर गेल्यानंतर पीआयने सांगितले की, साहेब आराम करत आहेत. त्यांनी कोणालाच



भेटायला नाही सांगितले आहे. मी म्हटले, ठीक आहे आणि त्या ठिकाणावरुन निघालो. परंतु दहा मिनिटांतच मला साहेबांचा फोन आला. ते म्हणाले, नरेंद्र काही काम असेल तर ये. त्यानंतर मी त्यांच्या बंगल्यावर गेलो. दोन तास बसलो होतो. सोबत आम्ही जेवणही केले. साहेब तसे कोणाची भेट नाकारत नाही. मग ते माझी भेट कशाला नाकारतील, असे आमदार नरेंद्र भोंडेकर यांनी सांगितले.

आमदार नरेंद्र भोंडकर म्हणाले, किशोरी पेडणेकर भंडाऱ्यात शिंदे साहेबांनी माझी भेट नाकारल्याची चुकीची माहिती दिली.त्या अर्धवट माहिती घेतात. किशोरी ताई तुम्हाला माहिती नसते तर तुम्ही का बोलतात? त्यावेळी उद्धव ठाकरेसुद्धा फोन उचलत नव्हते. आम्ही विकास निधी नाही आणला तर लोकांना न्याय कसे देणार? तुमच्या पक्षाच्या चिन्हावर आम्ही आलोत का? तुम्ही आम्हाला तिकीट दिली का? बोलताना तुम्हाला थोडे तरी वाटायला पाहिजे, असे पेडणेकर यांनी त्यांच्यावर केलेल्या टीकेवर त्यांनी उत्तर दिले.

मुख्यमंत्र्यांनी दिलेला शब्द नक्कीच ते पूर्ण करतील. आता निवडणुका जवळ आलेल्या आहेत. त्यामुळे मंत्रिपद मागून बघून काही होणार नाही. पण आता शेवटच्या पंधरा-वीस दिवसांमध्ये किती चांगले काम मतदारसंघासाठी करता येतील यावर आमचा फोकस आहे, असे आमदार नरेंद्र भोंडकर यांनी सांगितले.

# नाशिकमध्ये 5 पेक्षा जास्त व्यक्तींना एकत्र येण्यास बंदी

### आजपासून 15 दिवस मनाई आदेश

**प्रतिनिधी**
■ **नाशिक**

नाशिक शहरात आजपासून पुन्हा मनाई आदेश लागू झाले आहेत. २१ सप्टेंबर ते ०५ ऑक्टोबरपर्यंत १५ दिवसांसाठी शहरात मनाई आदेश लागू आहेत. आजपासून १५ दिवस नाशिक शहरात पोलिसांकडून मनाई आदेश जारी करण्यात आले आहेत. नेमकं हे आदेश का देण्यात आले आहेत? यामागे काय कारण आहे, हे आपण सविस्तर जाणून घेवू या.

शहरातील कायदा आणि सुव्यवस्था बिघडू नये, यासाठी प्रशासनाने २१ सप्टेंबर ते ०५ ऑक्टोबर दरम्यान महाराष्ट्र पोलीस कायद्यानुसार मनाई



आदेश लागू केले आहेत. राज्यातील राजकीय घडामोडींमुळे सत्ताधारी आणि विरोधी पक्षांत आरोप-प्रत्यारोप होत आहेत. त्याचप्रमाणे सण उत्सवामध्ये मोठी गर्दी होण्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर शहरात शांतता राहावी, कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न उद्भवू नये यासाठी १५ दिवसांसाठी शहरात मनाई आदेश लागू केले असल्याचं समोर आलंय.

आगामी सण-उत्सव, आरक्षणाचा मुद्दा, आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर तयार झालेलं राजकीय वातावरण आणि अन्य कारणांवरून कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये, यासाठी निर्णय घेण्यात आलाय. मनाई आदेशाच्या कालावधीत पोलिसांच्या परवानगीशिवाय कुठल्याही प्रकारचे आंदोलन अथवा निदर्शनं करता येणार नाही.

२१ सप्टेंबर ते ०५ ऑक्टोबरपर्यंत दरम्यान स्फोटक पदार्थ, शस्त्र बाळगण्यास, शस्त्र जमा करण्यास अथवा विक्री करण्यास मनाई आहे. मनाई कालावधीत प्रतीकात्मक चित्रं, पुतळ्याचे दहन, घोषणा देणं, आक्षेपार्ह वक्तव्य करण्यास देखील सक्त मनाई आहे. ५ पेक्षा जास्त लोक एकत्र येण्यासाठी पोलीस आयुक्तांची परवानगी आवश्यक आहे. विना परवानगी मोर्चे, आंदोलनांना मनाई देखील या १५ दिवसांमध्ये करण्यात आलीय.

# नवरात्रोत्सवात सप्तशृंगी देवीचं मंदिर राहणार 24 तास खुलं

■ **नाशिक**

नवरात्रोत्सव काळामध्ये साडेतीन शक्तीपीठांपैकी एक असलेल्या सप्तश्रृंगी देवीच्या दर्शनासाठी देशभरातून भक्तगण वणी येथे येतात. याच पार्श्वभूमीवर सप्तश्रृंगी देवीच्या भाविकांसाठी महत्त्वाची बातमी समोर आलीय. नवरात्रोत्सवात गडावर भाविकांची संख्या लाखोंमध्ये असते. एकाचवेळी अनेक भाविक गडावर जमतात. त्यामुळे भाविकांची मोठी गर्दी या नऊ दिवसांमध्ये असते. सप्तशृंगी देवीच्या भाविकांसाठी महत्त्वाची बातमी आहे. नवरात्रौत्सव काळात सप्तशृंगी देवीचं मंदिर भाविकांना दर्शनासाठी २४ तास खुलं राहणार आहे. ०३ ऑक्टोबर ते १२ ऑक्टोबर दरम्यान मंदिर भाविकांना दर्शनासाठी २४ तास खुलं राहणार आहे. नवरात्रौत्सव काळात देवीच्या दर्शनासाठी भाविकांची होणारी गर्दी लक्षात घेता भाविकांच्या सुलभ दर्शनासाठी निर्णय घेण्यात आलाय. गडावर देवीच्या मंदिरात जाणारी फनिक्युलर ट्रॉली देखील २४ तास कार्यान्वित असणार आहे. मंदिर गाभाऱ्यात फनिक्युलर ट्रॉलीने येणाऱ्या भाविकांना ३० टक्के तर पायरीने येणाऱ्या भाविकांना ७० टक्के प्राधान्य देण्याचा निर्णय घेतला गेलाय. परंतु नवरात्रौत्सव काळात नांदुरी ते सप्तशृंगी गडादरम्यान खासगी वाहतूक देखील बंद राहणार आहे. १०० एसटी बसेसच्या माध्यमातून नांदुरी ते सप्तशृंगी गड भाविकांची वाहतूक करण्याचं नियोजन आहे.

# राहुल गांधींनी सीए ॲनाच्या आई-वडिलांशी व्हिडिओ कॉलद्वारे साधला संवाद

**प्रतिनिधी**
■ **पुणे**

अर्न्स्ट अँड यंग इंडियाच्या 26 वर्षीय चार्टर्ड अकाउंटंट (CA) एना सेबॅस्टियन यांचे 20 जुलै रोजी निधन झाले. अहवालानुसार, कामाच्या ताणामुळे त्यांचा मृत्यू हृदयविकाराच्या झटक्याने झाला.

राहुल गांधी यांनी शनिवारी एनांच्या कुटुंबीयांशी व्हिडिओ कॉलद्वारे संवाद साधला. यावेळी त्यांनी हा मुद्दा नक्कीच मांडणार असल्याचे सांगितले.

राहुल यांनी एआयपीसीचे अध्यक्ष प्रवीण चक्रवर्ती यांना अण्णांच्या स्मरणार्थ जनजागृती



मोहीम सुरू करण्याचे निर्देश दिले, जेणेकरून कष्टकरी लोकांच्या हिताचे रक्षण करता येईल.

कॉर्पोरेट व्यावसायिकांसाठी काँग्रेस लवकरच हेल्पलाइन क्रमांक जारी करणार असल्याचे राहुल म्हणाले. यामध्ये कामाचा ताण आणि कार्यसंस्कृती या विषयांवर चर्चा करता येईल. यामुळे कॉर्पोरेट क्षेत्रात काम करणाऱ्या लोकांच्या अडचणी दूर होतील.

5 डे वीकचा प्रस्ताव मी संसदेत ठेवणार केरळमधील काँग्रेस खासदार शशी थरूर यांनी शनिवारी सेबॅस्टियन यांच्या वडिलांशी संवाद साधला. संसदेच्या पुढील अधिवेशनात हा मुद्दा उपस्थित करणार असल्याचे थरूर यांनी सांगितले. मी सरकारी आणि खाजगी कार्यालयात आठवड्यातून 5 कामकाजाचे दिवस आणि दररोज 8 तासांसाठी कॅलेंडर जारी करण्याची शिफारस संसदेत करेन. कामाच्या ठिकाणी अमानुष कृत्य करणाऱ्यांना कठोर शिक्षा झाली पाहिजे. येथे मानवी हक्कांचे उल्लंघन होता कामा नये. केरळच्या असलेल्या सीए एना 19 मार्च रोजी अर्न्स्ट अँड यंग कंपनीत रुजू झाल्या. 6 जुलै रोजी आई-वडील पुण्यात तिला भेटायला आले असता त्यांनी छातीत दुखत असल्याची तक्रार केली. डॉक्टरांनी पाहिल्यानंतर कार्यालयातील कामाच्या ताणामुळे त्या चिंतेत असल्याचे दिसून आले.

त्यांच्या पालकांचे म्हणणे आहे की, त्यांची मुलगी डॉक्टरांना भेटून कार्यालयात परतली होती. रात्री उशिरा घरी आली आणि दुसऱ्या दिवशी सकाळी पुन्हा निघून गेली.

# प्रेयसीच्या कुटुंबाकडून झालेल्या मारहाणीत प्रियकराचा मृत्यू

**प्रतिनिधी**
■ **धुळे**

धुळे जिल्ह्यात एका तरूणाचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना समोर आलीय. प्रेयसीला तिच्या घरी भेटायला गेला. त्यामुळे तरूणाला प्रेयसीच्या कुटुंबीयांनी जबर मारहाण केली. या घटनेत तरूणाचा मृत्यू झाल्याचं समोर आलंय. ही घटना साक्री तालुक्यात घडल्याची माहिती मिळतेय. आपण या घटनेबद्दल सविस्तर जाणून घेवू या.

धुळे जिल्ह्यात साक्री तालुक्यातील निजामपूर पोलीस ठाण्याच्या हद्दीमध्ये प्रियकराला प्रेयसीच्या घरी जाऊन भेटणं जीवावर बेतलं आहे. प्रेयसीने भेटायला बोलावलं म्हणून तरूण तिच्या घरी भेटायला गेला. परंतु याची भनक प्रेयसीच्या घरच्यांना लागल्यानंतर संतापलेल्या प्रेयसीच्या कुटुंबीयांनी प्रियकराला बेदम मारहाण केली असता या मारहाणीमध्ये प्रियकराचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे.

अजय भवरे (वय-२०) असं मयत प्रियकराचे नाव आहे. संबंधित मुलीचे आणि मयत युवकाचे प्रेम संबंध असताना, मुलीनेच आपल्याला भेटायला बोलावले असल्याची जबाब मृत्यूपूर्वी प्रियकराने पोलिसांना दिलाय. डोक्याला जबर मारहाण झाल्यामुळेच युवकाचा उपचारादरम्यान रुग्णालयामध्ये दुर्दैवी मृत्यू झाला आहे. या घटनेनंतर मृत्यूमुखी पडलेल्या युवकाच्या कुटुंबीयांनी आणि परिसरातील नागरिकांनी निजामपूर पोलीस ठाण्याच्या हद्दीमध्ये ठिय्या मांडला.

मारेकऱ्यांना तात्काळ अटक करत त्यांच्यावर कठोरात कठोर कारवाई करा, अशी मागणी मृत तरूणाच्या कुटुंबीयांनी केलीय. निजामपूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलीस पुढील कारवाई करीत आहेत.

# जरांगेंच्या समर्थनार्थ धाराशिव बंद

**प्रतिनिधी**
■ **धाराशिव**

ओबीसी प्रवर्गातूनच मराठा समाजाला आरक्षण देण्यात यावे, या मागणीसाठी सकल मराठा समाजाच्यावतीने शनिवारी धाराशिव जिल्हा बंदची हाक देण्यात आली होती. या बंदच्या माध्यमातून मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनाला मराठा समाजबांधवांनी समर्थन दिले. दरम्यान या बंदला जिल्ह्यातील धाराशिवसह, परंडा, भूम, वाशी, कळंब, उमरगा, लोहारा, तुळजापूर शहरासह तालुक्यातील ग्रामीण भागातील व्यापारी, शाळा, महाविद्यालयांकडून चांगला प्रतिसाद मिळाला. मनोज जरांगे पाटील यांनी मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षण मिळावे, यासाठी अंतरवाली सराटी येथे अमरण उपोषण सुरू केले आहे. त्यांच्या उपोषणाला संपूर्ण मराठा समाजाचे समर्थन आहे. उपोषणाच्या समर्थनार्थ शनिवार जिल्हा बंद ठेवून मागणीचे निवेदन सकल मराठा समाज बांधवांच्या वतीने महसूल प्रशासनामार्फत देण्यात आले.

मराठा समाजाला ओबीसी वर्गातून आरक्षण मिळावे, यासाठी मनोज जरांगे पाटील यांनी गेल्या वर्षभरापासून लढा सुरु केला आहे. सुरुवातीला आंदोलन केल्यानंतर सत्तेतील विविध मंत्र्यांनी भेटी देऊन आरक्षण देण्याचा शब्द दिला होता. यानंतर मुंबईवर मोर्चा काढल्यानंतर खुद्द मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मराठा समाजाच्या आरक्षणासाठी – सगेसोयरेची अधिसूचना काढून त्याची अंमलबजावणी करण्याचा शब्द दिला होता.

# आमिर खान घेणार शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबवण्यासाठी पुढाकार

### डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठात साधला संवाद

**प्रतिनिधी**
■ **अकोला**



बॉलीवूड स्टार आणि 'मिस्टर परफेक्शनिस्ट' अभिनेता आमिर खाने आज अकोल्यात डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाला भेट दिली. त्यांनी विविध प्रक्षेत्रांना भेटी देत शेतीतील नवे तंत्रज्ञान जाणून घेतलं. यावेळी त्यांनी पाणी फाउंडेशन चळवळीत योगदान देणाऱ्या शेतकऱ्यांसोबत संवाद साधला. राज्यातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबविण्यासाठी पुढाकार घेणार असल्याचं ते म्हटल आहे. गुलाबी कलरचा कुर्ता आणि डोक्यावर गांधी टोपी अशा पेहरावात आमिरने शेतकरी आणि शास्त्रज्ञांची संवाद साधला. आमिर खान यांनी आपल्या भाषणात त्यांनी कोरोना काळात सोयाबीन उत्पादन वाढीसाठी 'पाणी फाऊंडेशन'च्या शेतीशाळेचा प्रवास उलगडला. सोयाबीनपासून सुरू झालेला प्रवास आता 26 पिकांच्या उत्पादन वाढीच्या शेतीशाळांपर्यंत गेल्याचं ते म्हणालेय. दरम्यान, राज्यातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबविण्यासाठी पुढाकार घेणार असल्याचं ते म्हटले. भविष्यात आपल्या फाऊंडेशनच्या माध्यमातून या कामात पुढाकार घेणार असल्याचं ते म्हणालेय. आमिर खान हे त्यांच्या अभिनयासह त्यांच्यातील संवेदनशीलपणासाठी ओळखले जातात. अभिनेत्यापलिकडचा संवेदनशील माणूस आज अकोल्यात शेतकरी आणि सर्वसामान्य लोकांना पहायला मिळाला. जागतिक हवामान बदल आणि व्यावसायिक स्पर्धेच्या काळात अत्याधुनिक शेती तंत्रज्ञान, पीक पद्धती, कृषिमाल प्रक्रियेसह विपणन क्षेत्रातील अद्ययावत माहिती शेतकऱ्यांपुढे मांडण्यासाठी डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठात तीन दिवसीय खर खरीप शिवार फेरी आयोजित करण्यात आली आहे.

# कौटुंबिक वादातून सख्या भावानेच भावाला सुरीने भोसकले

**प्रतिनिधी**
■ **राजापूर**

कौटुंबिक वादातून सख्या भावानेच आपल्या भावावर सुरीने भोसकून ठार मारण्याचा प्रयत्न केल्याने चांगलीच खळबळ उडाली आहे. ही घटना राजापूर तालुक्यातील काजीर्डा राणेवाडी येथे शुक्रवारी दुपारी साडेतीन वाजण्याच्या सुमारास घडली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार शुक्रवारी दुपारी काजीर्डा राणेवाडी येथील बाळकृष्ण आत्माराम राणे (वय ७२) आणि त्यांचा सख्खा भाऊ शांताराम आत्माराम राणे (वय ५६ ) यांच्यात घरगुती कारणावरून वाद सुरू झाले. या दोघांमध्ये सुरु झालेले वाद इतके शिगेला पोहोचले की, बाळकृष्ण राणे यांनी रागाच्या भरात आपल्या सख्ख्या भाऊ शांताराम राणे यांना सुरीने भोसकले. त्यांना जीवे ठार मारण्याचा प्रयत्न केला. यामध्ये शांताराम राणे हे गंभीर जखमी झाले असून त्यांना तात्काळ उपचारासाठी राजापूर येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. याप्रकरणाची फिर्याद रामचंद्र चंद्रकांत अर्डे (वय ३०) याने राजापूर पोलीस ठाण्यात दिली. या फिर्यादीनुसार बाळकृष्ण राणे यांच्यावर भारतीय न्याय संहिता अधिनियम २०२३ चे कलम १०९ प्रमाणे राजापूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. बाळकृष्ण आत्माराम राणे यांना ताब्यात घेण्यात आले आहे.

# आरक्षणासाठी धनगर समाज आक्रमक नेवासे फाट्यावर मेंढ्यांसह तासभर रास्ता रोको

### एसटी प्रवर्गातून आरक्षण देण्याची मागणी

**प्रतिनिधी**
■ **अहमदनगर**

धनगर समाजाला अनुसूचित जमाती प्रवर्गातून आरक्षण मिळावे, या मागणीसाठी शनिवारी दुपारी धनगर समाजाच्या वतीने मेंढ्यासह नेवासे फाटा येथे तासभर रास्ता रोको आंदोलन केले.

एसटी वर्गातून आरक्षण मिळावे, या मागणीसाठी चार दिवसांपासून उपोषण सुरू आहे. त्याची गांभीर्याने दखल घेतली जात नसल्याने शनिवारी दुपारी धनगर समाजाच्या वतीने नगर - संभाजीनगर महामार्गावरील नेवासे फाट्यावर त्रिमूर्ती शैक्षणिक संकुलाजवळ तासभर रास्ता रोको आंदोलन करण्यात आले. महसूल यंत्रणेकडून आंदोलकांचे निवेदन स्वीकारण्यात आल्यानंतर हे आंदोलन थांबवण्यात आले आहे.



रास्ता रोको थांबवण्यात आला असला तरी उपोषण मात्र सुरूच राहणार आहे.

धनगर समाजाला एसटी वर्गातून आरक्षण मिळावे, या मागणीसाठी नेवासे फाट्यावर या समाजाचे प्रमुख कार्यकर्ते उपोषणास बसले आहेत. यामध्ये छत्रपती संभाजीनगरचे प्रल्हाद सोरमारे, पाथर्डीचे राजू तागड, बाळासाहेब कोळसे, जालन्याचे रामराव कोल्हे, अंबडचे भगवान भोजने व जामखेडचे देविलाल मंडलीक यांचा समावेश आहे. शनिवार हा उपोषणाचा चौथा दिवस आहे. या उपोषणाची दखल घेतली जात नसल्याने शनिवारी धनगर समाजाच्या प्रमुख कार्यकर्त्यांनी रास्ता रोको आंदोलन केले. समाजाचे नेते अशोक कोळेकर यांचे यावेळी भाषण झाले. मंडळ अधिकारी सरिता मुंडे यांनी यावेळी निवेदन स्वीकारले.

पोलिस निरीक्षक धनंजय जाधव यावेळी उपस्थित होते. मेंढ्या व शेळ्यांसह आंदोलकांनी रास्ता रोको आंदोलन केले. त्यामुळे तासभर नगर-छत्रपती संभाजीनगर महामार्गावरील वाहतूक ठप्प झाली होती. त्यामुळे वाहनचालकांना रस्त्यावर अडकून पडावे लागले. या आंदोलनात जिल्ह्यातील धनगर समाजबांधव सहभागी होते.

# मारवाडी फाउंडेशनच्यावतीने आठवलेंचा भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुरस्काराने होणार सन्मान

### आज नागपूर येथे नितीन गडकरींच्या हस्ते होणार पुरस्कार वितरण

**प्रतिनिधी**
■ **नागपूर**



मारवाडी म्हणून ओळखल्या जाणा-या समाजाने केवळ भारतातच नव्हे तर संपूर्ण जगात कार्यकर्तुत्वाचा ठसा उमटविला आहे. ही गौरवगाथा सर्वसमावेशक, अधिकाधिक व्यापक, चैतन्यदायी व सामाजिक बांधीलकीच्या मार्गाने प्रेरणादायी बनविण्याचा प्रयत्न म्हणून महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याप्रती आदर व्यक्त करण्यासाठी त्यांच्या नावाने राष्ट्रीय पातळीवर विविध क्षेत्रात आपल्या अलौकिक कार्याचा ठसा उमटविणा-या व्यक्तीला तसेच त्यांच्या विचारांनी प्रेरित होऊन कार्य करणा-या मान्यवराला दरवर्षी मारवाडी फाऊंडेशनच्या वतीने 5 लाख रुपये रोख, शाल, श्रीफळ व स्मृतिचिन्ह देऊन त्याचा गौरव करीत असतो. यंदा सन 2024 चा भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुरस्कार केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री ना.रामदास आठवले यांना देऊन गौरविण्यात येणार आहे. हा पुरस्कार सोहळा रविवार 22 सप्टेंबर 2024 रोजी सकाळी 11 वाजता बॅनियन हॉल, चिटणवीस सेंटर सिव्हील लाईन्स, नागपुर येथे आयोजित करण्यात आला आहे. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या शुभहस्ते व माजी खासदार प्रदिप गांधी यांच्या अध्यक्षतेखाली पुरस्कार प्रदान करण्यात येईल. सभारंभाला नागरिकांनी मोठया संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन मारवाडी फाऊंडेशनच्या वतीने करण्यात आले आहे.

## पालकमंत्री राज्य मानांकन कॅरम स्पर्धेचे आयोजन

**कुडाळ :** सिंधुदुर्ग डिस्ट्रिक्ट कॅरम असोसिएशन व भारतीय जनता पार्टी क्रीडा आघाडी यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक २८ ते ३० सप्टेंबर २०२४ दरम्यान पालक मंत्री महाराष्ट्र राज्य मानांकन कॅरम स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. सिंधदुर्ग जिल्ह्याचे पालक मंत्री व राज्याचे सार्वजनिक बांधकाम विभाग मंत्री आदरणीय रविंद्र चव्हाण यांच्या पुढाकाराने पुरुष एकेरी व महिला एकेरी अशा दोन गटात हि स्पर्धा रंगणार आहे. विजेत्या खेळाडूंना तब्बल १ लाख १० हजारांची रोख पारितोषिके व चषक देऊन गौरविण्यात येणार आहे. स्पर्धेचे प्रवेश अर्ज महाराष्ट्र कॅरम असोसिएशनच्या www. maharashtracarromassociation.com संकेत स्थळावर उपलब्ध आहेत. स्पर्धेत नावे नोंदविण्याची अंतिम मुदत १९ सप्टेंबर २०२४ असून इच्छुक खेळाडूंनी स्पर्धेत नावे नोंदविण्यासाठी आपल्या जिल्हा संघटनेशी संपर्क साधावा. अधिक माहितीसाठी भ्रमणध्वनी ९९८७०४५४२९ येथे संपर्क साधावा.

### पंत - गिल जोडीपुढे 'बांग्ला शेर ढेर'

# चेन्नई कसोटीत बांग्लादेशपुढे विजयासाठी 515 धावांचे आव्हान

### रिषभ पंत, शुभमं गिलची धडाकेबाज शतके

वृत्तसंस्था
■ चेन्नई

भारतीय संघाने बांग्लादेशला ५१५ धावांचे आव्हान दिले आहे. भारताने पहिल्या डावात ३७६ धावा केल्या होत्या. या प्रत्युत्तरात बांगलादेशचा संघ पहिल्या डावात केवळ १४९ धावाच करु शकला. त्यामुळे भारताला २२७ धावांची आघाडी मिळाली होती. त्यानंतर भारताने ४ विकेट्स गमावत २८७ धावांवर दुसरा डाव घोषित केला. दुसऱ्या डावात ऋषभ पंत आणि शुभमन गिल यांच्या शतकाच्या जोरावर भारताला ५१५ धावांपर्यंत मजल मारता आली. त्यामुळे आता बांगलादेशला सामना जिंकण्यासाठी ५१५ धावांचे लक्ष्य असणार आहे. तिसऱ्या दिवसाचा खेळ संपला तेव्हा बांग्लादेश संघाने 4 बाद 158 धावा केल्या होत्या आणि त्यांना विजयासाठी 357 धावांची गरज होती.

दुसऱ्या डावात रोहित शर्मा ५ तर यशस्वी जैस्वाल १० धावा करून बाद झाला. विराट कोहली देखील मोठी खेळी करु शकला नाही. विराट कोहलीने दुसऱ्या डावात १७ धावा केल्या. यानंतर शुभमन गिल आणि ऋषभ पंत यांनी या डावाची जबाबदारी स्वीकारली. या दोघांमध्ये शतकी भागीदारी झाली. गिलने १७६ चेंडूंचा सामना करत नाबाद ११९ धावा केल्या. त्याने १० चौकार



आणि ४ षटकार मारले. त्याने अप्रतिम कामगिरी केली. त्याने १२८ चेंडूंचा सामना करत १०९ धावा केल्या. पंतच्या खेळीत १३ चौकार आणि ४ षटकारांचा समावेश होता. केएल राहुलने नाबाद २२ धावा केल्या. त्याने १९ चेंडूंचा सामना करत ४ चौकार मारले. ऋषभ पंत अन् शुभमन गिलने धू धू धुतले- बांगलादेशविरुद्धच्या कसोटी सामन्याच्या दुसऱ्या डावात १२४ चेंडूत ऋषभ पंतने आपले शतक पूर्ण केले. तर १२८ चेंडूत १०९ धावा करत ऋषभ पंतबाद झाला. ऋषभ पंतने शतक झळकवल्यानंतर त्याच्यासह संपूर्ण मैदान भावूक झाल्याचं दिसून आले. मैदानात उपस्थित असणाऱ्या प्रेक्षकांपासून रोहित शर्मा, विराट कोहली आणि ड्रेसिंग रुममधील सर्व खेळाडूंनी उभे राहत ऋषभ पंतचे कौतुक केले. ऋषभ पंतने या खेळीत १३ चौकार आणि ४ षटकार टोलावले. ऋषभ पंत शतक झळकवून बाद झाल्यानंतर शुभमन गिलने देखील शतक केले. शुभमन गिल सध्या १७६ चेंडूत नाबाद ११९ आहे. शुभमन गिलने या खेळीत १० चौकार आणि ४ षटकार लगावले. गिलने शतक झळकावत 'भारताचा बाबर' म्हणणाऱ्यांची बोलती केली बंद विशेष म्हणजे शुभमन गिल पहिल्या डावात शून्यावर बाद झाला होता, तेव्हा सोशल मीडियावर प्रचंड ट्रोल करण्यात आले होते. त्याला आठव्या षटकाच्या तिसऱ्या चेंडूवर हसन महमूदने गिलला लिटन दासकरवी झेलबाद केले होते. गिल कसोटीत शून्यावर बाद होण्याची ही पाचवी वेळ होत. ज्यामुळे चाहते या २५ वर्षीय फलंदाजाच्या खराब कामगिरीवर संतापले होते. सोशल मीडियावर काही चाहत्यांनी त्याला भारताचा बाबर आझम असेही म्हटले होते. पण आता शुबमन गिलने शतक झळकावून या टीकाकारांना चोख प्रत्युत्तर दिले आहे.

## अफगाणिस्तानचा भीमपराक्रम

# बलाढ्य द.आफ्रिकेला पराभूत करीत वन डे मालिकेत विजयी आघाडी

### गुरबाझ ,राशिद विजयाचे शिल्पकार

वृत्तसंस्था
■ शारजा



अफगाणिस्तान संघाने शारजा इथे झालेल्या दुसऱ्या वनडेत दक्षिण आफ्रिकेसारख्या बलाढ्य संघाला नमवत मालिका जिंकण्याचा पराक्रम केला. शतकवीर रहमनुल्ला गुरबाझ आणि वाढदिवसाच्या दिवशीच पाच विकेट्स पटकावणारा रशीद खान अफगाणिस्तानच्या विजयाचे शिल्पकार ठरले.

पहिल्या वनडेत अफगाणिस्तानने दक्षिण आफ्रिकेला १०६ धावांतच गुंडाळले आणि हे छोटेखानी लक्ष्य पार केले होते. दुसऱ्या वनडेत अफगाणिस्तानने ३११ धावांचा डोंगर उभारला. त्यानंतर दक्षिण आफ्रिकेचा डाव धावात गुंडाळत १७७ धावांनी दणदणीत विजय मिळवला. अफगाणिस्तानचा दक्षिण आफ्रिकेविरुद्धचा पहिलाच मालिका विजय आहे.

३१२ या प्रचंड लक्ष्याचा पाठलाग करताना तेंबा बावूमा आणि टोनी द झोरी यांनी ७३ धावांची चांगली सलामी दिली. ३८ धावा करून बावूमा बाद झाला. यानंतर अफगाणिस्तानच्या फिरकी आक्रमणासमोर आफ्रिकेच्या फलंदाजांनी गुडघे टेकले. रशीद खानने चाहत्यांना वाढदिवसाचं रिटर्न गिफ्ट देत ९ षटकात अवघ्या १९ धावांच्या मोबदल्यात ५ विकेट्स घेतल्या. नांगेलिया खारोटेने ४ विकेट्स घेत रशीदला तोलामोलाची साथ दिली. दक्षिण आफ्रिकेच्या सहा फलंदाजांना दुहेरी धावसंख्याही गाठता आली नाही. या विजयासह अफगाणिस्तानने तीन सामन्यांच्या मालिकेत २-० अशी आघाडी घेतली आहे. अफगाणिस्तानने आयर्लंड, झिम्बाब्वे, बांगलादेश, नेदरलँड्स, स्कॉटलंड या देशांविरुद्ध वनडे मालिका जिंकली आहे. मात्र दक्षिण आफ्रिकेसारख्या अव्वल संघाविरुद्ध वनडे मालिका जिंकत अफगाणिस्तानने मोठी झेप घेतली आहे. आठवडाभरापूर्वी अफगाणिस्तान आणि न्यूझीलंड यांच्यात नोएडा इथे टेस्ट आयोजित करण्यात आली होती. मात्र धुवाधार पावसामुळे एकही चेंडू न टाकता नाणेफेक न होताच ही टेस्ट रद्द करावी लागली. या निराशेतून बाहेर पडत अफगाणिस्तानने दमदार कामगिरी केली आहे.

### *गुरबाझची शतकी खेळी*

*नाणेफेक जिंकून अफगाणिस्तानने प्रथम फलंदाजीचा निर्णय घेतला. गुरबाझ आणि रियाझ हसन यांनी ८८ धावांची खणखणीत सलामी दिली. यानंतर गुरबाझला रहमत शाहची साथ लाभली. या जोडीने दुसऱ्या विकेटसाठी १०१ धावांची भागीदारी केली. १० चौकार आणि ३ षटकारांसह १०५ धावांची वेगवान खेळी करुन गुरबाझ तंबूत परतला. गुरबाझचं हे सातवं वनडे शतक आहे. ५० धावांची खेळी करुन रहमतही बाद झाला. यानंतर ओमरझाईने ५० चेंडूत ५ चौकार आणि ६ षटकारांसह नाबाद ८६ धावांची तडाखेबंद खेळी केली. गुरबाझ, रहमत आणि ओमरझाई यांच्या अफलातून खेळीच्या बळावर अफगाणिस्तानने ३११ धावांची मजल मारली. दक्षिण आफ्रिकेतर्फे लुंगी एन्गिडी, नांद्रे बर्गर, पीटर, एडन मारक्रम यांनी प्रत्येकी एक विकेट घेतली.*

# बीओबी बॅडमिन्टन स्पर्धेत स्वाती विजेती

प्रतिनिधी
■ मुंबई

बँक ऑफ बडोदा-मुंबई विभागीय बॅडमिन्टन निवड चाचणी स्पर्धेमध्ये स्वाती एस. हिने महिला एकेरीचे विजेतेपद पटकाविले. दादर-पश्चिम येथील बीएसएनएल बॅडमिन्टन कोर्टवरील महिलांच्या अंतिम सामन्यात स्वातीने १२-१२ अशा बरोबरी नंतर निर्णायक क्षणी अचूक फटके साधले आणि पूजा मोरेचे जोशपूर्ण आव्हान १५-१२ असे संपुष्टात आणून स्वातीने अजिंक्यपदावर शिक्कामोर्तब केला. परिणामी प्रारंभी आघाडी घेणाऱ्या पूजाला अंतिम उपविजेतेपदावर समाधान मानावे लागले. बँक ऑफ बडोदा क्रीडा विभागाचे प्रदीप सुरवसे व शिवछत्रपती पुरस्कार विजेते लीलाधर चव्हाण यांनी विजेत्या-उपविजेत्यांचे अभिनंदन केले.



बँक ऑफ बडोदा-मुंबई विभागतर्फे आयडियल स्पोर्ट्स अकॅडमी सहकार्याने झालेल्या महिला बॅडमिन्टन स्पर्धेची उपांत्य लढत देखील अटीतटीमध्ये रंगली. पहिल्या सलग ४ गुणासह डावाच्या मध्यापर्यंत ९-८ अशी आघाडी घेणाऱ्या गरिमा श्रीवास्तवला स्वाती एस. हिने अखेर २१-१३ असे चकवून अंतिम फेरी गाठली. दुसरी उपांत्य लढत जिंकताना पूजा मोरे हिने प्रियांका उपाध्यायचा २२-२० असा निसटता पराभव केला. स्पर्धेमधून महिला विभागात स्वाती एस., पूजा मोरे, गरिमा श्रीवास्तव, प्रियांका उपाध्याय आणि पुरुष विभागात ऋषिकेश शिंदे, हनमंत सुद्रिक, प्रमोद जयस्वाल, ऋग्वेद फराडे यांची मुंबई विभागीय संघात निवड करण्यात आली असून १७ व १८ ऑक्टोबर रोजी राजकोट येथे होणाऱ्या अखिल भारतीय बीओबी बॅडमिन्टन स्पर्धेमध्ये मुंबई विभागाचे प्रतिनिधित्व करणार आहेत.

प्रशिक्षक सचिन भारती यांच्या मार्गदर्शनाखाली पंचाचे कामकाज सिध्देश राऊत, आदित्य कीर, साहिल, चंद्रकांत करंगुटकर, ओमकार चव्हाण, अर्जुन कालेकर, श्रीधर नार्वेकर, अविनाश महाडिक आदींनी पाहिले.



*मुंबई : काँग्रेसचे नेते व लोकसभा विरोधी पक्ष नेते खासदार राहूल गांधी यांच्या बाबत आक्षेपार्ह वक्तव्य केल्याबद्दल आमदार संजय गायकवाड याच्या विरोधात भारतीय न्याय संहिता कलम ३५१(१)/ (२)/(३) व १९२ अन्वये एफआयआर दाखल करावा या मागणीसाठी दहिसर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक यांना काँग्रेस पक्षातर्फे निवेदन देण्यात आले. ॲड संदेश कोंडविलकर ,उपाध्यक्ष मुंबई काँग्रेस सदस्य (अ.भा.काँग्रेस कमिटी) यांचेसह मुंबई काँग्रेस सचिव सुभाष नहिरे, अनु.जाती विभाग जिल्हाध्यक्ष प्रमोद लोकरे, वरिष्ठ पदाधिकारी रियाझ खान, ऑस्कर रॉड्रिग्ज, अमर झा, अझीज शेख, उदयराम जोशी, सुरेंद्र मेहरा, ब्लॉक अध्यक्ष वैभव शाह, सन्नी चौधरी , लता कुळकर्णी , रामप्रवेश चौहान, मुनिराम तिवारी, अनिल यादव, झिनत शेख, अंजली बिलोर आदि पदाधिकारी उपस्थित होते.*

# अंधेरी मार्केटमध्ये फेरीवाला प्लाझा स्थलांतरित करण्याची आमदार अमित साटम यांची मागणी

प्रतिनिधी
■ मुंबई

अंधेरी (पश्चिम) येथील भाजप आमदार अमीत साटम यांनी पालिका आयुक्त भूषण गगराणी यांना पत्र लिहून गणपतराव आंब्रे गार्डन खाली प्रस्तावित फेरीवाला प्लाझा अंधेरी मार्केट येथे हलवण्याची मागणी केली आहे. यामुळे फेरीवाल्यांना त्यांच्या व्यवसायासाठी रहदारीचे प्रमुख ठिकाण मिळण्यास मदत होईल आणि अंधेरी स्टेशन परिसर पादचाऱ्यांसाठी अनुकूल होईल.

आ. साटम यांनी पत्रात म्हटले आहे की, अंधेरी (पश्चिम) येथील जेपी रोडवरील गणपतराव आंब्रे गार्डनच्या खाली भूमिगत फेरीवाला प्लाझा महापालिकेने प्रस्तावित केला आहे. "तथापि, विद्यमान अंधेरी मार्केट (दत्ताजी साळवी मंडई) खाली भूमिगत फेरीवाला प्लाझा तयार करणे अधिक उचित ठरेल. त्यामधून फेरीवाले तसेच रहिवाशांना उचित दिलासा मिळेल.

अंधेरी स्थानकासारख्या जास्त वर्दळीच्या भागातून फेरीवाल्यांना स्थलांतरित करून स्थानक परिसराला पादचाऱ्यांसाठी अनुकूल बनवण्याची बीएमसीची योजना आहे. "तथापि, आम्हाला प्राप्त झालेल्या सूचनानुसार फेरीवाल्यांना आंब्रे गार्डनच्या खाली स्थलांतरित केले तर अंधेरी स्टेशन परिसराप्रमाणे व्यवसाय त्यांना तिकडे मिळू शकणार नाही. फेरीवाल्यांसाठी व्यवसाय मिळणे महत्वाचे आहे. ते त्यांना आंब्रे गार्डनखाली स्थलांतरित करून मिळणार नाही. त्यामुळे फक्त स्थलांतरन करायचे आहे म्हणून करून काही उपयोग होणार नाही, असे साटम यांनी नमूद करून अंधेरी मार्केट हे एसव्ही रोड आणि अंधेरी स्टेशनपासून आंब्रे गार्डनपेक्षाही जवळ आहे. आंब्रे गार्डनच्या तुलनेत अंधेरी मार्केट येथे वर्दळ अधिक आहे. तसेच मार्केटला येणारे नियमित ग्राहक आणि स्टेशन आणि एसव्ही रोडच्या भागातून जाणाऱ्या नागरिकांनाही ते सोयीचे ठरेल, असे साटम म्हणाले. फेरीवाल्यांची उपजीविका ही त्यांच्या व्यवसायातून मिळणाऱ्या रोजच्या उत्पन्नावर अवलंबून असते. म्हणून, अंधेरी मार्केट हे सर्व घटकांचा विचार करता सर्वात योग्य ठिकाण आहे. ते केवळ फेरीवाल्यांना न्याय देणार नाही तर रेल्वे स्टेशन परिसराला पादचाऱ्यांसाठी अनुकूल बनवेल. यामध्ये दोन्ही घटकांना उंचीत न्याय मिळेल, असेही साटम यांनी म्हटले आहे.

# सफाई कर्मचाऱ्यावर प्राणघातक हल्ला

प्रतिनिधी
■ मुंबई

पूर्ववैमनस्यातून मोहम्मद सादिक रजा खान या ३२ वर्षांच्या सफाई कर्मचाऱ्यावर तीक्ष्ण हत्याराने प्राणघातक हल्ला झाल्याची घटना धारावीत घडली. जखमी झालेल्या मोहम्मद सादिकला सायन रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. याप्रकरणी हत्येच्या प्रयत्नाचा गुन्हा दाखल होताच दिलशाद सलीम शेख या २६ वर्षांच्या मुख्य आरोपीस धारावी पोलिसांनी अटक केली. तो सध्या पोलिस कोठडीत असल्याचे पोलिसांनी सांगितले.ही घटना रविवारी रात्री पावणेनऊ वाजता धारावीतील मच्छीगल्ली, ९० फिट रोडवर घडली. मोहम्मद सादिक हा सफाई कर्मचारी असून मुकुंदनगर, जे.एन.एम.ए. ८५/३, संजय चाळ कमिटीचा रहिवासी आहे.

काही दिवसांपूर्वी त्याच्यासह त्याच्या मित्राचा दिलशादसोबत क्षुल्लक कारणावरून वाद झाला होता. दिलशादने दोघांची माफी मागितली होती. त्यामुळे त्यांनी त्याच्याविरुद्ध पोलिसात तक्रार केली नव्हती; मात्र नंतर त्याच्या मित्राने त्याला त्याच्याविरुद्ध तक्रार करण्यास सांगितले होते. त्याचा दिलशादच्या मनात राग होता. याच रागातून त्याने मोहम्मद सादिकच्या मानेवर चाकूने वार केले होते. त्यात त्याच्या मानेला गंभीर दुखापत झाली होती. त्यामुळे त्याला तातडीने जवळच्या सायन रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. तिथे प्राथमिक उपचार केल्यानंतर त्याला सोडून देण्यात आले. याप्रकरणी मोहम्मद सादिकच्या तक्रारीवरून पोलिसांनी दिलशाद शेख याच्याविरुद्ध हत्येचा प्रयत्नाचा गुन्हा दाखल केला होता. गुन्हा दाखल होताच त्याला पोलिसांनी अटक केली.

# आज शिवसेना उत्तर पश्चिम लोकसभेतर्फे विनामूल्य आरोग्य शिबीराचे आयोजन

### व्हीलचेअर, नेक बेल्ट, वॉकर, गुढगा पट्टी, आधार काठी, औषधे यांचे मोफत वाटप

प्रतिनिधी
■ मुंबई

मुंबई उत्तर पश्चिम लोकसभा क्षेत्रातील जनतेचे आरोग्य सुदृढ रहावे, यासाठी मुंबई उत्तर पश्चिम लोकसभा क्षेत्राचे खासदार रविंद्र वायकर यांच्या मार्गदर्शना खाली शिवेसेना मुंबई उत्तर पश्चिम लोकसभा तसेच मुंबई महानगरपालिका यांच्या सहायाने आज रविवारी २२ सप्टेंबर २०२४ रोजी इच्छापूर्ती गणेश मंदिर परिसर, श्याम नगर, जोगेश्वरी विक्रोळी लिंक रोड, जोगेश्वरी (पूर्व) येथे विनामुल्य महा आरोग्य शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे.

या शिबिरात विविध रोगांवर डॉक्टरांचे मार्गदर्शन, उपचार तर मिळातातच तसेच विनामुल्य औषधे देण्याचा प्रयत्न सातत्याने करण्यात येत आहे. या शिबिरात लोकसभा क्षेत्रातील दिव्यांग बांधवाना आवश्यक्यतेनुसार व्हीलचेअर, नेक बेल्ट, वॉकर, गुडघापट्टी, आधार काठी, मोफत औषधे यांचे वाटप करण्यात येणार आहे. शिबिरात अस्थी रोग, बाल रोग, स्त्री रोग, दंत रोग, नाक-कान-घसा, मधुमेह, रक्त तपासणी, डोळे तपासणी, हाडांची ठीसुळता, त्वचा रोग, सर्वसाधारण रोग आदींची तपासणी तज्ञ डॉक्टरांकडून करण्यात येणार आहे. यात आयुर्वेदिक व होमीयोपथीक उपचार पद्धतीचा ही शिबिरात समावेश करण्यात आला आहे. या शिबिरात मुंबई महानगर पालिकीची विविध रुग्णालये , खासगी रुग्णालयातील डॉक्टर, रोटरी क्लब, सेवाभावी संस्था सहभागी होणार आहेत. शिबिराचा लाभ मुंबई उत्तर पश्चिम लोकसभा क्षेत्रातील जास्तीत जास्त नागरीकांनी घ्यावा, असे आवाहन मुंबई उत्तर पश्चिम लोकसभा क्षेत्रातील शिवसेनेच्यावतीने करण्यात आले आहे.

# राष्ट्रीय मिल मजदूर संघाच्या अर्जावर उच्च न्यायालयाचा एनटीसी मिल कामगारांना थकीत पगार देण्याचा आदेश!

प्रतिनिधी
■ मुंबई

करोना महामारीच्या पार्श्वभूमीवर लॉकडाऊनच्या काळातील मुंबई मधील बंद एनटीसी मिलच्या कामगारांना २० में २०२० पासून आज पावेतो थकीत ५० टक्के पगार देण्यात यावा.असा आदेश मुंबई उच्च न्यायालयाचे न्या. माधव जे.जामदार यांनी राष्ट्रीय मिल मजदूर संघा च्या अर्जावर दिला आहे.

राष्ट्रीय मिल मजदूर संघाने मुंबईतील एन. टी.सी.च्या बंद गिरण्या त्वरित पूर्ववत चालू करण्यात याव्यात,असा दावा दाखल केला होता. त्यावर ४ सप्टेंबर रोजी सुनावणी करताना त्यालाच अनुसरून न्या.माधव जे.जामदार यांनी कामगारांचा थकीत वेतनाच्या ५० टक्के पगार द्यावा, असा आदेश दिला आहे. आदेशात असेंही म्हटले आहे,निकाल लागल्याच्या तारखे(दि.४)पासून चार आठवड्याच्या आत ही देणी एनटीसी व्यवस्थापनाने द्यावीत. राष्ट्रीय मिल मजदूर संघाच्या वतीने ॲड.पी.एम. पळशीकर यांनी बाजू मांडली.संघटनेचे अध्यक्ष आमदार सचिनभाऊ अहिर, सरचिटणीस गोविंदराव मोहिते यांनी या आदेशाचे स्वागत केले आहे.संबंधित संघाचे खजिनदार निवृत्ती देसाई, उपाध्यक्ष रघुनाथ आण्णा शिर्सेकर,सुनिल बोरकर,एस.ई.सोनी यांनी सदर दाव्या संदर्भात माहिती पुरवली.या आदेशावर कामगार वर्गाने समाधान व्यक्त केले आहे.

# एशियाटिक लायब्ररीमधील कर्मचाऱ्यांनी केल्या आर्थिक मागण्या

प्रतिनिधी
■ मुंबई

मुंबईची एशियाटिक सोसायटी आणि त्याची लायब्ररी 26 नोव्हेंबर 1804 रोजी मुंबईचे मुख्य न्यायाधीश आणि रेकॉर्डर सर जेम्स मॅकिंटॉश यांनी स्थापन केली. सोसायटी 1833 पासून टाऊन हॉलमध्ये आहे, जी आता ग्रेड वन हेरिटेज स्ट्रक्चर म्हणून ओळखली जाते. या लायब्ररीत २,८०,००० पुस्तके आणि नियतकालिक: आणि नियतकालिकांचे बंधन खंड आहेत. तसेच 2847 हस्तलिखिते आणि 293 छापील पोथ्या, 1300 नकाशे आणि 12000 हून अधिक नाण्यांची काळजी २५ कर्मचारी व ३ कंत्राटी कामगार घेत आहेत. पण या कामगारांच्या




आर्थिक मागण्यांकडे मात्र व्यवस्थापन समितीकडून दुर्लक्ष होत असल्याचे A.I.T.U.C. शी संलग्न असलेल्या युनियनचे कॉ प्रकाश रेड्डी यांनी काल एका पत्रकार परिषदेत सांगितले.

: कर्मचारी संघटनेच्या इतर प्रलंबित मागण्या पुढीलप्रमाणे आहेत. जुलै 2019 ते जून 2023 पर्यंत अधिक 4 महिने D.A. प्रलंबित आहे आणि D.A. स्टेटमेसिलेशन प्रदान केलेले नाही., ७ व्या पगाराच्या 35% आजपर्यंत दिलेले नाहीत. (म्हणजे वेतन 35% जून 2021 ते डिसेंबर 2021).9% D.A. जानेवारी 2024 पासून पगारामध्ये सर्वात जास्त अंमलबजावणी केली जाते. सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना ग्रॅच्युइटीची गणना कोणत्या आधारावर केली जाते, हे कर्मचाऱ्यांना कळवले जात नाही.5. दीर्घकाळ प्रलंबित असलेल्या कर्मचाऱ्यांच्या वेतनश्रेणीतील विसंगतींच्या प्रलंबित प्रकरणांचा निपटारा. 7व्या वेतन आयोगाची वेतनश्रेणी, भत्ते, लाभ, w.e.f.ची अंमलबजावणी 01.01.2016 पासून करण्यात यावी . प्रत्येक कर्मचाऱ्याचे सेवापुस्तक सांभाळून ठेवण्याची विनंती. एशियाटिक सोसायटी, कोलकाता च्या धर्तीवर ASM ला "इन्स्टिट्यूशन ऑफ नॅशनल इम्पॉर्टन्स" दर्जा देण्यासाठी गव्हर्नर लॅटिनला विनंती करा. पुनरावलोकन समितीने शिफारस केल्यानुसार सर्गस अनुदान जारी करण्यासाठी सरकार, सांस्कृतिक मंत्रालय आणि महाराष्ट्र सरकार यांना विनंती करा.ग्रंथपाल आणि उप विभागाच्या उच्च रिक्त पदांवर भरती/रिक्त पदांची भरती. ग्रंथपाल, लेखाधिकारी ज्यु. क्लार्क यांची भरती करण्यात यावी. अशा मागण्या करण्यात आल्या आहेत.

# परिस्थितीवर मात करायची असेल तर पुस्तकाला गुरु माना - उत्तम तरकसे

प्रतिनिधी
■ मुंबई

"पुस्तकासारखा जगात सर्वात मोठा गुरु कोणी नाही..! सर्व प्रथम विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी पुस्तकाला गुरुस्थानी मानले आगदी तथागत भगवंत गौतम बुद्ध, संत कबीर, महात्मा ज्योतिराव फुले इत्यादींनी पुस्तकांचे वाचन केले त्यातुन त्यांनी खरा इतिहास जानुन घेतला. म्हणून आज सारे विश्व महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना" सिंबालऑफ नॉलेज" म्हणून ओळखतो, साऱ्या जगात थोर कायदेपंडित म्हणून त्यांचे नाव आहे.



आणि आजच्या युवकांनी पुस्तक हेच माझा खरा मित्र आहे हे जे मानतील ते जगावर आपले वर्चस्व सिद्ध करतील असे प्रतिपादन प्रसिद्ध कवी - साहित्यिक उत्तम तरकसे यांनी केले.

कोकण मराठी साहित्य परिषद शाखा पनवेल यांच्या वतीने तीन पुस्तकांचा प्रकाशन सोहळा प्लॉट नंबर २९ से.०२ पनवेल येथील कर्नाटक संघच्या सभागृहात आयोजित करण्यात आला होता. सदर कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून मा. ऐ के शेख (जेष्ठ गजलकार) मा. सुधीर शेठ (अध्यक्ष रायगड जिल्हा कोमसाप) ॲाड सुनिता जोशी (ज्येष्ठ साहित्यिका) प्रमोद कर्नड (ज्येष्ठ साहित्यिक) जगदीश संसारे (रेडिओ जॉकी) रोहिदास पोटे (अध्यक्ष कोमसाप पनवेल) मा प्रा डॉक्टर सूर्यकांत परकाळे (सिकेटी कॉलेज खांदेश्वर) असे प्रमुख अतिथी यांच्या हस्ते दोन काव्यसंग्रह व एक कथासंग्रह असे एकूण तीन पुस्तकांचे प्रकाशन सोहळा मोठ्या दिमाखात झाले.

तीन पुस्तकांचे लेखक कवी सुभाष कुडके, शिवाजी मोठे , नागनाथ डोलारे, यांच्या हस्ते तरकसे यांचा सन्मान करण्यात आला.

# आज हार्बर व मध्य रेल्वेवर मेगाब्लॉक

■ मुंबई

मध्य रेल्वे, मुंबई विभागात रविवारी ठाणे आणि कल्याण स्थानकांदरम्यान अप आणि डाऊन धीम्या मार्गावर सकाळी ११.०० ते दुपारी ४.०० वाजेपर्यंत मेगाब्लॉक घेण्यात येणार आहे. त्यामुळे मुलुंड येथून सकाळी १०.४३ ते दुपारी ३.४४ पर्यंत सुटणाऱ्या डाऊन धीमी/सेमी फास्ट सेवा मुलुंड आणि कल्याण स्थानकांदरम्यान ठाणे, कळवा, मुंब्रा, दिवा आणि डोंबिवली स्थानकांदरम्यान डाऊन जलद मार्गावर वळवण्यात येतील आणि नियोजित वेळेपेक्षा १० मिनिटे उशिराने पोहोचतील कल्याण येथून सकाळी १०.३६ ते दुपारी ३.५१ पर्यंत सुटणाऱ्या अप धीमी/सेमी जलद सेवा कल्याण आणि मुलुंड स्थानकांदरम्यान अप जलद मार्गावर वळवण्यात येतील, डोंबिवली, दिवा, मुंब्रा, कळवा आणि ठाणे स्थानकावर थांबतील आणि पुढे अप धीम्या मार्गावर पुन्हा वळवण्यात येतील. मुलुंड स्थानकावर आणि नियोजित वेळेच्या १० मिनिटे उशिराने पोहोचेल.ठाणे लोकलही डाऊन धीम्या मार्गावर चालतील.

छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस मुंबई येथून सकाळी ११.०० ते संध्याकाळी ५.०० दरम्यान सुटणाऱ्या/पोहोचणाऱ्या सर्व अप आणि डाऊन धीम्या सेवा वेळापत्रकापेक्षा १० मिनिटे उशिरा पोहोचतील/सुटतील. हार्बरवर ही मेगाब्लॉक कुर्ला आणि वाशी स्थानकांदरम्यान अप आणि डाऊन हार्बर मार्गावर सकाळी ११.१० ते सायंकाळी ४.१० पर्यंत मेगाब्लॉक असणार आहे. त्यामुळे छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस मुंबई येथून सकाळी १०.३४ ते दुपारी ३.३६ पर्यंत पनवेल/बेलापूर/वाशीसाठी सुटणाऱ्या डाऊन हार्बर मार्गावरील सेवा आणि पनवेल/बेलापूर/ वाशी येथून सकाळी १०.१६ ते दुपारी ३.४७ वाजेपर्यंत छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस मुंबई करीता सुटणाऱ्या अप हार्बर मार्गावरील सेवा रद्द राहतील. ब्लॉक कालावधीत छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस मुंबई- कुर्ला आणि पनवेल- वाशी या भागांवर विशेष उपनगरीय गाड्या चालविण्यात येतील. तसेच ब्लॉक कालावधीत हार्बर मार्गावरील प्रवाशांना ठाणे-वाशी/नेरुळ स्थानकांदरम्यान सकाळी १०.०० ते संध्याकाळी ६.०० वाजेपर्यंत प्रवास करण्याची परवानगी देण्यात आली आहे.

## एअर मार्शल अमर प्रीत सिंग हवाई दलाचे नवे प्रमुख

**नवी दिल्ली :** एअर मार्शल अमर प्रीत सिंग हे भारतीय हवाई दलाचे नवे प्रमुख असतील. ते 30 सप्टेंबर रोजी पदभार स्वीकारतील. अमर प्रीत सिंग हे एअर मार्शल विवेक राम चौधरी यांची जागा घेतील, जे 30 सप्टेंबर रोजी निवृत्त होत आहेत. अमर प्रीत सिंग आतापर्यंत हवाई दलाचे उपप्रमुख पदावर होते. त्यांना रोटरी विंग एअरक्राफ्टवर ५ हजार तासांहून अधिक उड्डाणाचा अनुभव आहे. उपप्रमुख होण्यापूर्वी त्यांनी ऑपरेशनल फायटर स्क्वॉड्रन्स आणि फ्रंटलाइन एअर बेस्सचे नेतृत्वही केले आहे. 40 वर्षे हवाई दलात पोस्ट एअर मार्शल अमरप्रीत सिंग यांचा जन्म 27 ऑक्टोबर 1964 रोजी झाला. अमर प्रीत सिंग हे 21 डिसेंबर 1984 रोजी एअर फोर्स अकादमी डुंडीगल येथून भारतीय हवाई दलात नियुक्त झाले होते. ते 40 वर्षांपासून हवाई दलात सेवा करत आहेत. एअर मार्शल अमर प्रीत सिंग यांनी नॅशनल डिफेन्स अकादमी खडकवासला आणि एअर फोर्स अकादमी डिंडीगल येथून प्रशिक्षण घेतले आहे.



# धारावीत मोठ्या उत्साहात डीपीएल 1.2 ची सुरुवात
# विजेत्या संघाला 1 लाख रुपयांचे पारितोषिक

## धारावीकर पहिल्यांदाच अनुभवणार टर्फ क्रिकेटचा थरार

**प्रतिनिधी**
**मुंबई**

धारावीतील क्रिकेटपटूंना हक्काचे व्यासपीठ उपलब्ध करून देणाऱ्या 'धारावी प्रीमियर लीग' (डीपीएल) च्या दुसऱ्या हंगामाची सुरुवात शुक्रवारी सकाळी मोठ्या उत्साहात झाली. यावेळी मोठ्या संख्येने स्थानिक खेळाडू आणि क्रिकेटप्रेमी उपस्थित होते. 'धारावी रिडेव्हलपमेंट प्रोजेक्ट प्रायव्हेट लिमिटेड (डीआरपीपीएल) च्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या या लीगमध्ये धारावीतील स्थानिक खेळाडूंचे एकूण 14 संघ सामील होणार असून, धारावीतील 'डिस्ट्रिक्ट स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स'च्या मैदानावर हे सामने खेळवले जाणार आहेत. या लीगच्या माध्यमातून धारावीतील खेळाडूंना पहिल्यांदाच टर्फ क्रिकेटचा थरार अनुभवता येणार आहे. 'अपना टाईम आ गया' या ब्रीदवाक्यसह धारावीतील तरुणाईने या तीन दिवसीय लीगचा मनमुराद आनंद लुटला असून या लीगची सांगता उद्या रविवारी होणार आहे.

*डीआरपीपीएल विषयी: धारावी रीडेव्हलपमेंट प्रोजेक्ट प्रायव्हेट लिमिटेड हा उपक्रम महाराष्ट्र राज्य शासन आणि अडाणी समूह यांच्या भागीदारीतून संयुक्त उपक्रम असून त्याला राज्य सरकारच्या विशेष प्रकल्पाचा दर्जा देण्यात आ ला आहे. धारावीकरांचे अद्ययावत घरांचे स्वप्न पूर्ण करतानाच त्यांच्या राहणीमानाचा दर्जा वाढवण्यासा ठी डीआरपीपीएलच्या माध्यमातून प्रयत्न सुरू आहेत. दळणवळणाची अत्याधुनिक साधने, अखंडित वी ज- पाणीपुरवठा, प्रदूषणमुक्त आणि स्वच्छ परिसर यांसह जागतिक दर्जाच्या पायाभूत सुविधा धारावीक रांना या प्रकल्पातून दिल्या जाणार आहेत.*



"आंतरराष्ट्रीय टी-20 क्रिकेटच्या धर्तीवर खेळवल्या जाणाऱ्या डीपीएलचा पहिला हंगाम स्थानिक खेळाडू आणि क्रिकेट रसिकांच्या उदंड प्रतिसादात यावर्षीच्या मे महिन्यात पार पडला होता. यावेळी धारावीच्या सेक्टर 1 मधील सुमारे 200 खेळाडूंनी आपला सहभाग नोंदवला होता. यानंतर स्थानिक खेळाडूंच्या मागणीनुसार सेक्टर 2 मध्ये डीपीएल 1.2 चे आयोजन करण्यात आले आहे" असे डीआरपीपीएलच्या प्रवक्त्याने स्पष्ट केले.

मिनी इंडिया अशी ओळख असलेल्या धारावीमध्ये गल्लीबोळात क्रिकेटचा डाव रंगलेला दिसतो. हाच क्रिकेट प्रेमाचा धागा पकडून स्थानिक तरुणांच्या मदतीने डीआरपीपीएलच्या वतीने 'डीपीएल टी-10' क्रिकेट लीगचा जन्म झाला. धारावीतील विविध सेक्टरमध्ये एकूण 6 टप्प्यांत या लीगचे आयोजन करण्यात येणार आहे. डीपीएल 1.2 मध्ये सेक्टर 2 मधील कुंभारवाडा, सोशल नगर, राजीव गांधी नगर, जीवनज्योत रहिवासी संघ, महात्मा गांधी नगर, मुस्लिम नगर या परिसरातील क्रिकेट संघ सहभागी झाले असून या संघाना आयोजकांच्या वतीने विशेष जर्सी देखील वितरित करण्यात आल्या आहेत. आंतरराष्ट्रीय टी-20 च्या नियमावलीनुसार खेळवल्या जाणाऱ्या या लीगच्या माध्यमातून, दर्जेदार खेळपट्टी, थर्ड अंपायर, ॲक्शन रीप्ले, धावते समालोचन यांसारख्या अद्ययावत क्रीडा सुविधांचा लाभ पहिल्यांदाच धारावीतील क्रिकेटपटूंना घेता येणार आहे. या सर्व सामान्यांचे थेट प्रक्षेपण सोशल मीडिया आणि स्थानिक केबल नेटवर्कवर केले जाणार असून मधल्या वेळात मिमिक्री आणि मनोरंजनाच्या इतर कार्यक्रमांचा लाभ क्रिकेट रसिकांना घेता येणार आहे.

या लीग मध्ये धारावीतील कुंभारवाडा बॉइज, धारावी मास्टर ब्लास्टर, धारावी थालायवा, क्रिकेट फायटर्स, अँग्री बॉईज, थंडर इलेव्हन वॉरियर्स यांसारखे एकूण 14 संघ सहभागी होणार आहेत.

डीपीएल 1.2 मध्ये सामील होणाऱ्या 14 संघांमध्ये शुक्रवारी साखळी सामने खेळवले जाणार आहेत. यातील विजेत्या संघाचे पुढील सामने शनिवारी खेळवले जाणार असून अंतिम विजेत्या संघाला आकर्षक चषक आणि 1 लाख रुपयांचा धनादेश तर उपविजेत्या संघाला आकर्षक चषकासह 50 हजार रुपयांचा धनादेश दिला जाणार आहे.

**"डीपीएलच्या पहिल्या सीजनचे सामने हे केवळ सेक्टर 1 मधील खेळाडूंसाठी असल्याने आम्हाला यामध्ये सहभागी होता आले नव्हते. आपल्यालाही अशा प्रकारच्या दर्जेदार लीगमध्ये सहभागी होऊन आपले क्रीडा नैपुण्य दाखवण्याची संधी मिळावी, हे माझे आणि माझ्या मित्रांचे स्वप्न होते. डीपीएल 1.2 च्या निमित्ताने हे स्वप्न पूर्ण झाले असून यासाठी मी व्यक्तिशः आयोजकांचे आभार मानतो. या लीगने आमच्यासारख्या स्थानिक खेळाडूंना एक उत्तम व्यासपीठ उपलब्ध करून दिले असून आमच्यासाठी हा आयुष्यभरातील सगळ्यात मोठा आनंदाचा क्षण म्हणता येईल"**

**- अंकितदीप सरोज,**
**कॅप्टन (थंडर इलेव्हन वॉरियर्स)**

# भाजप माझ्या नावाने खोटं पसरवत आहे

## राहुल गांधी यांचा आरोप

**वृत्तसंस्था**
**नवी दिल्ली**



राहुल गांधी यांनी अमेरिकेत शीख समुदायाबद्दल विधान केले होते. हे विधान वादग्रस्त असल्याचा दावा भाजपने केला होता. त्यामुळे भाजप नेत्यांनी अनेक राज्यात राहुल गांधी यांच्याविरोधात अनेक ठिकाणी तक्रारी दाखल केल्या आहेत. यावर आता राहुल गांधी यांनी अमेरिकेतल्या त्या विधानाचा व्हिडीओ एक्सवर पोस्ट केला आहे. तसेच या विधानाचे स्पष्टीकरणही दिले आहे.

एक्सच्या पोस्टमध्ये राहुल गांधी यांनी म्हटले आहे की, मी अमेरिकेत केलेल्या विधानाबाबत भाजप खोटं पसरवत आहेत. हिंदुस्थान आणि परदेशात राहणाऱ्या प्रत्येक शीख बंधु भगिनींना विचारतो की मी जे काही बोललो त्यात काय चुकीचं होतं? आपल्याला असा हिंदुस्थान नकोय का जिथे प्रत्येक शीख व्यक्ती कुणालाही न घाबरता आपल्या धर्माचे पालन करता येईल?

तसेच राहुल गांधी म्हणाले की भाजप नेहमी प्रमाणे खोटं बोलत आहेत. मला गप्प करण्यासाठी भाजप अधीर आहे, त्यांना खरं बोललेलं चालत नाही. पण ज्या मुल्यांमुळे हिंदुस्थानाची परिभाषा ठरते त्या मुल्यांसाठी मी लढणार, विविधेत एकता आहे, समानता आणि प्रेम आहे असेही राहुल गांधी म्हणाले.

# जम्मू-काश्मीरला पुन्हा राज्याचा दर्जा देऊ

**वृत्तसंस्था**
**श्रीनगर**



काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी शनिवारी जम्मूमध्ये पत्रकार परिषदेत सांगितले की, जम्मू-काश्मीरला राज्याचा दर्जा परत आणणे ही काँग्रेसची प्राथमिकता आहे. ते म्हणाले की, राज्याला यापूर्वी कधीही केंद्रशासित प्रदेश बनवण्यात आले नव्हते.

ते पुढे म्हणाले की, आम्ही पंतप्रधान मोदी आणि भाजपला विचारू इच्छितो की, तुमच्याकडे पूर्ण सत्ता असताना तुम्ही आतापर्यंत जम्मू-काश्मीरला पूर्ण राज्याचा दर्जा का दिला नाही? जम्मू-काश्मीरसाठी काँग्रेसच्या जाहीरनाम्याचा संदर्भ देत खरगे म्हणाले की, आम्ही राज्यासाठी सात आश्वासने दिली आहेत. आमचे पहिले वचन आहे की जम्मू आणि काश्मीरला पूर्ण राज्याचा दर्जा बहाल केला जाईल.

भाजपने 5 लाख नोकऱ्यांचे आश्वासन दिले होते, पण ते पूर्ण केले नाही गृहमंत्री अमित शहा प्रचारादरम्यान मोठ वक्तव्य करतात, पण नंतर ते म्हणतात की ही निवडणूक घोषणांची होती. भाजप 5 लाख नोकऱ्या देणार असल्याचे सांगत आहे. येथे 35% बेरोजगारी आहे आणि 65% सरकारी पदे येथे रिक्त आहेत. भाजपकडे बराच वेळ होता, त्यांच्या एलजीकडेही सत्ता होती, पण त्यांनी रिक्त पदे भरली नाहीत. आम्ही सत्तेत आलो तर 1 लाख रिक्त नोकऱ्या तातडीने भरू.

काँग्रेसने जनतेसाठी काम केले, मोदींनी टोमणे मारले नरेंद्र मोदी आणि अमित शहा नेहमी घोषणा देतात आणि त्यांच्याकडे मते मागतात. आम्ही मनरेगा योजना सुरू केली, देशातील शेतकऱ्यांचे कर्ज माफ केले, जनतेसाठी अन्न सुरक्षा कायदा आणला, चांगल्या शिक्षणाच्या संधी निर्माण केल्या, गरिबांच्या उत्थानासाठी काम केले.

भाजपने मोफत अन्नधान्य 11 किलोवरून 5 किलो केले यापूर्वी जम्मू-काश्मीरमधील लोकांना 11 किलो धान्य मिळायचे, भाजपने ते कमी करून 5 किलो केले. काँग्रेस सरकारमध्ये येताच पुन्हा 11 किलो रेशन देण्यास सुरुवात करणार आहे. वीजपुरवठा खंडित होणारा त्रास दूर करू, तरुणांच्या समस्याही दूर करू आणि 'दरबार मूव्ह' पुन्हा सुरू करू. आम्ही जम्मू-काश्मीरमधील पर्यटन सुधारू जेणेकरून लोकांचे जीवन चांगले होईल.

तिरुपती मंदिर प्रकरणातील दोषींवर कारवाई करावी तिरुपती बालाजी मंदिराशी संबंधित ज्या काही गोष्टी समोर आल्या आहेत, त्या कोणाच्याही भल्याच्या नाहीत. अशा प्रकारची फसवणूक चांगली गोष्ट नाही. हे देखील भक्तांसाठी चांगले नाही, कारण लोक मोठ्या भक्तिभावाने मंदिरात जातात. या प्रकरणातील दोषींवर कारवाई करण्यात यावी.

# गुजरातेतही ट्रेन रुळावरून घसरवण्याचा कट, ट्रॅकवरून फिशप्लेट-की काढल्या

**वृत्तसंस्था**
**अहमदाबाद**

गुजरातच्या सुरतमधील किम रेल्वे स्थानकाजवळ शुक्रवारी रात्री रेल्वे ट्रॅकला छेडछाड करण्यात आली. काही अनोळखी लोकांनी अप लाईनच्या ट्रॅकवरून फिश प्लेट आणि चाव्या काढून घेतल्या होत्या. त्या त्याच ट्रॅकवर ठेवण्यात आल्या होते. याशिवाय रेल्वे रुळांना जोडणारे 71 कुलूपही काढण्यात आले.

स्थानिक लोकांकडून या प्रकरणाची माहिती मिळताच अप स्टेशन अधीक्षकांनी कीमन सुभाष कुमार यांना अलर्ट केले. ट्रॅकची तपासणी केली असता रेल्वे रुळावरून घसरण्याचा कट कोणीतरी रचल्याचे आढळून आले. त्यानंतर हा मार्ग बंद करण्यात आला. मात्र, नवीन फिश प्लेट बसवल्यानंतर रेल्वेसेवा पुन्हा सुरू झाली. ही घटना रामपूर तालुक्यापासून 43 किमी अंतरावर असलेल्या रुद्रपूर सिटी रेल्वे स्थानकाजवळ घडल्याचे रेल्वे अधिकाऱ्यांनी सांगितले. रुद्रपूर शहर विभागाचे रेल्वे अभियंता राजेंद्र कुमार यांच्या फिर्यादीवरून अज्ञातांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सातत्याने घडणाऱ्या अशा घटनांमुळे रेल्वे कर्मचारी तसेच जीआरपी, आरपीएफ आणि स्थानिक पोलीस सतर्क झाले आहेत. सुरत ग्रामीणचे पोलीस अधीक्षक हितेश जोयसर यांनी सांगितले की, एटीएस आणि एनआयएचे पथक तपास करत आहेत.

या संपूर्ण प्रकरणाची चौकशी विशेष ऑपरेशन गट करणार आहे. अज्ञातांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. काही लोकांकडून रेल्वे वाहतूक विस्कळीत करण्याचा प्रयत्न केला जात आहे. मात्र, 30 मिनिटांत रेल्वे अधिकाऱ्यांनी दुरुस्तीचे काम पूर्ण केल्याने रेल्वे सेवा पूर्ववत झाली.

## बॅ. राजाभाऊ खोब्रागडे यांची जन्मशताब्दी

# रिपब्लिकन पक्ष मजबूत करण्याचा संकल्प करु या

**रिपब्लिकन पक्षाचे संस्थापक सरचिटणीस, राज्यसभेचे माजी उपसभापती दिवंगत नेते बॅरिस्टर राजाभाऊ खोब्रागडे यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त पुन्हा एकदा रिपब्लिकन पक्ष मजबूत करण्यासाठी सर्वांनी एकत्र येऊन प्रयत्न केले पाहिजेत. त्याकरिता त्यांच्या कर्तृत्वाची माहिती नवीन पिढीला करून देण्यासाठी त्यांच्या कर्तृत्ववान कारकिर्दीचा आढावा घेणे आवश्यक आहे**

**भाऊ निरभवणे**
**महाराष्ट्र प्रदेश रिपब्लिकन पक्ष (खोरिपा) अध्यक्ष**

**चंद्रपूर** जिल्ह्यातील आंबेडकरी समाजातील गर्भश्रीमंत कुटुंबात भाऊराव यांचा जन्म २५ सप्टेंबर १९२५ रोजी झाला त्यांची आजी पैकाबाई यांनी १३ व्या दिवशी सोन्याच्या टोपलीत त्यांना नाचवत घरी घेऊन आल्या असा इतिहास सांगितला जातो. आजी पैकाबाई ह्या जंगलाच्या ठेकेदार म्हणून व्यवसाय करत होत्या त्यांची तीनही मुले त्यांच्या बरोबर व्यवसाय करत होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भाऊराव यांचे वडील देवाजीबापू खोब्रागडे यांची भेट घेऊन त्यांना चळवळीला आर्थिक मदत करण्याचे व चळवळीत सक्रिय सहभाग घेण्याचे आवाहन केले होते त्यानंतर श्रीमंत देवाजीबापू खोब्रागडे यांनी चळवळीला मदत केली तसेच चळवळीत सक्रिय सहभाग घेतला. विदर्भ म्हणजे त्यावेळी मध्य प्रांतातून पुढे ते पहिल्या सार्वत्रिक निवडणुकीत चांदा म्हणजे चंद्रपूर मधून आमदार म्हणून निवडून आले त्याचवेळी बाबू हरदास हे सुद्धा नागपूर मधून आमदार म्हणून निवडून आले होते. कुटुंबातील ह्या वातावरणात भाऊराव मोठे झाले होते विद्यार्थी दशेत असताना त्यांनी शेड्युल कास्ट फेडरेशनच्या विद्यार्थी संघटनेचे चंद्रपूर जिल्ह्यातील महत्त्वाचे पद सांभाळले होते. त्यावेळी प पू डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या चंद्रपूर जिल्ह्यातील दौऱ्यात त्यांचे विद्यार्थी फेडरेशनच्या वतीने स्वागत करण्यात आले होते त्यात भाऊराव यांचा सहभाग होता पुढे प पू डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी शासकीय खर्चाने अस्पृश्य समाजातील विद्यार्थ्यांना परदेशी शिक्षणासाठी पाठवले होते त्या यादीत भाऊराव खोब्रागडे यांचे नाव होते. प पू डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी भाऊराव यांचे वडील देवाजीबापू खोब्रागडे यांना सांगितले की, तुम्ही तुमच्या मुलाला तुमच्या खर्चाने परदेशी शिक्षणासाठी पाठवा म्हणजे मला समाजातील आणखी एक गरीब विद्यार्थी परदेशी शिक्षणासाठी पाठवता येईल. देवाजी बापू खोब्रागडे यांनी तात्काळ प पू डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या आदेशानुसार त्यांचा मुलगा भाऊराव यांना स्वखर्चाने परदेशी शिक्षणासाठी पाठवले. प पू डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी शासकीय खर्चाने परदेशी शिक्षणासाठी पाठवलेल्या किती विद्यार्थ्यांची नावे समाजाला माहिती आहेत त्यापैकी किती विद्यार्थ्यांनी आंबेडकरी चळवळीत सक्रिय सहभाग घेतला याची माहिती मिळत नाही मात्र भाऊराव बॅरिस्टर होऊन २६ जानेवारी १९५० रोजी मुंबई बंदरात बोटीने आले तो दिवस देशाचा पहिला प्रजासत्ताकदिन होता. प पू डॉ बाबासाहेब हे दिल्लीत होते त्यामुळे देवाजी बापू हे मुलाला भाऊराव यांना घेऊन प पू डॉ बाबासाहेब यांच्या भेटीसाठी दिल्लीला गेले तिथे भेट झाल्यावर प पू डॉ बाबासाहेब यांनी देवाजी बापू खोब्रागडे यांना तुमचा मुलगा चळवळीसाठी दान द्या असे सांगितले. देवाजी बापू खोब्रागडे यांनी क्षणाचाही विचार न करता प पू डॉ बाबासाहेब यांचा शब्द पाळला व तेव्हापासून बॅरिस्टर राजाभाऊ खोब्रागडे ह्यांनी जीवनाच्या अखेरपर्यंत प पू डॉ बाबासाहेब यांच्या विश्वासाला कुठेही तडा जाणार नाही याची काळजी घेतली शेवट पर्यंत त्यांनी निष्ठेने, त्यागी वृत्तीने, प्रामाणिकपणे रिपब्लिकन पक्षाचे काम केले.

रिपब्लिकन पक्षाचे संस्थापक सरचिटणीस म्हणून बॅ. खोब्रागडे यांनी काम केले. कर्मवीर दादासाहेब गायकवाड व त्यांच्या नेतृत्वाखाली १९५७ साली रिपब्लिकन पक्षाचे ९ खासदार निवडून आले होते स्वतः बॅरिस्टर राजाभाऊ खोब्रागडे यांना विरोधी पक्षाच्या सहकार्याने राज्यसभेचे सदस्यत्व मिळाले ते तीन वेळा राज्यसभेचे खासदार होते. व दोन वर्षे राज्यसभेचे उपसभापती होते.



युपीएससी परीक्षेत अनुसूचित जाती जमाती च्या उमेदवारांना आरक्षण नव्हते १९५९ साली हा मुद्दा रिपब्लिकन पक्षाने संसदेत मांडला लोकसभेत कर्मवीर दादासाहेब गायकवाड यांनी भूमिका मांडली तर राज्यसभेत बॅरिस्टर राजाभाऊ खोब्रागडे यांनी सविस्तर मांडणी केली त्यानंतर केंद्र सरकारने युपीएससी परीक्षेत अनुसूचित जाती जमातीच्या विद्यार्थ्यांना आरक्षण लागू केले हा इतिहास भा प्र से,भा पो से तील किती अनुसूचित जाती जमातीतील अधिकारी यांना माहिती आहे? पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी बँकांचे राष्ट्रीयीकरण करण्याचा निर्णय घेतला होता त्यासाठी रिपब्लिकन पक्षाची विशेषतः बॅरिस्टर राजाभाऊ खोब्रागडे यांनी केलेली मागणी व त्यासाठी केलेला पाठपुरवठा कारणीभूत आहे. हे किती बँक कर्मचारी अधिकारी यांना माहिती आहे? कर्मवीर दादासाहेब गायकवाड आणि बॅरिस्टर राजाभाऊ खोब्रागडे यांच्या नेतृत्वाखाली रिपब्लिकन पक्षाने भूमिहीनांचा देशव्यापी सत्याग्रह केला होता ह्या ऐतिहासिक सत्याग्रहामुळे कित्येक भूमिहीन शेतकरी, शेतमजूर यांना लाखो हेक्टर जमीन वाटप करण्यात आली त्यात सर्व जाती जमातीचे शेतकरी शेतमजूर होते त्या लाभार्थ्यांना मिळालेली जमीन रिपब्लिकन पक्षामुळे मिळाली आहे हे माहित आहेत काय? लढायचे रिपब्लिकन पक्षाने फायदे घ्यायचे सर्वांनी असे वातावरण निर्माण केले आहे.

बॅरिस्टर राजाभाऊ खोब्रागडे हे कर्मवीर दादासाहेब गायकवाड यांचा कायम आदर करत होते त्यांच्यामध्ये योग्य समन्वय होता मात्र हे काँग्रेस नेत्यांना नको होते कारण त्याकाळात रिपब्लिकन पक्ष प्रमुख विरोधी पक्षाच्या भूमिकेत होता त्यामुळेच काँग्रेस नेत्यांनी रा. सू. गवई यांना हाताशी धरून रिपब्लिकन पक्ष फोडला त्यानंतरही बॅरिस्टर राजाभाऊ खोब्रागडे यांनी रिपब्लिकन पक्ष देशातील सर्व राज्यांत टिकवून ठेवला होता. त्यामुळेच आणीबाणी नंतर झालेल्या लोकसभा निवडणुकीपूर्वी पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी बॅरिस्टर राजाभाऊ खोब्रागडे यांना फोन करून पाठिंबा द्यावा अशी विनंती केली होती व त्यांना भेटण्यासाठी बॅरिस्टर वसंतराव साठे व बॅरिस्टर अ र अंतुले यांना पाठवले होते. कोरे चेक घेऊन आलेल्या ह्या दोन्ही नेत्यांनी त्यांना राष्ट्रपती पदाची ऑफर दिली होती त्यावेळी बॅ राजाभाऊ खोब्रागडे यांनी सांगितले की, मला पद, प्रतिष्ठा, पैसा नको तुम्हाला रिपब्लिकन पक्षाचा पाठिंबा हवा असेल तर बौद्धांना केंद्राच्या सवलती देण्याची घोषणा करण्याचे पंतप्रधान इंदिरा गांधी यांना सांगा. मी इकडे पाठिंबा देण्याचा निर्णय घेतो असे सांगितले मात्र तसे घडले नाही त्यामुळे बॅ. राजाभाऊ खोब्रागडे यांनी विरोधी पक्षाच्या सोबत राहण्याची घोषणा केली त्यावेळी त्यांच्या नेतृत्वाखालील रिपब्लिकन पक्षाचे १९७७ साली दोन खासदार निवडून आले होते मध्यप्रदेशातील बालाघाट मतदार संघातून कचरुलाल जैन व महाराष्ट्रातील बुलढाणा मतदार संघातून दौलतराव गवई हे खासदार म्हणून निवडून आले होते. स्वतः बॅ. राजाभाऊ खोब्रागडे यांनी नागपूर लोकसभा मतदारसंघात जोरदार लढत दिली त्यावेळी अतिशय कमी मतांनी त्यांचा पराभव झाला होता. त्यावेळी महाराष्ट्र विधानसभेची निवडणूक सुद्धा झाली होती. त्यामध्ये रिपब्लिकन पक्षाचे उत्तर नागपूर मधून सुर्यकांत डोंगरे, भंडारा जिल्ह्यातून वाल्देकर, चेंबूर मतदार संघातून बालकृष्णन हे आमदार म्हणून निवडून आले होते. शरद पवार पहिल्यांदा मुख्यमंत्री झाले तेव्हा बॅ. राजाभाऊ खोब्रागडे यांनी त्यांना मुख्यमंत्री होण्यासाठी मदत केली त्यांना रिपब्लिकन पक्षाचा पाठिंबा दिला होता त्यावेळी सुर्यकांत डोंगरे हे विधानसभेचे उपाध्यक्ष झाले होते. १९८० साली सुर्यकांत डोंगरे पुन्हा आमदार म्हणून निवडून आले होते.

नागपूर महानगरपालिकेत रिपब्लिकन पक्षाचे चार महापौर झाले आहेत. विविध समित्यांचे सभापती झाले आहेत. विदर्भातील विविध जिल्ह्यांतील जिल्हा परिषद सदस्य, महानगरपालिकेत नगरसेवक सतत निवडून येत होते. १९७७ साली मध्य प्रांतातून खासदार म्हणून निवडून आलेले कचरुलाल जैन हे त्यापूर्वी आमदार म्हणून निवडून आले होते ते खासदार झाल्यानंतर डोमनसिंग नागपूरे हे चार वेळा आमदार म्हणून निवडून आले होते. दिग्विजय सिंह यांच्या मंत्रिमंडळात ते कामगार मंत्री होते. तामिळनाडू मध्ये तामिळ अर्सन हे चार वेळा आमदार म्हणून निवडून आले होते. आंध्रप्रदेशात जे ईश्वरी बाई ह्या सतत आमदार म्हणून निवडून आल्या आहेत त्या एकदा विधानसभेच्या विरोधी पक्षनेत्या होत्या त्यांची कारकीर्द सुद्धा झंझावाती होती त्यांनी रिपब्लिकन पक्ष ( खोब्रागडे) राष्ट्रीय अध्यक्षपद भूषविले होते त्यांच्या पूर्वी अध्यक्षपद भूषविणारे एड दत्ता कट्टी साहेब हे खासदार म्हणून निवडून आले होते. १९९०साली मुख्यमंत्री असलेल्या शरद पवारांनी रामदास आठवले यांना पुढे करून रिपब्लिकन ऐक्य फोडले होते त्यावेळी काँग्रेस विरोधात रिपब्लिकन पक्ष (खोब्रागडे) स्वतंत्र निवडणूक लढविली होती त्यावेळी रिपब्लिकन पक्षाचे (खोब्रागडे) उमेदवार उपेंद्र शेंडे हे उत्तर नागपूर मधून आमदार म्हणून निवडून आले होते व विदर्भातील सात उमेदवारांना दुसऱ्या नंबरची मते मिळाली होती त्यावेळी रिपब्लिकन पक्षाचे उमेदवारांना भरघोस मतदान होत असे त्यामुळे तत्कालीन मुख्यमंत्री शरद पवार साहेब यांनी आमदार उपेंद्र शेंडे यांना बोलावून मंत्री पदाची त्याच बरोबर विधान परिषदेच्या आमदारकीची ऑफर दिली होती मात्र आ. उपेंद्र शेंडे यांनी त्यांना नम्रपणे नकार दिला व सांगितले की, साहेब मी काँग्रेस विरोधात निवडून आलो आहे त्यामुळे मी आपल्या मंत्रिपदाचा स्विकार करु शकत नाही असा नेता रिपब्लिकन चळवळीत शोधून सापडणार नाही कारण त्यांच्यावर बॅ. राजाभाऊ खोब्रागडे यांच्या विचारांचा प्रभाव होता पुढे काँग्रेस रिपब्लिकन युती झाली व चार खासदार निवडून आले त्यानंतर त्याचा मोठा फटका रिपब्लिकन पक्षाला (खोब्रागडे)झाला तरीही प्रामाणिक, निष्ठावंत,जिद्दी,लढाऊ कार्यकर्त्यांच्या जोरावर आजही पक्षाची वाटचाल उपेंद्र शेंडे साहेब यांच्या नेतृत्वाखाली सुरू आहे.

विदर्भासोबतच मराठवाडा, उत्तर महाराष्ट्र, मुंबई महानगर प्रदेश परिसरात पक्षाच्या कार्यकर्त्यांची फळी उभी केली आहे ह्या लढाऊ कार्यकर्त्यांच्या जोरावर येत्या विधानसभा निवडणुकीत रिपब्लिकन पक्षाचे अस्तित्व टिकवून ठेवण्यासाठी जोरदार प्रयत्न करायचे आहेत ह्या अस्तित्वाच्या लढाईत तन मन धन एकवटून कामाला लागू या हे वर्ष बॅरिस्टर राजाभाऊ खोब्रागडे यांचे जन्मशताब्दी वर्ष आहे त्यांनी निर्माण केलेला लोकप्रतिनिधींचा पक्ष त्यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त पुन्हा उभा करण्याचे शिवधनुष्य उचलण्याचा संकल्प करु या हेच बॅ. राजाभाऊ खोब्रागडे साहेब यांना अभिवादन ठरेल.